महात्मा गांधीप्रणित शिक्षण संकल्पना

प्रा.सुरेखा मत्सावार

किंमत : १५० रुपये फक्त

अजिंक्य प्रकाशन

महात्मा गांधीप्रणित शिक्षण संकल्पना : प्रा. सुरेखा मत्सावर
प्रकाशक :
ॲड. जयमाला भगत
अजिंक्य प्रकाशन
भिमनगर, वापटा पो. कुपटा
ता. मानोरा जि. वाशिम
संपर्क : ९६०४४०२०५३
WhatsApp : 8007143527
Website : www.ajinkyapublication.com
E-mail : ajinkyapublication@gmail.com

आवृत्ती पहिली : जून २०२०

ISBN :

मुद्रक : अजिंक्य एन्टरप्राईजेस, वाशीम

मुखपृष्ठ : श्री. संतोष घोंगडे, पुणे

अक्षर जुळवणी : अरविंद मनवर
मुल्य : १५० रुपये फक्त

अनुक्रमणिका

दोन शब्द

'शिक्षण' या जिव्हाळाच्या विषय- संदर्भात वाचन करावे शक्य झाल्यास थोडे फार लेखन करावे अशी बऱ्याच दिवसांपासूनची इच्छा होती. पुणे विद्यापीठात प्रवेश घेतल्यानंतर या विचाराला आणखी चालना मिळाली.

एम. ए. च्या तृतीय सत्रामधील 'Gandhian Thought' हा पेपर शिकल्यानंतर म. गांधीजींच्या शिक्षणविषयक विचारांबद्दल कुतूहल निर्माण झाले. शिक्षणविषयक क्षेत्रांत सखोल अभ्यास व गाढ चिंतन केले आहे. असे आमचे सन्माननीय गुरूवर्य डॉ. सुरेंद्र बारलिंगे- यांच्याकडून शिकण्याची संधी मिळाली आणि त्यांच्या मार्गदर्शनामुळे मी हे काम पूर्ण करू शकले. यास्तव मां डॉ. बारलिंगे यांची अत्यंत ऋणी आहे.

डॉ. शरद देशपांडे यांनी प्रत्येक प्रकरण वाचून ज्या महत्त्वपूर्ण सूचना दिल्या व बहुमोल सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहे. तसेच डॉ. सुंदर राजन, डॉ. मराठे, डॉ. तलघट्टी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

मत्सावार सुरेखा गोविंदराव

प्रकरण पहिले
शिक्षण म्हणजे काय?

आपण जेव्हा 'शिक्षण' म्हणजे काय याचा विचार करतो तेव्हा आपली मानवाबद्दलची संकल्पना स्पष्ट असणे आवश्यक असते. कारण कोणत्याही शिक्षणविषयक सिध्दान्तामध्ये 'माणूस' हा गृहीतच असतो. शिक्षण हे कुणाचे तरी असते. ज्ञान देणारी व्यक्ती, ज्या व्यक्तीला ज्ञान मिळवायचे असते ती व्यक्ती, आणि 'ज्ञान' या तीनही गोष्टी शिक्षण या संकल्पनेत अभिप्रेत आहेत. यापैकी कोणताही एक घटक नसेल तर शिक्षणाची क्रिया घडणार नाही. शिक्षणाच्या एकंदर प्रक्रियेमध्ये माणूस महत्त्वाचा मानला जातो. शिक्षण हे कुणीतरी, कुणाला तरी देत असते. म्हणून या प्रश्नाशी संबंधित असलेल्या 'मानव' या संकल्पनेचे थोडक्यात स्वरुप पाहणे आवश्यक ठरते. माणूस हा जाणीवयुक्त, स्वत्वाची जाणीव असणारा आणि स्वतंत्र असा प्राणी आहे. ही जाण भूतकाळ व भविष्यकाळ यांच्या संदर्भात असते. मनुष्य हा भूतकाळातील आठवणी व भविष्यकाळातील अशा यांचे बाबतीत जागरूक असतो. माणूस त्याच्या भूतकाळाचा वर्तमानात उपयोग करून घेतो.

'मनुष्य' चा विचार आपल्याला एक माणूस इतर गोष्टीपासून अगदी वेगळा काढून करता येत नाही. विशिष्ट व्यक्तीचे ज्ञान सभोवतालच्या जगाच्या संदर्भातच होते. उदा. एखादी व्यक्ती कोण आहे किंवा काय आहे, हे समजून घ्यायचे असल्यास हा जगाचा संदर्भ आवश्यक ठरतो. अमुक एक 'हा' व्यक्ती आहे असे म्हटल्याने काहीही बोध होणारी नाही. ती व्यक्ती राहते कुठे? काय करते? कुणाची कोण आहे? म्हणजेच व्यक्तीचा व्यवसाय, गुणवत्ता, कुटूंब, आडनांव इत्यादी बाबींच्या संदर्भातच आपल्याला

व्यक्तीची माहीती मिळू शकते. माणूस आणि जग यांचा संबंध दोन प्रकारांनी दाखविता यावा :

१. माणसाचा इतर व्यक्तीशी असणारा संबंध : यालाच 'मी' व 'तू' संबंध असे म्हणता येईल. आपला एकाच व्यक्तीशी संबंध येत नाही तर अनेक व्यक्तींशी संबंध येतो. म्हणून 'मी' व 'ते' यांनी दिग्दर्शित होणाऱ्या प्रश्नातील संबंध आपल्याला काही वेळेस अभिप्रेत असतो. म्हणजेच माणसाचा संवेदनाशील जगाशी संबंध येतो असे म्हणता यावे.

२. माणसाचा इतर भौतिक जगाशीसुध्दा जवळचा संबंध असतो, माणसाचा दैनंदिन जीवनात अनेक वस्तूंशी संबंध येतो ज्या असंवेदनाशील असतात.

आपण जेव्हा व्यक्ती स्वतंत्र असते असे म्हणतो त्यावेळी समाजाला मान्यता देऊनच, त्यासंबंधी विचार करतो. व्यक्ती ही स्वतंत्रपणे निसर्गापासून प्रेरणा घेते. समाज दिवसेंदिवस बदलत जातो, विकसित होत जातो. कोणताही समाज हा सामाजिक वैशिष्टयांनी बांधलेला असतो, तरीही आपण व्यक्तीच्या संदर्भात तिचा एक स्वतंत्र केंद्र म्हणून विचार करतो. व्यक्ती-व्यक्तींचा मिळूनच समाज बनतो. व्यक्तीच समाजाची पुनर्रचना करतात, विकास साधतात. म्हणून भोवतालच्या जगाच्या संदर्भात व्यक्तीचा विचार केला जातो. शिक्षणविषयक कोणत्याही समस्येचा अभ्यास करायचा झाला तर 'व्यक्ती व तिचे सभोवतालाचे जग' असाच विचार करावा लागतो.

'शिक्षण' या संकल्पनेचा विचार शिक्षणाच्या ध्येयाच्या संदर्भांत करावा लागतो. शिक्षणाच्या ध्येयाच्या संदर्भात विचार करतांना एक दक्षता घ्यावी लागते ती अशी की, शिक्षणाची ध्येये (Aims) आणि शिक्षणाचे परिणाम (Conseattence) यांत फरक

केला पाहिजे. शिक्षणपध्दतीची जी काही ध्येये आपण ठरवू ती तंतोतंत प्रत्यक्षात येतात कां? या संदर्भात विचार करणे महत्त्वाचे ठरते. बऱ्याच वेळा आपल्याला असे दिसून येते की, शिक्षणाचे परिणाम हे शिक्षणाच्या ध्येयापेक्षा वेगळ्या स्वरूपाचे असतात. उदा. नीतीशास्त्राचे शिक्षण घेणारा प्रत्येक विद्यार्थी नीतिमान होईलच असे नाही.

शिकणे आणि शिकविणे :

शिकणे (Learning) आणि शिकविणे (Teaching) यांच्या परस्परसंबंधाचा विचार जेव्हा केला जातो, त्या ठिकाणी दोन वेगळ्या स्वरूपाचे दृष्टीकोन मांडले जातात.

१. शिकणे आणि शिकविणे या एकाच प्रक्रियेच्या दोन बाजू आहेत,

२. शिकणे आणि शिकविणे यांत तात्रिंकदृष्ट्या फरक केला जाऊ शकतो.

अनुभवाव्दारे शिकणे असे म्हणतो त्यावेळी अनुभव हा आपल्या शिकण्याच्या कृतीचे कारण (Cause) असतो, साधन (Source) नसतो. आपल्याला शिकविणे हा अनुभवाचा हेतू नसतो. शिकविण्याची कृती मात्र मात्र हेतुपुरस्कार केली जाते. शिकविण्याची क्रिया ही जाणतेपणी केलेली असते.

शिकणे आणि शिकविणे यांतील दुसरा फरक असा सांगता येतील की, आपण एकटे असलो तरी कांही गोष्टी आपल्याला शिकता येतात.

दुसऱ्या भाषेत सांगावयाचे झाल्यास काही गोष्टी शिकण्यासाठी इतरांच्या उपस्थितीची आवश्यकता नसते. याउलट शिकविणे या कृतीसाठी इतर व्यक्तीची आवश्यकता असते. शिकणारे कुणीतरी असल्याशिवाय शिकविण्याची क्रिया होत नाही.

यावरून आपण असे विधान करू शकतो की शिकविणे ही सामाजिक संकल्पना (Social Concept) आहे. परंतु शिकणे ही

नेहमीच (Necessarily) सामाजिक संकल्पना असते असे नाही. आपण एकटे असतो तेव्हा सुध्दा शिकण्याची क्रिया घडू शकते, स्वतःच्या अनुभवाव्दारे शिकणे म्हणतो तेव्हा सुध्दा इतर व्यक्तींची आवश्यकता असतेच असे नाही. परंतु शिकविणे म्हणतो तेव्हा एकापेक्षा अधिक व्यक्तींची आवश्यकता असते. शिकविणाऱ्या व्यक्तीसमोर कमितकमी एक तरी व्यक्ती शिकणारी असावी लागते.

शिक्षणाच्या ध्येयाचे स्वरूप :

'शिक्षण' ही संकल्पना 'शिक्षणाच्या ध्येया' शी निगडित आहे. शिक्षण हे ध्येय गाठण्याचे साधन आहे. या साधनाचे साध्य कोणते म्हणजेच शिक्षणाचे ध्येय काय हे निश्चित असले पाहिजे.

(अ) आपण शिक्षण घेतो म्हणजे शिक्षणाचे जे काही ध्येय असते, ते आत्मसात करतो. आज जे आपल्याजवळ नाही ते प्राप्त करण्याचा प्राप्तव्याचा प्रयत्न करतो. शिक्षण घेणे यामध्ये अमुक एक गोष्ट आपल्याजवळ नाही, जी आपल्याला हवी आहे ती मिळविण्यासाठी प्रयत्न करणे हा अर्थ अभिप्रेत आहे.

(ब) शिक्षणाच्या ध्येयाच्या संदर्भात सांगावयाचा दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की, शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये लक्ष केंद्रित करणे, विशिष्ट दिशेने प्रयत्न करणे, जे आपल्या आवाक्याबाहेरचे नाही 'प्रयत्नसाध्य आहे' जे आपण मिळवू शकतो, इत्यादी गोष्टी गृहीत असतात.

(क) ध्येय या संकल्पनेतच अपयशाची शक्यता सुध्दा अभिप्रेत आहे. (Schooling) शाळेत जाणे आणि शिकणे (Education) यात फरक केला जातो. कारण शाळेत जाणारा प्रत्येक जण शिकतोच असे नाही तर अपयशीसुध्दा ठरू शकतो.

शिक्षण हे एक प्रभावी साधन आहे. या साधनाचे साध्य कोणते म्हणजेच शिक्षणाचे ध्येय काय? आपण देत असलेल्या शिक्षणामुळे आपल्या विद्यार्थ्यांचा कोणता वैयक्तिक फायदा होणार

आहे किंवा योग्य प्रकारचे शिक्षण न दिल्यास त्यांचा कोणता तोटा होणार आहे इत्यादी प्रश्नांचा विचार करावा लागतो.

शिक्षण म्हणजे शरीर-मनावर होणारे विशिष्ट प्रकारचे संस्कार होत, असे मानले तर, अशा प्रकारचे संस्कार अखंडपणे व अव्याहतपणे होत असतात. जीवनभर प्रत्येक व्यक्तीला बरे वाईट अनुभव येतच असतात. सभोवतालच्या परिस्थितीचा, व्यक्तीचा, निसर्गाचा परिणाम या ना त्या रीतीने, व्यक्तीवर होतच असतो. अशाप्रकारे नैसर्गिक रीतीने शिक्षणदानाचे कार्य अखंडपणे व अविरत चालूच असते.

परंतु ही क्रिया अत्यंत सावकाशीने चालणारी व बेभरवशाची आहे. शिवाय सर्वच गोष्टी स्वानुभवाने शिकावयाच्या नसतात. म्हणून पूर्वीच्या पिढयांत मानवजातीने संकलित केलेले ज्ञान योग्य प्रमाणांत व विद्यार्थ्यांच्या वयोमानाला अनुसरून देणे शाळांचे एक महत्त्वाचे कार्य आहे.

उपयुक्तता :

शिक्षणाचा उद्देश उपयुक्तता हाच असावा असेही एक मत मांडले जाते. शिक्षणाचा आपल्या आयुषमध्ये काहीतरी उपयोग व्हावयास पाहिजे. शिक्षणाने आपला पोटापाण्याचा प्रश्न स्वतंत्रपणे सोडविता आला पाहिजे, स्वतःचा चरितार्थ चालविता आला पाहिजे.

ज्ञानासाठी शिक्षण :

वरील शिक्षणाचा उद्देश फार संकुचित वाटतो. कारण माणसाला केवळ शारीरिक गरजा नसतात तर त्याला बुध्दी असते. भावना असतात. म्हणून ज्ञान मिळविणे हाच शिक्षणाचा उद्देश असावा ही विचारसरणी पुढे येते. चरितार्थासाठी शिक्षण आणि ज्ञानासाठी शिक्षण ह्या दोन्ही टोकांच्या व्याख्या ठरतात.

तिसरा एक पक्ष असे सांगतो की शिक्षणाने जीवनाची संपूर्ण तयारी व्हावी. मनुष्याची केवळ चरितार्थाच्या दृष्टीनेच तयारी

नव्हे, तर आयुष्यात ज्या ज्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते, असे सर्व प्रश्न सोडविण्याची शक्ती शिक्षणाने माणसाच्या अंगी यावी. ही व्याख्या स्वीकारली तर अडचण अशी निर्माण होते की, संपूर्ण जीवन म्हणजे काय? जीवन संपूर्ण झाले असे कोणत्या अवस्थेत म्हणावयाचे? परंतु अशी काही मूल्ये ठरलेली दिसत नाहीत की, जी साध्य झाली म्हणजे जीवन संपूर्ण झाले असे म्हणता येईल.

व्यक्तिविकास :

शिक्षणाचा खरा उद्देश व्यक्तिविकास करणे हा आहे. यामध्ये शारीरीक, मानसिक व नैतिक या तिन्ही प्रकारच्या विकासांचा समावेश होतो. यापैकी एका जरी गोष्टीचा विकास योग्य प्रकारे झाला नाही, तर माणूस चांगले जीवन जगू शकणार नाही. मानसिक वाढ कितीही झालेली असली आणि जर त्याची शरीरसंपदा चांगली नसेल, तर त्याला काहीही अर्थ नाही, उलटपक्षी शरीर सुदृढ होऊन जर बुध्दीचा योग्य विकास झाला नाही तरीही ते निरर्थकच ठरते. शारीरिक आणि मानसिक विकास होउनही जर त्याची नैतिक पातळी कमी दर्जाची असेल, तर त्या व्यक्तीचा अधःपात झाल्या शिवाय राहणार नाही. शिक्षणाच्या योगाने शरीर व मन यांचा विकास होऊन शीलही ऊत्तम प्रकारचे बनले पाहिजे.

सामाजिक प्रगती :

शिक्षणाची व्याख्या, शिक्षणाचे आदर्श, हे समाजाच्या गरजेप्रमाणे व आकांक्षेप्रमाणे बदलत असतात. शिक्षणाचा विचार केवळ व्यक्तिविकासाच्या दृष्टीने करून पुरेसा होत नाही, कारण, व्यक्ती ही समाजातच जन्मते, समाजातच तिचा विकास होतो व तिचे कार्यक्षेत्रही समाजांतच असते. म्हणून शिक्षणाचे ध्येय ठरविताना समाजाचा विचार अपरिहार्य ठरतो. समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणाने ससंस्कृत व प्रतिष्ठित नागरिक तयार झाले पाहिजेत. शिक्षणाच्या योगाने व्यक्तीचा संपूर्ण व सर्वांगीण विकास

तर झालाच पाहिजे, पण त्या बरोबर समाजाची उन्नती हे अंतिम ध्येय पाहिजे. म्हणून समाजोन्नतीस कारणीभूत होणारा व्यक्तिविकास हे शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे. ब्रिटिशांनी केवळ कारकून निर्माण करण्यासाठी शिक्षण दिले, शिक्षणाव्दारे भारतीयांना गुलाम बनविले. त्यांनी दिलेल्या शिक्षणाचा भारतीयांना आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी यत्किंचितही उपयोग नव्हता. कारण ब्रिटिशांचा तो हेतूच नव्हता. म्हणून आपल्याला असे म्हणता येतील की, शिक्षणाचे ध्येय आधी निश्चित केले पाहिजे आणि त्या ध्येयानुरूप शिक्षणयंत्रणा राबविली पाहिजे.

शिक्षणाचे ध्येय समजून घेतल्यानंतर आपण असे विधान करू शकतो की, शिक्षण हे समाजाशी जुळवून घेण्याची, समायोजनाचे ट्रेनिंग होय. समायोजनात बदल व क्रांती अपेक्षित आहे. माणूस मूल्य ठरवितो व जगाशी समायोजन साधतो. आपण जेव्हा जग असे म्हणतो, तेव्हा केवळ वस्तू हा संदर्भ नसतो, तर इतर व्यक्ती त्यात गृहीत असतात. शिक्षणाचा संबंध मूल्यात्मक जगतासी आहे. शिक्षणाची समस्या पुढील गोष्टींशी निगडीत आहे.

१. एक व्यक्ती व दुसरी व्यक्ती यांतील संबंध.

२. एक व्यक्ती व इतर व्यक्तींचा गट यांमधील संबंध.

३. व्यक्ती आणि भौगोलीक परिसर (असलेले जग यांचा संबंध. हे संबंध औपचारिक असतील किंवा घनिष्ट असतील, किंवा माहितीवजा असतील.)

आपल्याला जी काही माहिती असते किंवा शिक्षणाव्दारे आपण जी काही माहिती मिळवितो, ती म्हणजे मी व ज्ञानवस्तू यांच्या संबंधाची असते. कोणत्याही माहितीशिवाय आपण शिक्षणाची कल्पना करू शकत नाही. कोणत्याही शिक्षणासाठी विशिष्ट प्रकारची माहिती असावीच लागते. शिक्षणाच्या एकंदर प्रक्रियेत ह्या माहितीचा भाग कमी अधिक काहीही असो, तिला शिक्षणात विशिष्ट

स्थान असतेच. माहीती ही ज्ञानवस्तूच्या संदर्भात असते, नंतर तिचे स्वरूप संकीर्ण होते. माहिती-वस्तू व आपण यांच्या संबंधाबाबत असते. आपण ती कुणाला तरी सांगतो. माहीती ही कोणाला तरी काहीतरी कळविणे, अहवाल सादर करणे, दुसऱ्याला देणे, या विविध स्वरूपाची असते. अनुभवाच्या संदर्भात व्यक्तीची क्रिया प्रतिक्रिया या संदर्भातही माहिती असते.

बऱ्याच वेळा माहिती म्हणजे ज्ञान असे ढोबळ समीकरण मांडले जाते. परंतु या दोन्हीत मूलभूत फरक असतो. जेथे माहिती संपते व ज्ञान सुरू होते तेथे खरोखरच एक महत्त्वाची समस्या निर्माण होते. ज्ञान मिळविण्याची कृती ही माहिती मिळविण्याच्या कृतीपेक्षा वेगळी असते. रेडिओ, टेलिव्हिजन हे बहुतांशी आपल्याला माहिती देतात. परंतु माणसाचा मेंदू म्हणजे (Store-room) भांडार नव्हे. सर्वच माहिती न साठविता आपण निवड करतो. काही माहिती ही सर्वांसाठी आवश्यक असते. आपण जी काही माहिती न साठविता आपण मिळवितो, त्यातील काही आपल्या व्यक्तीमत्वाला जाऊन भिडते. ती व्यक्तीचे परिवर्तन घडविते, म्हणून त्यांपासून वेगळी काढता येत नाही आणि अशा माहितीलाच ज्ञान म्हणता येतील. ज्ञान व माहिती यांतील फरक सुक्ष्म स्वरूपाचा असला तरी निश्चित स्वरूपाचा आहे.

शैक्षणिक पध्दतीव्दारा माहितीला ज्ञानाचे स्वरूप दिले जाते. परंतु प्रत्येक माहिती ही ज्ञानामध्ये रूपांतरित होऊ शकत नाही. माहितीचे ज्ञानामध्ये रूपांतर होण्यासाठी शिक्षकांची शैली व विद्यार्थ्यांचे अवधान यांची मदत लागते. माझे ज्ञान हे इतरांबद्दलच्या माहितीच्या संदर्भात असते. ज्ञान माझ्याशी संबंधित असते व ते माझ्यापासून वेगळे काढता येत नाही. जेव्हा माझे ज्ञान इतरांना समजते. तेव्हा ते इतरांच्या संदर्भात ज्ञान होते. ज्ञानाचा जो आशय (Content) असतो, तो मात्र सर्वांसाठी असतो. म्हणून शिक्षण व

त्यांतील सूचना शक्य होत असाव्यात. माहितीचे ज्ञानात रूपांतर होण्याची शक्यता हे शिक्षणाचे पहिले गृहीतक आहे. व्यक्तीमत्वाचा विकास हे शिक्षणाचे ध्येय मानले जाते.

कौशल्य (Skill):

(Skill) कौशल्यसुध्दा शिक्षणाचा एक प्रकार मानता यावा. कौशल्य हे मुळातच कृतीयुक्त आहे. तसेच ते कौशल्य असणाऱ्या व्यक्तीपासून अविभाज्य आहे. आपण जेव्हा कौशल्य शिकण्याच्या संदर्भात बोलतो, तेव्हा तेथे पुढील गोष्टींची शक्यता असते. निरनिराळे संबंध समजून घेणे, ते कृतीमध्ये आणणे, त्या कौशल्यावर प्रभुत्व मिळविणे, कौशल्य समजून घेणे हे कौशल्याच्या-सरावाच्या आधी असते. शिक्षण याचा एक अर्थ जगात यशस्वीपणे जगण्याचे तंत्र, असाही सांगितला जातो. हळूहळू कृतीव्दारा कौशल्यावर प्रभुत्व मिळविणे यालाच कृतीव्दारा शिक्षण असे म्हणता येतील.

कौशल्ये ही जरी ज्ञानापासून वेगळी असली तरी त्यांचा ऐकमेकांशी घनिष्ट संबंध आहे. म्हणून कुणीही फक्त कौशल्याचा किंवा केवळ माहितीचा स्वतंत्रपणे विचार करू शकत नाही. ज्ञान हे साधे असो किंवा संकीर्ण असो. एखादा ते ज्ञान चटकन ग्रहण करून घेतो, एखादा ते हळूहळू पायऱ्या पायऱ्यांनी ग्रहण करून घेतो. ज्ञान एकदम मिळविणे किंवा पायऱ्या पायऱ्यांनी मिळविणे हे ज्ञात्यावर अवलंबून आहे, त्याच्या क्षमतेवर अवलंबून आहे. ज्ञान देतांना शिक्षक टप्प्याटप्प्याने सांगतो ते विद्यार्थ्यांना समजण्यासाठी असते.

ज्ञान आणि माहिती याव्यतिरिक्त शिक्षणात (Training) सरावाचाही भाग आहे. ज्यातून लोकांना मत मांडण्यासाठी, विधाने स्पष्ट करण्यासाठी, मूल्यांच्या संदर्भात विचार प्रतिविचार करण्यासाठी आणि अधिकाधिक सखोलपणे हे विश्व समजून

घेण्यासाठी मदत मिळते. माहितीव्दारा (Data) पुरविला जातो त्यांवर माणूस पुढील ऊभारणी करतो. माहितीच्या संदर्भात आवश्यक असणारा दृष्टीकोन हा निश्चितच मत, विधान, मूल्य यासाठी असणारा दृष्टीकोन हा निश्चित मत, विधान, मूल्य यासाठी आवश्यक असणाऱ्या दृष्टीकोनापेक्षा वेगळा असतो. या सर्व घटकांच्या संदर्भांत माणसा माणसांमधील संबंध विचारात घेतला जातो. व्यक्तीव्यक्तींच्या मतांमध्ये वेगळेपणा असतो. मत चूक किंवा बरोबर असू शकते त्याचप्रमाणे विधान हे सुध्दा असत्य किंवा सत्य असू शकते.

शिक्षणाचे माणसाला पूर्वींची वास्तविक निर्माल्य झालेली मूल्ये नाकारता आली पाहिजेत व त्या जागी नवी मूल्ये साकारता आली पाहिजेत. यापूर्वींच्या काही पायऱ्या पुढीलप्रमाणे सांगता येतील. (१) मत (२) विधान (३) मूल्यांकन.

१. मत म्हणजे विधान नव्हे आणि विधान म्हणजे मूल्यांकन नव्हे, शिकलेले व्यक्ती मत मांडू शकते, जे तिचे वैयक्तिक असते. अर्थात व्यक्तीच्या मताचा इतरांवर परिणाम होत नाही. प्रभाव पडत नाही असे नाही. शिक्षणाचे ध्येय माणसामध्ये मत मांडण्याची क्षमता निर्माण करते व तसे स्वातंत्र्य देते.

२. विधानामध्ये एक प्रकारची वस्तुनिष्ठता असते. येथेच मत व विधान यांतील फरक स्पष्ट होती. विधान हे सत्य किंवा असत्य असू शकते. विधानात तोच विषयाबद्दल वस्तुनिष्ठ दृष्टीकोन असतो. हाच मुद्दा तात्विक परिभाषेत मांडायचा झाला तर असे म्हणता यावे की, विधान हे वस्तुतंत्र म्हणजेच वस्तूच्या स्वरूपाने नियंत्रित असते. उलटपक्षी मत हे पुरूषतंत्र म्हणजेच व्यक्तीनिष्ठ असते. विधानामध्ये त्या घटनेचे योग्य मूल्यांकनही असते. नाहीतर शिक्षण हे मानवाचा त्या शाखेत विकास करण्यात यशस्वी झाले नसते.

३. माणूस हा शिक्षणाने मूल्यांच्या संदर्भात विचार करायला लागतो. मूल्यांचा संबंध हा संमतीशी मान्यतेशी आहे. मान्यतेमुळे माणसाचे वागणे नियंत्रित होते. शिक्षणाने नव्या मूल्यांची निर्मिती झाली नाही व जुनी मूल्ये नाकारता आली नाहीत तर शिक्षण निरर्थक ठरेल.

शिक्षणाने निसर्गाशी सामना करण्याची तयारी माणसामध्ये निर्माण होते. विश्व म्हणजे माणूस-विरूध्द-निसर्ग नव्हे. शिक्षणाने माणसाच्या ठिकाणी निसर्ग अधिकाधिक समजून घेण्याची क्षमता येते. शिकण्याच्या प्रक्रियेचा संबंध संवेदनाशीलतेशी आहे. जाणीवेशिवाय शिक्षणाची प्रक्रिया सुरू होणेच अशक्य ज्ञान जे आपल्या व्यक्तीमत्वाचा भाग बनते, त्याचे आधी संवेदन झाले पाहिजे. एकदा त्या वस्तूचे ज्ञान झाल्यानंतर माणसाच्या ठिकाणी स्व-संवेदनशीलता आली पाहिजे. त्यातूनच गुणग्राहकतेला स्थान मिळते आणि मूल्यांकनाची क्षमता निर्माण होते.

शिक्षण ही प्रक्रिया समाजात घडत असते. शिक्षणाचे समाजावर व त्यातील व्यक्तीवर होणारे परिणाम आपण तपासू शकतो. त्याचप्रमाणे शिक्षणावर होणारे अन्य सामाजिक परिणाम तपासून पाहिले पाहिजेत. एक परिणाम दिसतो तो शहरीकरणाचा, दिवसेंदिवस औद्योगिकरण वाढत आहे, त्यानुसार शहरीकरणाचे प्रमाण वाढत आहे. शिक्षणाव्दारे शहरीकरणाला अनुकूल बदल करावा की खेड्याकडे वळण्याची प्रवृत्ती निर्माण करावी? किंवा वाढीस लावावी? ही आजच्या अर्थशास्त्रज्ञापुढे व शिक्षणतज्ञांपुढे समस्या आहे. शिक्षण हे नोकरी मिळविण्यासाठी असते या प्रवृत्तीतून निर्माण होणारे परिणामही तपासले पाहिजेत. ज्या प्रमाणात शिक्षणाची वाढ होते, त्या प्रमाणात नोकऱ्या वाढणे शक्यच नाही. नोकरी मिळविणे हेच जर शिक्षणाचे ध्येय असेल तर आपल्याला असे दिसून येतील की, सुशिक्षितांची टक्केवारी वाढत जाते, तेवढ्या प्रमाणात बेकारांची टक्केवारी वाढत जाते. माणसाला काही प्रमाणात

स्वातंत्र्य असते याचा अर्थ असा नाही की, ज्याला जे काम हवे असेल ते त्याला मिळेल असे झाले तर समतोल टिकणार नाही.

शिक्षणाच्या संदर्भात समतोल, संतुलन आवश्यक आहे. सैध्दांतिक शिक्षण देत असतांना अशी दक्षता घेतली जाते की, सैध्दांतिक अंग आणि व्यावहारिक अंग यात विरोध निर्माण होणार नाही. शिक्षणाव्दारे आपल्याला जो काही व्यक्तीविकास साधायचा आहे. शारिरिक, मानसिक व बौध्दिक विकासामध्ये समतोल राखावा लागतो. एका अंगाचा अधिकाधिक विकास व एखाद्या अंगाकडे पूर्ण दुर्लक्ष झाले तर ते शिक्षण निरर्थक होईल. शिक्षणाव्दारे सर्व सैनिक किंवा सर्व तंत्रज्ञ प्रकारचे असंतुलन देशाच्या प्रगतीला खाली खेचते.

आज आपल्याला असे दिसते की ज्या माणसाने ते (Training) प्रशिक्षण घेतलेले नाही ते काम तो करायला घेतो, त्याच्या कामामुळे काय गोंधळ निर्माण होईल हे सुध्दा तो समजू शकत नाही. आपण जे शिक्षण घेतलेले आहे त्यानुसार काम मिळत नाही म्हणून मग कोणते तरी मिळेल ते काम करतात. त्यामुळे होते काय की त्यांनी वेगळ्या स्वरूपाचे प्रशिक्षण घेतलेले असल्यामूळे तो त्या व्यवसायात रमत नाही. म्हणून कामामध्ये मग असंख्य चुका राहतात. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, त्याच्या शिक्षणावर जो काही पैसा झालेला असतो राष्ट्राची जी काही संपत्ती कारणी लागलेली असते, तिचा अपव्यय होतो. आपल्या पात्रतेनुसार आपल्याला काम मिळत नाही, त्यामूळे त्या व्यक्तीला मानसिक अस्वास्थता येते ती वेगळीच.

वरील गोष्टीचा साकल्याने विचार केल्यानंतर असे वाटते की, शिक्षण हे असे असावे की जे समाजास उपयुक्त होईल. समाजामध्ये आपल्याला जी काही भूमिका मिळाली आहे ती शिक्षणाने योग्य प्रकारे पार पाडता यावी. संस्थात्मक बदल नाही म्हणून व्यक्ती चांगल्या निपजत नाहीत आणि व्यक्ती दुर्बल आहेत

म्हणून संस्थात्मक बदल होत नाहीत. तेव्हा प्रत्येक व्यक्तीने स्वतः पासून सुरूवात केली पाहिजे. प्रवाह हा एकेका माणसातून जन्म घेतो, या गांधीवादी विचारसरणीचा आपल्याला येथे प्रत्यय यावा. शिक्षणामागील प्रेरणेची, दृष्टीकोनाची आज खरी गरज आहे. शिक्षणाच्या मुळाशी कोणती प्रेरणा, कोणता दृष्टीकोन असला पाहिजे हे ओळखून त्या दिशेने आपल्या शिक्षणपध्दतीची पुनर्रचना करणे, हीच आजच्या काळाची गरज आहे.

शिक्षणाच्या ध्येयाच्या संदर्भात विचार करताना एक महत्त्वाची गोष्ट विचारात घेतली पाहिजे की, आपण खरोखरच यंत्रयुगात शोभणारी, वैज्ञानिक निष्ठा असणारी माणसे आहोत काय? आपण अंधश्रध्दांच्या तावडीतून मोकळे झालो आहोत काय? आज आपल्याला या अर्थाने खरे शिक्षण मिळत नाही. आपण जर खरोखरच विज्ञाननिष्ठ आणि बुध्दिनिष्ठ असतो, तर जाती, विटाळचांडाळ, आपल्या लग्नपध्दती इ. गोष्टी राहिल्याच नसत्या. या गोष्टी अस्तित्वात आहेत त्याअर्थी आपण अजूनही पुरेसे विज्ञाननिष्ठ आणि बुध्दीप्रामाण्यवादी झालेलो नाही हे उघड आहे. आजच्या शिक्षणपध्दतीतून जे मिळते ते म्हणजे ज्ञानाच्या प्रगतीच्या विचारांची माहिती असते. आज शाळा माहितीकेंद्र बनलेल्या दिसतात. ज्या समाजात वावरताना वैयक्तिक आयुष्य, त्यातील श्रध्दा आणि मूल्ये, आणि आपले इतरांबरोबरचे संबंध यांचा विचार करायला लावणारे शिक्षणच आज दिले जात नाही. वर्षानुवर्षे चालत आलेल्या रूढींचे आपण त्या आहेत त्याच स्वरूपात पालन करतो, त्यामुळे तीच व्यवस्था, चौकट कायम राखली जाते. म्हणून शिक्षणाचे ध्येय निश्चित करतांना ते समाजाभिमुख असले पाहिजे ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते. हा समाज माझा आहे ही जाणीव निर्माण झाली पाहिजे.

कोणत्याही काळातल्या, कोणत्याही समाजातल्या शिक्षण पध्दतीला निदान तीन उद्दिष्टे साधावी लागतील तरच ते शिक्षण खऱ्या अर्थाने पूर्ण होईल :

१. ते उपजीविकेला उपयुक्त हवे.

२. त्यामुळे समंजस, कार्यक्षम आणि जबाबदार नागरिक निर्माण व्हावा, आणि

३. त्यामुळे माणसाच्या व्यक्तित्वाचा सर्वांगीण विकास शक्य व्हावा. त्याच्या अंगच्या सुप्त शक्ती त्याच्या आणि समाजाच्या उन्नतीला साधक व्हाव्यात.

प्रकरण दुसरे
गांधीप्रणित शिक्षण संकल्पनेची पार्श्वभूमी

गांधीप्रणित शिक्षण संकल्पनेचा विचार करताना आपल्याला तत्कालीन भारतीय संदर्भ विचारात घ्यावा लागतो. त्यांचे शिक्षणविषयक विचार पाहतांना त्यांनी ते कोणत्या परिस्थितीत मांडले? त्या मागची पार्श्वभूमी काय? कोणत्या समस्येला उत्तर देण्यासाठी त्यांचे हे विचार प्रसृत झाले? इत्यादी गोष्टींचा विचार करणे आवश्यक ठरते.

इंग्रज येण्यापूर्वी भारताची जी सामाजिक परिस्थिती होती, तिचा आपण थोडक्यात आढावा घेऊ, शिक्षणाच्या संदर्भात भारतातील सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, त्यावेळी समाजजीवनात आवश्यक असणाऱ्या अशा विविध धंद्याची (Professions) एक स्वतंत्र व्यवस्था अस्तित्वात होती. ही व्यवस्था म्हणजेच बारा बलुत्यांची संस्था. या व्यवस्थेचे एक वैशिष्ट्ये म्हणजे ती जरी स्वतंत्र असली तरी संपूर्ण व्यापक अशा सामाजिक जीवनाची ती एक ड्रेस शिवून दिला की, त्याची अमुक इतकी शिलाई असा प्रकार तेव्हा नव्हता. वर्षभरात जी जी काही कामे करावी लागत त्या कामाचा मोबदला म्हणून ठराविक धान्य वगैरे दिले जात असे. अशा प्रकारे बारा बलुत्याच्या पध्दतीतून एक सामाजिक व्यवस्था निर्माण झाली होती.

ब्रिटिशपूर्व व्यवसायशिक्षण :

आता या पध्दतीचा आणि शिक्षणाचा संबंध काय याचा विचार करू. भारतामध्ये त्यावेळी काही व्यवसाय प्रचलित होते आणि ज्या व्यवसायांची समाजव्यवस्थेला अत्यंत गरज असते अशा प्रकारच्या व्यवसायाचे शिक्षण औपचारिकरित्या देणारी संस्था त्यावेळी नव्हती. म्हणजेच (Vocational Education) व्यावसायिक

शिक्षण देणाऱ्या शाळा त्यावेळी नव्हत्या. कुटूंबामध्ये मुलांना लहानपणापासून व्यवसायाचे शिक्षण दिले जात असे. सुतार, लोहार, चांभार ईत्यादी व्यवसाय पिढीजात असत. त्यामूळे व्यवसायशिक्षण देणाऱ्या कोणत्याही औपचारिक संस्थेची गरज भासली नाही.

पारंपारिक शिक्षण :

आपल्यापुढे असा प्रश्न निर्माण होतो की, त्यावेळी मग 'शिक्षण' हा प्रकारच नव्हता का? व्यवसायाचे शिक्षण कुटुंबात मिळत असे. त्याव्यतिरिक्त दुसरे शिक्षण म्हणून काही होते कां? त्यावेळी सुशिक्षित आणि अशिक्षित या संकल्पना नव्हत्या का? या दोन्हीत फरक करण्यासाठी काही निकष होता का? या संदर्भात आपल्याला पारंपारिक भारतीय शिक्षण पध्दतीचा विचार करावा लागेल. पारंपारिक शिक्षणपध्दतीमध्ये, गुरूगृही जाऊन विषयांचे ज्ञान संपादन केले जात असे. (१) शिक्षा (२) छंद (३) व्याकरण (४) निसक्त,(५) ज्योतिष, (६) कल्प यांचा अभ्यास होत असे. एखाद्याने 'वेद' व 'वेदांतांचा' अभ्यास पूर्ण केला म्हणजे तो विद्वान, असे मानण्याची रीत असे. या पारंपारिक शिक्षणामध्ये प्रामुख्याने पाठांतरावर भर असे.

शिक्षणाचे स्वरूप अनौपचारिक :

व्यवसाय शिक्षण देणारी औपचारिक संस्था नव्हती, तसेच पारंपारिक शिक्षण देणारी औपचारिक संस्था नव्हती असे आपल्याला म्हणता येर्दल. शिष्य गुरूकडे जाऊन शिक्षण घेतो. हे शिक्षण प्रामुख्याने संस्कृतमधून दिले जाते. गुरूकडून मिळणारे शिक्षण हे सुध्दा अनौपचारक संस्थेव्दारे मिळणारे शिक्षण होय. असे म्हणण्याचे कारण प्रत्येक गुरू हा स्वतःची अध्यापनपध्दती, अभ्यासक्रम, विद्यादानाचा कालक्रम ठरवीत असे. व्यक्तीपरत्वे भिन्नता असे. आजच्या शिक्षणपध्दतीत अशाप्रकारची व्यक्तिनिष्ठता

कमी करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. पारंपारिक शिक्षणपध्दतीत वस्तुनिष्ठता पाहायला मिळत नाही.

अशा प्रकारे अनौपचारिक स्वरूपात मिळणारे शिक्षण हे सुध्दा विशिष्ट वर्गांपुरते मर्यादित होते. वेदाभ्यास केवळ ब्राह्मणवर्गच करू शके. पूर्वी समाजात चातुर्वर्ण्य व्यवस्था होती (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र) आणि वर्ण (जात) हा जन्मावरून ठरतो अशी समजूत होती. चांभार, लोहार, सुतार या सर्वांची गणना शूद्रांमध्ये होत असे. ते आपण आपला पिढीजात धंदा इमाने इतबारे करीत. उच्चवर्णियांनाच फक्त वेदाभ्यास करण्यासाठी मान्यता होती. त्यामूळे त्यांतून जे काही शिक्षण मिळत असे ते समाजातील काही लोकांपुरतेच मर्यादित राही. बहुजनसमाज हा त्यातील ज्ञानास पारखा असे.

पारंपारिक शिक्षणपध्दतीची आपण जी वैशिष्टये पाहिली, त्यांतील गुणदोषांचा विचार केला. ही शिक्षणपध्दती अशी होण्याचे महत्त्वाचे कारण त्यावेळी भारतात आजच्यासारखे कामधंदे नव्हते. आज आपल्याला डॉक्टर, इंजिनियर, वकील, कारकून इत्यादी निरनिराळे उद्योग करणारे लोक दिसतात. इंग्रजांच्या आगमनानंतर हे सर्व व्यवसाय भरभराटीस आले. तत्पूर्वी ते फार वेगळ्या स्वरूपात येथे प्रचलित होते.

आज ज्या वाहनांच्या सोयी आहेत, निरनिराळी कार्यालये आहेत, त्यानुसार काम करणारा वर्ग आहे. पण, त्यावेळी वाहतुक यंत्रणा एवढी प्रगत नव्हती आणि कार्यालयेही नव्हती, त्यामूळे तो कामधंदा उपलब्ध नव्हता. अर्थातच त्या कामधंद्यासाठी लागणाऱ्या शिक्षणाची गरज नव्हती. ब्रिटिशांच्या शिक्षणपध्दतीचे दुष्परिणाम पाहिल्यानंतर गांधीजी, त्यांच्या 'हिंद स्वराज्य' या पुस्तकांत असे म्हणतात की, डॉक्टर, वकील हे समाजाचे सेवक असतात, त्यांनी समाजाची सेवा करण्याचे शिक्षण घेतलेले असते. ते सेवेबद्दल

मोबदला कसा काय घेतात? भारतीय पारंपारिक पध्दती पाहिली तर गांधीजींचा हा प्रश्न सार्थ वाटतो.

भारतामध्ये राज्य करायचे असेल तर भारतीयांच्याच मदतीने ते करावे लागेल, हा विचारप्रवाह इंग्रजांमध्ये पक्का होता. याची कारणे म्हणजे भारत व इंग्लंड यामधील भौगोलिक अंतर आणि संख्येचा प्रश्न, यामुळे जर भारतीयांच्या मदतीने भारतावर राज्य करायचे असेल तर सैन्य व सामान्य प्रशासनात भारतीयांची मदत घ्यावी लागणार हे उघड होते. त्यानुसार ब्रिटिशांनी भारतीय शिक्षणपध्दतीचा विचार केला. ब्रिटिश भारतात आल्यानंतर मात्र एकदंर शिक्षणपध्दतीत आमूलाग्र बदल झाला. शिक्षणाचे स्वरूप एकदम पालटले. ब्रिटिशांना हळूहळू येथे राज्य प्रस्थापित करायचे होते. म्हणून त्यांनी त्यांना अनुकूल असे सैनिकी शिक्षण, प्रशासनाचे शिक्षण भारतीयांना देऊ केले. सर्वसामान्य शिक्षणातून कारकून निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. आपले पाय भारतामध्ये भक्कमपणे कसे रोवता येतील याचा विचार करून त्यानुसार सर्व शिक्षण यंत्रणा राबविली. म्हणून ब्रिटिशांनी जे काही शिक्षण दिले ते प्रचलित भारतीय शिक्षणापेक्षा मूलतः वेगळे होते.

रानडे वगैरे लोकांनी ब्रिटिश शिक्षणपध्दती म्हणजे 'वाघिणीचे दूध' म्हटले आहे. त्या शिक्षणपध्दतीने आपला फायदा झाला. भारताचे एक प्रकारे आधुनिकीकरण झाले. इंग्रजी भाषेचा आणि त्यातून समृध्द ज्ञानाचा परिचय झाला. विज्ञानाच्या प्रगतीने येणाऱ्या कितीतरी सोयी उपलब्ध झाल्या. ब्रिटिशांच्या आगमनाने जे काही फायदे झाले, जे काही ज्ञान मिळाले, त्या मागे भारतीयांची प्रगती करणे हा त्यांचा हेतू नव्हताच. त्यांना येथे राज्य करायचे होते म्हणून त्यांनी सर्व सुधारणा केल्या. पर्यायाने भारतीयांना नवीन स्वरूपाचे शिक्षण मिळाले. नविन शिक्षणाचे श्रेय ब्रिटिशांना कितपत

द्यायचे हा वादाचा मुद्दा बाजूला ठेवून त्यांच्या शिक्षण पध्दतीचे स्वरूप समजून घेता येईल.

भारतात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता जसजशी स्थिरावू लागली, तसतशी येथील जनतेला शिक्षण देण्याची गरज राज्यकर्त्यांना भासू लागली. या संबंधात चार प्रमुख समस्या त्यांच्यासमोर उभ्या होत्या.

१. शिक्षणाचे ध्येय वा उद्दिष्ट काय असावे? पाश्चिमात्य ज्ञान विज्ञानाचा प्रसार करावा की पौर्वात्य विद्यांचाच अभ्यास चालू ठेवावा?

२. शिक्षणाचे माध्यम कोणते असावे? इंग्रजी की संस्कृतादि अभिजात भाषा की आधुनिक भारतीय भाषा?

३. शिक्षणाची जबाबदारी कुणावर सोपवावी ? यंत्रणा कोणती असावी? मिशनऱ्यांच्या शाळा, सरकारच्या शाळा की उद्देशियांनी चालविलेल्या शाळा?

४. सर्व शिक्षणप्रसाराची जबाबदारी सरकारने स्वतःवर घ्यावी की फक्त निवडक लोकांना शिक्षण देऊन स्वबांधवांच्या शिक्षणाचा प्रसार व भार त्या सुशिक्षितांवर सोपवावा?

अशा तऱ्हेने शिक्षणाचा उद्देश, आशय, माध्यम, प्रसार व नियंत्रण या चारही मूलभूत प्रश्नांचा निवाडा करणे आवश्यक होते. अध्यापन पध्दती, पाठयपुस्तके आणि शिक्षक-प्रशिक्षण ह्या बाबतचे निर्णय त्यांवर अवलंबून होते. प्रारंभी जी वादळे माजली व पुढेही शंभर वर्षे ज्यांवर वादविवाद होत राहिले ते या चार समस्यांवरच. आणि आधुनिक भारताचे भविष्य ठरणार होते ते या प्रश्नांच्या उत्तरांनीच.

या चारही प्रश्नांचे निर्णय घेतले गेले ते कंपनी सरकारच्या पुढाकारानेच? शैक्षणिक धोरणे ठरविण्याच्या कामात हिंदी विचारवंतांना स्थान नव्हते. तरीही राजा राममोहन रॉय, इश्वरचंद्र

विद्यासागर आणि जगन्नाथ शंकरशेट यांच्या सारख्या काही व्यक्ती आपले मत लोकांपुढे मांडीत होत्या आणि दुसऱ्या बाजूने जनमत तयार करीत होत्या. पुरातन पौर्वात्य विद्या विरूध्द आधुनिक विद्या, या वादात मेकॉले पक्षाचा जय झाला. इंग्रजी विद्येचे ज्ञानभांडार ज्यांनी दुरून वा जवळून पाहिले आणि इंग्रजांनी केलेल्या भौतिक सुधारणा, त्यांची स्वदेशातील राज्यपध्दतीत त्यांचा आर्थिक विकास इत्यादीचे मूळ या आधूनिक ज्ञान-विज्ञानात आहे हे ज्यांनी हेरले, ती मंडळी पाश्चात्य ज्ञानाचा प्रसार व्हावा, या मताचा आग्रहाने पुरस्कार करीत होती. सामान्य जनता तर दिङ्‌गमूढच झालेली होती. हिंदी प्रजेला केवळ शहाणेच करावयाचे असे नव्हे तर फक्त रक्ताने व वर्णांने हिंदी पण संस्कृतीने पूर्णपणे पाश्चिमात्य बनवून सोडावयाचे असे मेकॉलेने शिक्षणाचे उद्दिष्ट घोषित केले. राज्यकारभारला उपयोगी पडणारा दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांचा व कारकुनांचा वर्ग शिक्षणातून तयार करावा असे म्हणणारा एक उपयुक्ततावादी गट होता. कागदोपत्री मेकॉलेच्या खलित्याला मान्यता मिळाली. पण प्रत्यक्षांत या व्यवहारी धोरणांचाच अवलंब करण्यात आला.

ब्रिटिशांना आपली राज्ययंत्रणा यशस्वीपणे राबवायची होती. येथल्या लोकांचा त्यांना साधन म्हणून उपयोग करून घ्यायचा होता. अर्थांतच त्यांनी इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्यास सुरू केले. भारतीयांच्या भाषांचे ज्ञान देण्याचे त्यांनी कटाक्षाने टाळले. भारतीय लोकांना त्यांच्या भौगोलिक परिस्थितीची जाणीव करून द्यावी, त्यांना त्यांच्या उज्ज्वल, ऐतिहासिक परंपरेचा परिचय करून द्यावा हा ब्रिटिशांचा हेतू असणेच शक्य नव्हते. या सर्व गोष्टी भारतीयांच्या दृष्टीने महत्त्वाच्या होत्या. त्यांचे इग्रजांना काहीच सोयर सुतक नव्हते. वरील गोष्टींकडे इंग्रजांचे दुर्लक्ष होणे स्वाभाविक होते. शिक्षणामध्ये इंग्रजाचा अंतर्भाव करताना सुरवातीस एक भाषा

एवढेच तिचे स्थान होते पण नंतर त्यांनी इग्रजाचा माध्यम म्हणून स्वीकार केला.

इग्रजांच्या शिक्षणपध्दतीचा जो काही उद्देश होता व जे स्वरूप होते, या दोन्हीवर गांधीजींनी कडाडून हल्ला केला. जे शिक्षण आपल्यासाठी निरूपयोगी आहे ते आपण न घेतलेले बरे. शिक्षणातून आपल्या संस्कृतीची जोपासना होत नसेल, आपल्या भाषांचे ज्ञान मिळत नसेल, इतिहास, भूगोल माहित होत नसतील तर मग शिक्षण घ्यायचे तरी कशाला? गांधीजींना इंग्रज भाषा माध्यम म्हणूनकधीच मान्य नव्हती. मातृभाषेतून आपण सखोलपणे ज्ञान घेऊ शकतो. इंग्रजी माध्यमामुळे विद्यार्थ्यांना एकाच वेळी अनेक समस्यांची सोडवणूक करावी लागते. एक म्हणजे नवीन ज्ञान आत्मसात करणे, नवीन भाषा समजून घेणे. गांधीजींच्या मते हा विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचा अपव्यय आहे. त्यांचा इंग्रजी माध्यमाला तर विरोध होताच. तसेच एकंदर ब्रिटिश शिक्षणपध्दतीलाच विरोध होता. ब्रिटिश राज्ययंत्रणेचे साधन व्हावे म्हणून दिले जाणारे शिक्षण घ्यायलाच नको. गांधीजी म्हणतात की, आपल्याला ब्रिटिशांचे गुलाम म्हणून रहायचे नाही, तर स्वराज्याची स्थापना करायची आहे.

ब्रिटिशांचे राज्य घालविण्यासाठी व त्यांना विरोध करण्यासाठी गांधीजींची खास अशी एक पध्दत होती. त्यांच्या मते आधी सत्ता आपल्या हातात आली पाहिजे, स्वराज्य निर्माण झाले पाहिजे. (स्वराज्य ही इतर कोणत्याही गोष्टीची मूळ अट असली पाहिजे.) ब्रिटिश सत्ता घालवण्यासाठी उपयुक्त असलेले व स्वराज्य मिळविण्यासाठी काही मार्ग त्यांनी सांगितले आहेत. गांधीजी ब्रिटिशांचे सामर्थ्य ओळखून होते. त्यांच्याशी समोरसमोर दोन हात करण्यापासून केवळ मनुष्यहानी होईल. त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. शस्त्रबलाच्या संदर्भात भारतीयांची शक्ती फार तोकडी पडणार आहे, याची स्पष्ट कल्पना गांधीजींना होती. युध्दाने

कोणतेही प्रश्न सुटणार नाहीत. हिंसा ही साध्य असू शकत नाही म्हणून अहिंसेच्या मार्गांने आपण आपल्या समस्यांची सोडवणूक केली पाहिजे. गांधीजींनी स्वराज्यप्राप्तीसाठी सत्याग्रह असहकार इत्यादी मार्ग सांगितले. ब्रिटिशांना येथे जी राज्ययंत्रणा उभी करावयाची आहे, त्यासाठी लागणारी प्रत्येक गोष्ट, माणसे तर त्यांना त्यांच्या देशांतून आणता येणे शक्य नाही. अशा वेळी त्यांचे एकंदर धोरण उलथून पाडण्यासाठी असहकार पुकारला पाहिजे. त्यांना कोणत्याच बाबतीत सहकार्य करायला नको. म्हणून मग त्यांनी देऊ केलेले शिक्षणही आपण घ्यायला नको.

ब्रिटिशांना असहकार करण्याच्या भूमिकेतून गांधीजींनी त्यांच्या शिक्षणपध्दतीला विरोध केला. शिक्षण ही सुध्दा अनेक असहकार करावयाच्या बाबींपैकी एक होय. सुरवातीला गांधीजींनी शिक्षणाच्या संदर्भात जे म्हटले त्याची व्याप्ती छोटीशी होती. असहकार करावयाची एक बाब, एवढेच मर्यादित स्थान शिक्षणविषयक विचारांना गांधीजींनी दिलेले होते. आपल्या देशांतून ब्रिटिशांना हाकलून लावायचे असेल, त्यांच्या गुलामगिरीतून मुक्त व्हायचे असेल तर आम्हाला गुलाम बनविणाऱ्या शाळांमधून बाहेर पडले पाहिजे. ब्रिटिशांच्या शाळा बंद पाडल्या पाहिजेत. त्यांच्या एकंदर शिक्षणपध्दतीशी असहकार पुकारला पाहिजे.

आधुनिक शिक्षणाच्या संदर्भात गांधीजी म्हणतात की, या शिक्षणाचा मुख्य हेतू हाच दिसतो की, शिक्षण मिळाल्याने एक खास विशिष्ट तऱ्हेची नोकरी मिळविण्यास लायक बनणे. वेगवेगळया धंद्याचे लोक शिक्षण घेतल्यावर आपला व्यवसाय सोडून नोकरी शोधू लागतात व नोकरी मिळाली की, आपली प्रगती झाली असे मानतात. आपल्या शाळांतून गवंडी, सुतार, लोहार, शिंपी, चांभार यांची मुले शिकतात. परंतु शिक्षण मिळाल्यानंतर वाडवडिलांचा धंदा पुढे चालविण्याऐवजी व त्यांत प्रगती करण्याऐवजी तो हलका

समजून त्याचा त्याग करतात आणि कारकुनाची नोकरी मिळविण्यात मोठी धन्यता मानतात. त्यांचे आईबापही या विचाराचीच री ओढतात. अशा रीतीने आपण जाति आणि कर्म या दोहोंनाही मुकून गुलामगिरीतच रूतून बसतो.

गांधीजींनी केवळ पुस्तकी ज्ञान देणाऱ्या शिक्षण पध्दतीवर नेहमीच टीका केली. वाङ्मय प्रधान शिक्षण पध्दतीवर देव्हारे माजवण्याची कल्पना त्यांना कधीच रचली नाही. केवळ लिहिण्या वाचण्याच्या शिक्षणाने माणसाच्या नैतिक उंचीत भर पडत नाही. विदेशी माध्यमातून शिक्षण घेतल्यामूळे आमची सर्जनशक्ती व कल्पनाशक्ती नष्ट झाली आहे. आमचा सारा वेळ परकी भाषेचे उच्चार व वाक्प्रचार पाठ करण्यात खर्ची पडतो. आपण अनुकरण करणारे लोक आहोत असा आपल्यावर काही इंग्रजांनी आरोप केला आहे. संस्कृतीच्या बाबतीत शाई शोषून घेणाऱ्या टिपकागदाची उपमा दिली आहे. ज्याप्रमाणे जरूरीपेक्षा जादा असलेली शाई शोषून घेण्याचे काम टिपकागद करतो, त्याप्रमाणे तिच्यातील दोष टिपून घेण्याचे काम आपण करतो. ब्रिटिशांच्या शिक्षणपध्दतीचा परिणाम असा झाला की, आपण युरोपिअन संस्कृतीचे टिपकागद बनलो आहोत. तिच्यातील चांगला भाग उचलण्याऐवजी त्यांचे हीन अनुकरण आम्ही केले आहे.

दुसरा परिणाम असा झाला आहे की, आम्ही सुक्षिक्षित व इतर सामान्य लोक यांच्यात फार मोठी तफावत पडली. त्यांना जी भाषा समजते, त्या भाषेत राजकारण तर राहोच, पण आरोग्य व लोकहित याबद्दलचे विचारही आपण त्यांना समजावून देऊ शकत नाही. इग्रंज शिक्षण घेऊन आपण राष्ट्राला गुलाम बनविले आहे. इंग्रजी जाणणाऱ्या लोकांना स्वकीयांना फसविण्यात त्यांच्यात भीतीचे वातावरण निर्माण करण्यात कधीच संकोच वाटला नाही. ब्रिटिशांनी नैतिक शिक्षणाची फार अपेक्षा केली. म्हणून या शिक्षणाशी

असहकार केला पाहिजे. असहकार याचा अर्थ पापाशी संबंध न राखणे असा आहे. जर आम्ही हा संपर्क प्रामाणिकपणे व विचारपूर्वक तोडीत असू तर आम्ही योग्य दिशेने वाटचाल करू शकू.

गांधीजी ब्रिटिश शिक्षण पध्दतीला विरोध करीत असले तरी ते शिक्षणाची जरूरी मानतातच. अक्षर ओळख व्हायला हवी, याचा अर्थ लिहिणे-वाचणे म्हणजे सर्व काही नव्हे. ते साध्य नसून केवळ साधन आहे. ज्याला विचारशक्ती आहे, त्याला अक्षरज्ञान नसले म्हणून काय बिघडले जगाचे मोठमोठे शिक्षक व सुधारक फार विद्वान नव्हते. येशू व पैगंबार महंमद यांना कुठे अक्षरज्ञान होते. तरी पण त्यांनी जगाला केवढे ज्ञान दिले, शहाणपण शिकविले व जगाची सेवा केली, तेवढी बड्या-बड्या तत्त्वज्ञांनी व अर्थशास्त्रज्ञांनीही केलेली नाही व ते करू शकणार नाहीत. म्हणून शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच मूलतः बदलला पाहिजे. मुलाने किंवा मुलीने शिकून मोठे होणे याचा अर्थ पैसा मिळविणे, प्रतिष्ठा मिळविणे, किर्ती मिळविणे ती म्हणजेच पर्यायाने इहलोकांतील आयुष्य सुखाने व्यतीत करणे असा केला जातो. (शिक्षण आणि सामाजिक जीवन यांचे एक विशिष्ट नीतीशास्त्र त्यांच्या मनांत असते.) आपण जरा डोळे उघडून आजुबाजूला पाहिले की, न शिकताच मोठी झालेली माणसे आपल्याला बरीच दिसतात. उलटपक्षी खूप शिकूनही 'मोठी' न झालेली माणसेही आपल्याला दिसतात. म्हणून पदवी मिळविणे व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर काही गोष्टी (पैसा, सत्ता) मिळविणे, शिक्षणाचा एवढा मर्यादित अर्थ न घेता व्यापक दृष्टिकोनातून शिक्षणाकडे बघितले पाहिजे.

येशू ख्रिस्त, महंमद पैगंबर यांचे उदाहरण घेतल्यामूळे गैरसमज होणे शक्य आहे. गांधीजींना यांतून अक्षर ज्ञानावाचून काम चालत नाही, असे मुळीच नाही, हे दाखवून द्यायचे आहे. आजही

जगातील लोकसंख्येचा मोठा हिस्सा निरक्षर लोकांचा आहे. पण म्हणून ते लोक काही मूर्ख नाहीत. त्यांच्या सम सामान्य समजशक्तीनेही जगाचे व्यवहार चालू आहेत. हे सर्व लिहिण्याचा उद्देश असा की, जोपर्यंन्त स्वातंत्र्याची लढायी चालू आहे, तोपर्यंन्त आमची मूले जरी शिक्षणावाचून राहिली तरी त्यामूळे व जगाचे व त्यांचे नुकसान होणार नाही उलट फायदाच होईल. ज्याप्रमाणे एखादे घर विषारी वायूने भरले की, ते त्या वेळेपुरते सोडून देण्यातच लहाणपण आहे त्याप्रमाणे विषासमान असलेल्या या सरकारी शाळा सोडण्यातच फायदा आहे. (तोपर्यंन्तच्या अवधीत विद्यार्थ्यांना मोकळ्या खुल्या जागेत शिकवावे. त्यांच्याकडून सूत कातून घ्यावे, गाणी-भजन म्हणून घ्यावीत व खेळ घ्यावेत.)

गांधीजींच्या एकंदर विचारावरून असे दिसून येते की, शिक्षण-पध्दती ही समाजव्यवस्थेचा मार्ग बनली पाहिजे. ज्या समाजाचे आपण घटक आहोत त्या समाजाबद्दल विचार करायला लावणारे, समाजात वावरतांना वैयक्तिक आयुष्य त्यांतील श्रध्दा आणि मूल्ये, आणि आपले इतरांबरोबरच सबंध यांचा विचार करायला लावणारे शिक्षण दिले जावे. गांधीजी हे जीवनाचा समग्रपणे विचार करणारे तत्त्वचिंतक होते. शिक्षणाची आणि जीवनाची फारकत करता येत नाही हे तत्त्व गांधीजींना अनुभवातून कळले होते. गांधीजींच्या मते व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनाला जर नवे वळण, नवी दिशा द्यावयाची असेल, त्यांत परिवर्तन घडवायचे असेल तर शिक्षणात फार बारकाईने लक्ष पुरविले पाहिजे. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे व नवनिर्मितीचे एक प्रभावी साधन आहे.

गांधीजी म्हणतात की आजच्या शास्त्रांचे मूल्यमापन केले तर असे दिसून येते की इंद्रियांवर ताबा मिळविण्याच्या दृष्टीने त्यांचा काही एक उपयोग नाही. त्यांतून हा हेतू साध्य होतो त्यालाच

खरे शिक्षण म्हणता येतील. तुम्ही प्राथमिक शिक्षण घेतले आहे की उच्च शिक्षण हे महत्त्वाचे नाही, ते शिक्षण आम्हाला कितपत माणूस बनविते यावरून त्याची योग्यता ठरणार आहे. गांधीजी म्हणतात की, उच्च शिक्षण मिळाले नाही म्हणून माझे जीवन वाया गेले असे नाही. ते काही शिक्षण मला मिळाले आहे त्याचा मी उपयोग करतो. लाखो लोकांसाठी नसला तरी निदान काही लोकांसाठी तरी मी माझ्या शिक्षणाचा उपयोग करतो. यातच शिक्षणाच्या दुष्परिणामापासून मी मुक्त होण्याचा प्रयत्न करतो आहे याची ग्वाही मिळते. मी माझ्या अनुभवाचा इतरांना फायदा करून देतो व शिक्षण कुचकामीपणा घालवितो.

प्रकरण तिसरे
गांधीजींचे शिक्षणविषयक तत्त्वज्ञान

या प्रकरणात आपल्याला गांधीजींचे एकंदर तत्त्वज्ञान व शिक्षणविचार यांच्या परस्परसंबंधाचा विचार करावयाचा आहे. प्रत्येक माणसाचे स्वतःचे असे जीवनविषयक तत्त्वज्ञान असते. विविध तत्त्वज्ञानातून जीवन जगण्याचे विभिन्न मार्ग स्पष्ट होतात. आपल्या तत्त्वज्ञानाचा इतरांवर प्रभाव पडावा असे वाटते, ते स्वाभाविक असते. इतरांवर प्रभाव पाडणे, मन वळविणे या गोष्टी काही वेळा जाणतेपणी, काही वेळा अजाणतेपणी शिक्षणातून केल्या जातात. यालाच वेगळ्या भाषेत नैसर्गिक व्यक्तिविकासाला वळण लावणे असे म्हणता येईल. अशा प्रकारे तत्त्वज्ञानाची परिणती शैक्षणिक प्रयत्नांमध्ये होते. सर जॉन ॲडम यांच्या मते, शिक्षण ही तत्त्वज्ञानाची प्रभावी बाजू आहे. तत्त्वज्ञानात्मक (belief) श्रध्देची कृतिशील बाजू म्हणजे शिक्षण जीवनाचे आदर्श (प्रत्यक्षात आणणे) प्रत्यक्ष व्यवहारात आणण्याचे साधन म्हणजे शिक्षण.

जॉन रॉस यांनी तत्त्वज्ञान व शिक्षण. या दोन्हीतील परस्पर संबंध पुढील शब्दात सांगितला, ‘शिक्षण व तत्त्वज्ञान या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पहिली तात्त्विक आहे आणि दुसरी कृतिशील आहे. ज्याच्याजवळ जीवनावश्यक श्रध्दा आहेत त्या तो दुसऱ्यापर्यंन्त पोहोचवितो, त्या दुसऱ्या व्यक्तीच्याही श्रध्दा दृढ करतो.

शिक्षण हे मूलतः तत्त्वज्ञानावर अवलंबून आहे. अनेक श्रेष्ठ तत्त्वज्ञ हे श्रेष्ठ शिक्षणतज्ञ होते यावरून वरील गोष्ट स्पष्ट होते. शैक्षणिक बदल शैक्षणिक चळवळी या निरनिराळ्या तात्त्विक भूमिकेतून झालेल्या दिसून येतात. असा तत्त्वक ज्याच्याकडे आदर्श स्वप्ने आहेत, तो बहुधा शिक्षणज्ञ बनतो. आपल्याला अशी

कितीतरी (स्वच्छ) उदाहरणे स्पष्टपणे दाखवून देता येतील ज्यांत शिक्षण हे तत्त्वज्ञानावर अवलंबून आहे. उदा. पाश्चात्यांमध्ये अगदी सॉक्रेटिसपासून जॉन डयुईपर्यंन्त आणि पौरस्त्यामध्ये याज्ञवल्क्यां पासून ते गांधीजींपर्यंन्त.

शैक्षणिक विचारवंतांमध्ये दोन वेगवेगळे विचारप्रवाह दिसून येतात.

१. व्यक्तिविकास हे शिक्षणाचे ध्येय, २. सामाजिक विकास हे शिक्षणाचे ध्येय. या दोन मतप्रणालींमधील संघर्ष अशाप्रकारे मिटविता येईल की व्यक्तिविकास व सामाजिक विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. गांधीजींना या दोन्हीत कधीच विरोध जाणवला नाही. किंबहुना या दोन्हींची त्यांनी व्यवस्थित सांगड घातली. त्याच्या मते शिक्षणातून सामाजिक प्रगतीचा विचार करणारी सर्वांगीण विकसित व्यक्ती तयार व्हावी.

नवीन पध्दत :

गांधीजींच्या शैक्षणिक विचारांचा निरपेक्षपणे अभ्यास करायचा झाल्यास आपल्याला असे दिसून येईल की, त्यांनी नवीन शैक्षणिक सिध्दांताचा पाया घातला व तो कृतीत कसा आणता येईल हे सुध्दा स्पष्ट केले. त्यांच्या शैक्षणिक विचारांच्या दोन बाजू आहेत. त्यांनी सध्याच्या शैक्षणिक पध्दतीमधील दोष दाखवून ती कशी निरूपयोगी आहे, किंबहून घातक आहे हे स्पष्ट केले. नवीन शिक्षणपध्दती सविस्तरपणे सांगितली.

अनुभवाचा आधारः

गांधीजी शिक्षणाच्या संदर्भांत जे कांही बोलतात त्याला त्यांच्या अनुभवाचा आधार आहे. ट्रान्सवालमधील लोकांसाठी त्यांनी ज्या शाळा काढल्या, जे शैक्षणिक प्रयोग केले, त्यांतून गांधीजींना नवीन शिक्षणपध्दती कशी राबविता येतील याचा अंदाज आला. त्यांनी सांगतलेली शिक्षणपध्दती ही अनुभवपूर्व नाही तर अनुभवोत्तर

आहे. त्यांनी नव्या शिक्षणपध्दतीचा प्रयोग केला, त्यांतील गुणदोषांचा विचार केला, ती व्यवहारात कशी आणता येईल याचा विचार केला, त्यानंतर शिक्षणविषयक सिध्दान्त मांडला. टॉलस्टॉयची भूमी (Tolstoy Farm) ही त्यांची प्रयोगशाळा होती, जेथे त्यांनी शैक्षणिक प्रयोग केले.

भारताला उपयोगी :

गांधीजीच्या वेळी जी प्रचलित शिक्षणपध्दती होती ती बदलण्याची वेळ आली होती. त्यावेळी गांधीजींनी स्पष्टपणे नमूद केले की, पुस्तकी ज्ञान (साक्षरता) हे काही शिक्षणाचे ध्येय असू शकत नाही, किंबहूना याला शिक्षणाची सुरवातही म्हणता येणार नाही. स्त्री पुरूषांच्या शिक्षणाचे ते केवळ एक साधन आहे. केवळ पुस्तकी ज्ञान हे (स्वतःच) शिक्षण असत नाही. गांधीजींना स्वतःला भारताला उपयोगी अशी शिक्षणपध्दती सांगायची होती.

इंग्रजांनी जे काही शिक्षण देऊ केले त्यामूळे बहुसंख्य लोक शहराकडे धाव घेऊ लागले. शहरीकरण वाढले, ग्रामीण उद्योगधंदे पूर्वी सारखे चालेनासे झाले. हातमागावरील कापड, खादी यांची मागणी कमी कमी होत गेली. जो तो मिलचे कापड वापरू लागला. अप्रत्यक्षपणे इंग्रज येथे स्थिरावण्याला आपणच प्रोत्साहन दिले. समाज एकप्रकारे ढवळून निघाला.

अशावेळी गांधीजींनी सांगितले की, भारत जर स्वतंत्र व्हावयास हवा असेल तर ब्रिटिशांना सर्व बाबतीत असहकार केला पाहिजे. त्यांनी देऊ केलेल्या नोकऱ्या घ्यायला नकोत. त्यांनी तयार केलेल्या वस्तू नकोत. त्यांनी दिलेले शिक्षण नको. (कारण ते इंग्रजांना आपली सत्ता राबविता यावी म्हणून आहे.) इंग्रजांवर सर्व बाबतीत अवलंबून राहून त्यांच्याकडून स्वातंत्र्याची अपेक्षा केली तर ती कधीच पूर्ण होणार नाही. आधी आपण स्वावलंबी झाले पाहिजे. म्हणून त्यांनी स्वदेशीचा पुरस्कार केला. देशात उपयोगी अशी

शिक्षणाची पध्दती सांगितली. ग्रामीण उद्योगधद्यांला उत्तेजन दिले. हस्तव्यवसायाव्दारे शिक्षण या तत्त्वाचा पुरस्कार केला. अशा प्रकारची शिक्षणयोजना यशस्वीपणे राबवावी यासाठी सर्व दृष्टीने प्रयत्न केला.

गांधीजींच्या मते शिक्षण हे कृतीव्दारे अनुभवातून देण्यात यावे. त्यासाठी ते हस्तव्यवसायाव्दारे शिक्षण सांगतात. त्यांतून त्यांना व्यक्ती सर्वांगीण, शारीरिक, बौध्दिक व आत्मिक विकास अभिप्रेत आहे.

भारतात नागरिकत्वाची जाणीव निर्माण करणे आवश्यक होते. सामाजिक, आर्थिक, राजकीय, सर्वच क्षेत्रात लोकशाहीच्या तत्त्वांचा अवलंब होणे आवश्यक होते. त्यावेळी देशाच्या समस्यांची सोडवणूक करणारी, हक्कांची जाणीव करून देणारी शिक्षणपध्दती गांधीजींनी सांगीतली.

समाज-परिवर्तन :

आदर्श समाजाची निर्मिती हे गांधीर्जीचे ध्येय आहे. गांधीजींना अभिप्रेत असलेला समाज हा शोषणरहित, जातिभेदरहित, वर्गभेदरहित असा आहे. समानतेवर आधारलेला स्वावलंबी समाज हे गांधीजींचे स्वप्न आहे. कारखान्यातून थोड्या लोकांच्या हातात अमाप संपत्ती एकवटली जाते, याला गांधीजींचा विरोध आहे. खूप मोठ्या प्रमाणावर खाजगी व्यापार, तसेच मोठ्या प्रमाणावर जमीनदारी यांच्याविरूध्द गांधीजी आहेत.

गांधीजींच्या मते हा जो श्रीमंत वर्ग आहे, तो इतरांची पिळवणूक करून अन्याय्य मार्गाने पैसा मिळवितो. श्रीमंत लोक शोषण करून दिवसेंदिवस अधिकाधिक श्रीमंत होत जातात. गरिबांच्या मात्र किमान गरजाही मागत नाहीत. गांधीजींच्या प्रयत्नामुळे सर्वांच्या किमान गरजा तरी भागविल्या जाव्यात यासाठी आहे. कारण किमान गरजांची पूर्ती ही सुसंस्कृत व नैतिक जीवनाची

आवश्यक अट आहे. म्हणून गांधीजी नव्या शिक्षणपध्दतीतून किमान आवश्यक गरजांच्या पूर्तीचा मार्ग स्पष्ट करतात.

अहिंसा :

गांधीजींना जे समाजपरिवर्तन करायचे आहे ते अहिंसेवर आधारित असे आहे. ते म्हणतात की, भारतातून हिंसा नष्ट करण्याचा आपण निश्चय केला पाहिजे. या कार्यांत नवीन शिक्षणपध्दती महत्त्वपूर्ण वाटा उचलणार आहे. इंग्लंडमध्ये लाखो रूपये शिक्षणावर खर्च होतात, अमेरिकेतही कितीतरी संपत्ती शिक्षणासाठी वापरली जाते. परंतु ही सारी संपत्ती शोषणातून मिळविलेली असते. मोठ्या प्रमाणात शोषण केलेल्या संपत्तीतून महागडे शिक्षण देऊ शकतात. आपण मात्र शोषणाचा विचारसुध्दा मनात आणायला नको. म्हणून आपल्याला अहिंसेवर आधारलेली शिक्षणपध्दती पाहिजे आहे.

गांधीजींना नवीन शाळांमधून जे शिक्षण द्यायचे आहे, त्याव्दारा आपल्या समस्यांची सोडवणूक करायची आहे. त्यासाठी आपण 'अहिंसे' वर लक्ष केंद्रित केले पाहिजे. हिटलर आणि मुसोलिनी यांनी 'हिंसा' हे शिक्षणाचे मूलभूत तत्त्व ठरविले होते. पण आपले तत्त्व अहिंसा आहे. म्हणून आपल्याला आपल्या सर्व समस्या अहिंसात्मक मार्गांने सोडवायच्या आहेत. आपले अंकगणित, आपले विज्ञान, आपला इतिहास हा सर्वांसाठी आहे. अहिंसेच्याच मार्गांने आपल्याला जायचे आहे. या विषयातील सर्व समस्यांना अहिंसेचा रंग आपल्याला द्यायचा आहे.

आतापर्यंन्तचा इतिहास हा युध्दाचा, हिंसेचा इतीहास होता. परंतु यापुढील काळात जी काही इतिहास येथील तो 'माणसाचा' असेल, अहिंसेचा असेल. अहिंसात्मक प्रगतीचा इतिहास पुढील काळात येईल असे गांधीजी म्हणतात.

गांधीजींना अहिंसा केवळ ब्रिटिशांशी सामना करण्याच्या संदर्भांतच अभिप्रेत आहे असे नाही. अहिंसेत तत्त्वाचे स्वरूप इतके मर्यादित नाही, तर देशांतील सर्व अंतर्गत समस्यांची सोडवणूक करताना अहिंसा अभिप्रेत आहे. अहिंसा हिंदू-मुसलमानांच्या ऐक्यासाठी आहे, वर्गभेद, जातिभेद निवारणासाठी तसेच शिक्षणाच्या संदर्भांतही आहे.

मानसशास्त्रीय आधार :

गांधीजींच्या मते शिक्षणाने विद्यार्थी फक्त काही गोष्टी करण्यास शिकतो असे नाही, तर त्यांतून विद्यार्थ्यांची घडण होत जाते. विशिष्ट वयात जे काही आपण शिकतो, त्याचा कायम ठसा आपल्या व्यक्तिमत्वावर उमटतो. शिक्षणाने दृष्टिकोन बदलतो, विचार (कल्पना) बदलतात. मतांना वळण लागते आणि मानवी स्वभावाचे ज्ञान होते.

आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास हे आपण शिक्षणाचे ध्येय ठरविले आहे. या दृष्टिकोनातून पाहिले तर आपल्या सर्व प्रकारच्या क्षमता नैसर्गिक वृत्ती, सहजप्रवृत्ती व भावना आणि सर्व प्रकारच्या शक्ती यांचा विकास व त्यांच्यात परस्पर सुसंवाद ह्या गोष्टी गांधीजींना शिक्षणामध्ये अभिप्रेत आहेत. हृदयात शिक्षणामध्ये भावनांचे संतुलन, प्रेमभावनेचा सजगपणा (जागरूकता), सहानुभाव, सौन्दर्यदृष्टी या गोष्टी अभिप्रेत आहेत.

अनेक प्रकारची माहिती देऊन विद्यार्थ्यांच्या मेंदूला त्रास द्यायचा याला गांधीजींचा विरोध आहे. कृतीव्दारा शिकविले तर विद्यार्थी अधिक उत्साहाने शिकतात. मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून कृतीव्दारा शिक्षणाचे महत्त्व आहे. कारण त्यामूळे भौतिक साधनांचे महत्त्व कळते, साधनांचा योग्य वापर कसा करावा हे माहीत होते.

या पध्दतीने शिक्षण अधिक स्वाभाविक होते. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळतो व ते लवकर शिकतात. आपल्या मेंदूमध्ये जी केंद्रे

असतात ती आपल्या वेगवेगळ्या कृतीमध्ये सत्संबंध निर्माण करतात. नव्या पध्दतीत ही केंद्रे अधिक सक्रीय बनतात. मेंदूमधील निरनिराळ्या केंद्रांमधील संबंध अधिक स्पष्ट व दृढ स्वरूपाचे होतात. गांधीजींच्या शिक्षणपध्दतीची मुळे मानवी मानसशास्त्रात खोलवर रूजली आहेत.

आपल्यापैकी काही जणांना अन्नाची मूक भागविण्यासाठी फारसे परिश्रम करावे लागत नाहीत. म्हणून उत्पादन शक्तीला प्रेरणा देणारे काहीतरी त्यांना हवे असते. विणण्याच्या कृतीने त्यांना संधी मिळते, व्याप्ती मिळते. लहान मुले जेव्हा विणण्याची कृती करीत असतात, तेव्हा त्यांच्या शारिरिक व बौध्दिक शक्तीना व्यायाम मिळतो. त्यांना जी आवड निर्माण होते, तिचा भावी जीवनात उपयोग होतो. हस्तव्यवसायामूळे त्यांना मानवत्व प्राप्त देता येते.

जीवनातील सुरवातीची जी काही महत्त्वाची वर्षे असतात त्यावेळी चांगले संस्कार होणे आवश्यक असते. कारण त्यावेळी जे काही वळण लागते त्याचा आयुष्यभर परिणाम राहतो. गांधीजींच्या शिक्षणपध्दतीतून आत्मविश्वास वाढतो.

समाजशास्त्रीय आधार :

गांधीजी म्हणतात की, राष्ट्राची किंवा देशाची घडण करण्याची जबाबदारी शाळांवर आहे. शाळेचे ध्येय केवळ स्कोलर निर्माण करणे हे नाही, तर संपूर्ण व्यक्ती, आदर्श गृहस्थी जे आपल्या कुटुंबाचा विकास साधतात तसेच समाजाच्या व देशाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करतात.

कृतीव्दारा विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे आणि सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीवर मात करावी. यांतून गांधीजींच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानातील आणखी एक घटक स्पष्ट होतो. तो म्हणजे शिक्षणाने

सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी. शिक्षणातून विद्यार्थी हक्कांबरोबरच सामाजिक कर्तव्याचीही जाणीव व्हावी.

शिक्षणाने सामाजिक परिस्थितीची योग्य जाणीव होते, त्यामूळे समायोजन कसे करावे हे ठरविता येते. माणूस हा समाजशील प्राणी आहे. सामुदायिक जीवनात सुरक्षितता असते आणि परस्पर सहकार्यांची आवश्यकता निर्माण होते. शिक्षणाची उद्दिष्टे ही सामाजिक कृतीशी निगडित असतात. म्हणून गांधीजी म्हणतात की, शिक्षण म्हणजे अशी प्रक्रिया जी माणसाला हिंसात्मक सामाजिक व्यवस्थेत भूमिका पार पाडण्याच्या दृष्टीने तयारी करून घेते. आपल्याला लोकशाही समाजव्यवस्था हवी आहे म्हणून गांधीजी मोफत व सक्तीचे शिक्षण सर्वांना देऊ इच्छितात. नागरिकाच्या कर्तव्याची जाणीव शिक्षणातून निर्माण झाली पाहिजे. स्वातंत्र्य टिकण्यासाठी, सुरक्षित राहण्यासाठी शिक्षण आवश्यक असते.

शिक्षणाचा सामाजिक दृष्टीने विचार करताना गांधीजी आणखी एक महत्त्वाचा भेद स्पष्ट करतात. शिक्षणाने जातिभेद, वर्गभेद इत्यादी प्रकारची विषमता दूर व्हावी. बौध्दिक श्रम करणारे व शारिरिक श्रम करणारे यांच्यातील दरी नाहिशी व्हावी. माणूस म्हणून असणारी प्रतिष्ठा मजूरांनाही मिळावी.

गांधीजींचा प्रेम, न्याय, सत्य, सहकार्य, स्वातंत्र्य, समता, बंधुता, राष्ट्रीय एकात्मकता इत्यादी आदर्शांवर भर आहे. या गोष्टी शिक्षणातून साधता याव्यात यासाठी ते हस्तव्यवसायाव्दारे शिक्षण सांगतात. गांधीजीच्या मते नागरिकत्वाच्या नवीन प्रकाराची ओळख शिक्षणाने गरीब आणि श्रीमंत यांतील फरक दूर झाला पाहिजे, परावलंबित्व नाहिसे झाले पाहिजे. शिक्षणाव्दारे गांधीजीनी मूक सामाजिक क्रांती सांगितली.

हस्तव्यवसाय करणाऱ्या मुलांना सामाजिक समता, समाजसेवाची शिकवण मिळते. शिक्षणाव्दारे गांधीजी समाजाला

सुघटित, कुटूंब बनवू इच्छितात. भारताचा सांस्कृतिक वारसा टिकविणारी, गरजा भागविणारी, न्यायावर-सत्यावर आधारित नवीन समाजरचना प्रत्यक्षात आणणारी शिक्षणयोजना सांगितली आहे.

(आर्थिक) अर्थशास्त्रीय आधार :

कोणताही माणूस खऱ्या अर्थाने स्वतंत्र आहे असे म्हणता येत नाही. जोपर्यंन्त त्याच्या अन्न, वस्त्र, निवारा या जीवनावश्यक गरजा भागत नाहीत. केवळ शारिरिक गरजा भागविण्यातच जर सर्व शक्ती पणाला लावावी लागली तर तो आत्मिक विकास केव्हा करणार? आर्थिक (कार्य) (Function) घटक हा जीवनातील अनेक महत्त्वाच्या (कार्यांपैकी) घटकापैकी एक आहे. पण जर हे समाधानकारकपणे पार पडले नाही तर संपूर्ण जीवनावर त्याचा वाईट परिणाम होतो.

१. आपण जे काही शिक्षण घेऊ त्या शिक्षणाचा भावी जीवनात उपयोग झाला पाहिजे. कोणता तरी व्यवसायक करण्याची क्षमता निर्माण व्हावी. गांधीजी बेकारीचे मूलतः निवारण कसे करता येतील ते (सांगतात) स्पष्ट करतात.

२. स्वावलंबनाचा दुसरा अर्थ शिक्षणाचा खर्चही त्यातून निघावा. विद्यार्थी शिक्षणाच्या खर्चासाठी आईवडिलावर आर्थिकदृष्ट्या अवलंबून रहावयास नको.

हस्तव्यवसायाला केंद्र कल्पून अध्यापन पध्दती ठरविण्यात यावी असे गांधीजींचे मत आहे. हस्तव्यवसायाची निवड व अंमलबजावणी अशा प्रकारे करण्यात यावी की शिक्षकाचे वेतनही त्यांतून बाहेर पडावे.

अहिंसात्मक व शोषणरहित समाज हा आर्थिक वर्गांवर जरी आधारित नसला तरी त्या समाजाचे काही एक अर्थशास्त्र असतेच. समाजातील प्रत्येकालाच आपल्या गरजा भागविण्यासाठी काहीतरी करावे लागते. गांधीजी आपल्या शेजाऱ्यांना त्रास देऊन नव्हे तर

सहकार्य करून गरजा भागवा असे म्हणतात. आपण आपल्या नैसर्गिक शक्तीचा योग्य वापर कसा करावा हे स्पष्ट झाले पाहिजे.

गांधीजींव्यतिरिक्त ज्यांनी हस्तव्यवसायांचे महत्त्व स्पष्ट केले, त्यांनी शिक्षणात हस्तव्यवसायाला एक विषम म्हणून स्थान दिले. परंतु गांधीजी हस्तव्यवसायाच्या माध्यमातून शिक्षण देण्यास सांगतात. त्यामूळे हस्तव्यवसायाला आर्थिक महत्त्व तर असतेच त्याचबरोबर एकुण जीवनातील स्थान स्पष्ट होते.

भारत हा प्रामुख्याने शेतकीप्रधान देश असल्यामुळे सूत कताई, विणकाम, सुतारकाम इत्यादी हस्तव्यवसाय गांधीजी सुचवितात. गांधीजींनी शिक्षणाच्या संदर्भांत सांगितलेले स्वावलंबनाचे तत्त्व शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण ठरले. सरकार जेव्हा मोफत आणि सवलतीच्या शिक्षणाचा पुरस्कार करील, त्यावेळी खर्चांचा भार सरकारवर पडणार नाही. शिका आणि मिळवा हे तत्त्व गांधीजींनी सांगितले. विद्यार्थी जेव्हा एकाच वेळी उत्पादक कार्य करतो व शिकत असतो तेव्हा त्याला त्यातून आनंद मिळतो. भविष्यातील त्याच्या व्यवसायाची शाश्वती असते, त्यामूळे तो काळजीपासून मुक्त असतो.

सत्य :

गांधीजी म्हणतात की, सर्व धर्मांचा साकल्याने विचार केल्यानंतर आपल्याला असे दिसून येते की, सर्व धर्मांची तत्त्वे एकच आहेत. ही तत्त्वे पुस्तकाच्या किंवा शब्दाच्या सहाय्याने शिकविता येणार नाहीत. मुले या गोष्टी शिक्षकाच्या दैनंदिन जीवनातूनच शिकू शकतात. सत्याच्या, न्यायाच्या तत्त्वानुसार, विचारानुसार शिक्षक जर जगत असेल तरच मुलांना सत्याचे व न्यायाचे शिक्षण मिळेल.

गांधीजी एका कॉलेजच्या स्नेहसंमेलनात भाषण करतांना म्हणतातः तुमचे सध्याचे शिक्षण अगदी निरूपयोगी आहे. कारण ते

पावित्र्याच्या व सत्याच्या भक्कम पायावर आधारलेले नाही. तुम्ही मुले जर वैयक्तिक शुध्दतेच्या (पावित्र्याच्या) संदर्भांत काळजी घेत नसाल, आचार, विचार, उच्चार यांच्या शुध्दतेच्या संदर्भांत काळजी घेत नसाल तर मी असे म्हणेन की, तुम्ही स्कॉलर असलात तरी सर्वस्व हरलेले आहात.

गांधीजी शैक्षणिक ध्येयाचे दोन गट सांगतात : १. तात्कालिक, २. अंतिम. तात्कालिक ध्येयामध्ये जीवनाच्या विभिन्न अंगाचा विचार केला जातो. उदा. आर्थिक विकास. आर्थिक गरजांची पूर्ती हे तात्कालिक ध्येय म्हणता येईल. चांगले जीवन, आदर्श मानवी जीवन या दृष्टीने चारित्र्याची घडण हे शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे. जे स्वत्वाच्या पूर्णत्वातून आत्मशोधना (Self Realisation) मधून प्राप्त होते, यालाच सत्य म्हणतात. गांधीजींचे सत्य हेच परमेश्वर आहे.

शिक्षणासंबंधी वस्तुनिष्ठ विचार :

पहिल्या प्रकरणात आपण विधान व मत यांतील फरक स्पष्ट केला. तुलनेने मतापेक्षा विधानाशी ज्ञानाचा जवळचा सबंध आहे. एखाद्या वस्तूबद्दल, घटनेबद्दल, व्यक्तीबद्दल आपण आपले मत सांगतो, माहीती देतो. त्यावेळी आपण दिलेली माहिती किंवा आपण दिलेले मत हे खुलासेवार असेलच असे नाही. ज्ञान मात्र वस्तुकेंद्रित असते, ज्ञानामध्ये वस्तूची खुलासेवार माहिती गृहीत आहे. एखाद्या व्यक्तीचे अमुक एक मत आहे असे म्हणतो, तेव्हा त्यात व्यक्तीची आवड, निवड, तत्कालीन मानसिक स्थिती इत्यादींचा प्रभाव असतो. म्हणजेच मत हे व्यक्तिनिष्ठ असते, याउलट ज्ञान मात्र वस्तुनिष्ठ असते.

गांधीजी जेव्हा शिक्षणविषयक विचार मांडतात, त्यावेळी शिक्षणाच्या संदर्भात वस्तुनिष्ठ दृष्टिकोन स्पष्ट करतात. शिक्षणात आपल्याला कुणाचे तरी मत सांगायचे नसते तर ज्ञान द्यायचे असते.

म्हणजेच शिक्षणाचा पाया व्यक्तिनिष्ठ असावा की वस्तुनिष्ठ याला गांधीजींचे उत्तर शिक्षणाचा पाया वस्तुनिष्ठ असावा असे आहे.

गांधीजी जेव्हा शिक्षणाची ध्येये स्पष्ट करतात, अभ्यासक्रमाचे स्वरूप सांगतात, तेव्हा सुध्दा वस्तुनिष्ठ विचार व्यक्त करतात. अभ्यासक्रम, अध्यापन पध्दती इत्यादी बाबतीत वस्तुनिष्ठता असावी असे गांधीजी म्हणतात. हिटलर-मुसोलिनी यांनी जे शिक्षण द्यायचे ठरविले त्यांतून त्यांनी केवळ सैनिक निर्माण केले. शिक्षणाचे ध्येयच त्यांनी व्यक्तिनिष्ठ भूमिकेतून ठरविले. गांधीजींना विशिष्ट प्रणालीने भारलेले लोक नकोच आहेत, तसेच व्यक्तिपूजक भारलेले लोकही नको आहेत. तर देशाची उद्दिष्टे साधणारे साधन म्हणूनच शिक्षण असले पाहिजे. स्वतंत्र, स्वावलंबी भारतासाठी आवश्यक अशा शिक्षणाचे स्वरूप त्यांनी सांगितले. गांधीजींच्या मते आपल्या देशातील कोणतीही व्यक्ती उत्कर्षापासून वंचित राहू नये. प्रत्येकाला अन्न, वस्त्र निवारा पाहिजे. अशी साधने निर्माण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट ठरते.

एकंदर शिक्षणप्रक्रियेतील तारतम्य कशाच्या आधारावर ठरवणार? मताच्या आधारावर? का प्रणालीच्या आधारावर ? का ज्ञानाच्या आधारावर? गांधीजींच्या मते आपण जो काही निकष ठरविला आहे तो सुध्दा व्यक्तिनिष्ठ असून चालणार नाही, तर वस्तुनिष्ठ असला पाहिजे.

गांधीजी आणि प्लेटो :

शिक्षणासंबंधी वस्तुनिष्ठ विचार या संदर्भात आपल्याला गांधीजी व प्लेटो यांच्यात साम्य दिसून येते. प्लेटोच्या मते ज्ञानाच्या ठिकाणी वस्तुनिष्ठता असते. त्यामूळे ज्ञानाच्या संदर्भात व्यक्तिपरत्वे भिन्नता आढळत नाही. मत हे व्यक्तिनिष्ठ असू शकते. गांधीजींप्रमाणेच प्लेटोसुध्दा शिक्षणासंबंधी वस्तुनिष्ठ विचार मांडतो.

शिक्षण हे ज्ञानाच्या संदर्भात असते, मताच्या संदर्भांत नसते, या गांधीजीच्या विचारांशी प्लेटो सहमत आहेत.

थिओटेटस (Theaotatus) या संवादात (Dialogue) प्लेटो ज्ञान व मत यांतील फरक स्पष्ट करतो. प्लेटोच्या मते ज्ञान हे (Form) आकारासंबंधीचे असते आणि मत हे विशिष्टासंबंधीचे (Particulars) असते. प्लेटोच्या मते आकार हे आधारभूत (Prior) असतात. विशिष्ट वस्तू आकाराच्या प्रतिकृती म्हणून येतात. मत हे विशिष्ट वस्तूबद्दल, घटनेबद्दल असते. आपण जेव्हा मत देत असतो तेव्हा त्यात ज्ञेय विषयांचा साकल्याने विचार केलेला असतोच असे नाही. काही वेळा मत हे वरवरच्या निरीक्षणातून येते त्यामूळे ते एकांगी असण्याची शक्यता असते. ज्ञान मात्र सखोल अभ्यासाव्दारे येते. मत समजून घेणे हयापेक्षा ज्ञान करून घेणे ही क्रिया निश्चितच वेगळ्या स्वरूपाची असते. संकीर्ण असते. ज्ञान हाच शिक्षणाचा पाया असला पाहिजे.

गांधीजींना सुध्दा शिक्षणाव्दारे मत स्पष्ट करायचे नाही, तर ज्ञान द्यायचे आहे. गांधीजी म्हणतात की, पुस्तकीज्ञान म्हणजे शिक्षण नव्हे, पुस्तकीज्ञानाला फार तर एक साधनांपैकी एक साधन म्हणता येतील.

प्लेटो, जरी ज्ञानाच्या तुलनेने मत हे कमी महत्त्वाचे आहे हे स्पष्ट करीत असला, तरी एकंदर ज्ञानप्रक्रियेतील मताचे महत्त्व तो मान्य करतो. कारण ज्ञान मिळविण्याच्या प्रक्रियेत आधी विशिष्ट (Particulars) आपल्या अनुभवाला येतात. विशिष्ट समजून घेत घेत आकाराचे ज्ञान होते.

शिक्षणप्रक्रियेच्या संदर्भात आपण विचार करतो तेव्हा असे दिसून येते की, ज्ञानाच्या ठिकाणी असणाऱ्या वस्तुनिष्ठतेमुळे ज्ञान हे शिक्षण घेणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा भाग बनते, त्या व्यक्तीपासून तिचे ज्ञान अविभाज्य असते. याउलट व्यक्तीचे मत

आपण बदलू शकतो. अपुऱ्या माहितीमुळे किंवा इतर कारणामुळे जर चुकीचे मत तयार झाले असेल तर ते बदलता येते.

प्रकरण चवथे
शिक्षणाची उद्दिष्टे

आपण पहिल्या प्रकरणात शिक्षणाच्या उद्दिष्टांबद्दल सविस्तर विचार केला. त्यानंतर गांधीजींच्या शिक्षणविषयक विचारांमागची पार्श्वभूमी बघीतली. या पार्श्वभूमीवर शिक्षणाच्या उद्दिष्टांच्या संदर्भांत गांधीजी काय सांगतात याचा विचार करणे आवश्यक होईल. शिक्षणाची उद्दिष्टे ठरविताना गांधीजींचा प्रामुख्याने नैतिकतेवर भर आहे. हे सांगताना गांधीजी शेतकऱ्याचे उदाहरण देतात. शेतकरी आपल्या निढळाच्या घामाने आपला चरितार्थ चालवीत असतो. त्याला भोवतालच्या जगाचे जरूर तेवढे ज्ञान असते. आपल्या मात्यापित्याशी, मुलाबाळांशी आणि आपल्या गावातील बाधवांशी कसे वागावे याची त्याला योग्य जाणीव असते. सदाचाराचे, नीतीचे नियम त्याला माहित असतात आणि ते तो पाळतोही, पण त्याला आपले नांव लिहिता येत नाही, सही करता येत नाही. गांधीजी म्हणतात की, अशा माणसाला तुम्ही साक्षर करून काय साधणार आहात? त्यामूळे त्यांच्या सुखात रतिभर तरी भर तुम्हाला टाकता येईल काय? गांधीजी पुस्तकी ज्ञानापेक्षा माणसाच्या चारित्र्यावर भर देतात. म्हणून शिक्षणाने माणूस बनला पाहिजे. त्यामूळे कर्तव्य करण्याचे सामर्थ्य आले पाहिजे असे म्हणतात. गांधीजींच्या मते शिक्षण केवळ कॉलेजात गेल्यानेच मिळू शकते असे नाही. शाळा-कॉलेज नव्हती तेव्हाही जगाने हजारो तेजस्वी विद्यार्थ्यांना जन्म दिला. आपणांपैकी अनेकजण शाळा, कॉलेजात जाऊन फालतू माहितीचे संग्राहक बनत आहेत. शाळा कॉलेजाना आपण वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देत आहोत. ज्ञान प्राप्तीच्या अनेक साधनांपैकी ते एक साधन आहे.

केवळ पुस्तकी ज्ञानाला विरोध :

गांधीजींनी केवळ पुस्तकी ज्ञानाला विरोध केला. आतकालच्या शाळांचे स्वरूप जर आपण बारकाईने बघितले तर आपल्याला असे दिसून येईल की, शाळा या केवळ माहितीकेंद्रे बनलेल्या आहेत. विद्यार्थी त्या माहितीखालील एवढा दबून जातो की, तिचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग काय? याचा विचार करण्यात अवसर सापडत नाही. त्या माहितीचा उपयोग प्रत्यक्ष व्यवहारात करून बघण्याइतका उत्साह त्याच्या ठिकाणी नसतो. तशाप्रकारचे मार्गदर्शनही शाळांमधून मिळत नाही. याउलट परिस्थिती परंपरागत शिक्षणपध्दतीत दिसून येते. पूर्वीच्या काळात ऋषी आपल्या शिष्यांना ठराविक मंत्र शिकवीत असत व ते आचारणात कसे आणावयाचे तेही सांगत असत. शिष्यांकडून तशाप्रकारचे आचरण करून घेत असत. गांधीजींना सुध्दा असे वाटत असे की, माहिती आणि आचरण यांची सांगड घातली जावी. केवळ पुस्तकपाढीत बनण्यापेक्षा शिक्षण घेतलेले बरे, आपण पहिल्या प्रकरणात ज्ञान आणि माहिती यांतील फरक स्पष्ट केला. ज्ञान हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनलेले असते आणि म्हणून ते विद्यार्थ्यांपासुन अविभाज्य असते. माहिती व्यक्तीमत्वाचा भाग बनते म्हणजेच ज्ञान असे आपल्या थोडक्यात सांगता येईल. या अर्थाने गांधीजींना ज्ञान हवे होते, केवळ माहिती नको होतो. गांधीजींचा भर कृतीवर म्हणून ते कृतीव्दारा शिक्षणाचा पुरस्कार करतांना दिसतात.

कृती व माहिती यांची सांगड :

आपण जेव्हा कृतीव्दारा शिक्षण असे म्हणतो, त्यावेळी असा गैरसमज होणे शक्य आहे की, शिक्षण म्हणजे काही कौशल्य (Skill) संपादन करणे. गांधीजींनी जे कृतीव्दारा शिक्षण सांगितले, त्यात हा, यांत्रिक अर्थ अभिप्रेत नव्हता. त्यांचे म्हणणे असे होते की, कौशल्याच्या विकासात माहिती येतेच. कौशल्ये ही आधी समजून

घ्यावी लागतात. त्यानंतर त्यांचे अनुकरण येते. त्यांतील चुका सुधारण्यासाठी पुन्हा समजून घेतले जाते. म्हणजेच पुन्हा माहिती आलीच आणि अशाप्रकारे कौशल्यावर प्रभुत्व मिळविले जाते. कौशल्ये ही ज्ञानापासून जरी वेगळी असली तरी त्यांचा एकमेकांशी घनिष्ट संबंध आहे. म्हणून गांधीजी म्हणतात, कुणीही फक्त कौशल्याचा किंवा केवळ माहितीचा स्वतंत्रपणे विचार करू शकत नाही. कौशल्याचा विकास म्हणजे त्यात माहिती येतेच. माहिती म्हणतो तेव्हा त्यात साधनांची सुधारणा येतेच. माणसाचे मूलभूत जीवन आणि वैभव हे कौशल्य व माहिती यांवर अवलंबून असते. (माणसाच्या सांस्कृतिकरणाचा इतिहास हा कौशल्य व माहितीचा इतिहास आहे.)

समतोल :

गांधीजींच्या मते शिक्षणात समतोल असणे आवश्यक ठरते. कृतीव्दारा शिक्षण सांगतात त्या मागचा त्यांचा उद्देश हाच आहे की, माहिती आणि कृती यांची योग्यप्रकारे सांगड घातली गेली पाहिजे. शिक्षणाचे सैध्दांतिक अंग आणि व्यावहारिक अंग यात विरोध निर्माण होणार नाही होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. शिक्षणातील असंतुलन देशाच्या प्रगतीला घातक ठरते. समाजाच्या प्रगतीच्या संदर्भात अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, पदार्थविज्ञान, गणित हे सर्वंच हातात हात घालून चालतात. सर्वंच पातळीवर ट्रेनिंग असावे लागते. क्लार्क-फाइल्सचे ट्रेनिंग घेत नाही तर शेतकऱ्याला आपल्या साधनात कसा बदल करावा हे माहित नसते. खाणवळीत जो स्वयंपाकी असतो त्याला स्वच्छता पाळता येत नाही. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता पाळण्यासारखी महत्त्वाची गोष्टही लोक विचारात घेत नाहीत. अशा वेगवेगळ्या स्तरावरील विभिन्न गोष्टी ह्या आपल्या जीवनमानातील पर्यायाने शिक्षणपध्दतीतील महत्त्वपूर्ण

गोष्टी आहेत. गांधी ही एकच व्यक्ती अशी आहे की तिने या सर्व गोष्टी आपल्या नवी तालीममध्ये स्पष्ट केल्या आहेत.

जेव्हा शिक्षणातील समतोलाच्या संदर्भात बोलतात तेव्हा त्यांना आणखी एक प्रकारचा समतोल अभिप्रेत असतो आणि तो म्हणजे शिक्षणाच्या सैध्दांतिक व व्यावहारिक अंगाच्या संदर्भातील समतोल होय. समजा, एखाद्या देशाने शिक्षणाव्दारे सर्व सैनिक किंवा सर्व तंत्रज्ञ निर्माण केले तर देशाचा विकास होणार नाही. अशा प्रकारचे असंतुलन देशाच्या प्रगतीला घातक ठरते. आपण जेव्हा तंत्रज्ञानाबद्दल बोलतो तेव्हा एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती अशी की, तंत्रज्ञानाला वाजवीपेक्षा जास्त प्राधान्य नको. कारण तंत्रज्ञ हा एखाद्यावेळी हुकूमशहा होईल आणि समाजातील एखाद्या विभागावर सत्ता गाजवील. गांधीजी म्हणतात की, आजचे इंजिनिअर म्हणजे कालचे सुधारलेले लोहार घिसाडी होत आणि आजचे डॉक्टर म्हणजे कालचे वैद्य होत. त्यांचे कार्य जवळपास सारखेच आहे. जे लोक काल सामाजिक सुव्यवस्थेचे भाग होते तेच आज सामाजिक असंतुलनाला कारणीभूत झाले आहेत. याचे कारण त्यांच्या व्यवसायाला मिळत गेलेले अवाजवी महत्त्व, आजची परिस्थिती बघितली म्हणजे असे वाटते की, खरोखरच गांधीजींना आपल्या समाजाच्या शैक्षणिक गरजा स्पष्टपणे कळल्या होत्या.

व्यक्तीचा सर्वांगीण विकास :

शिक्षणाचा खरा उद्देश व्यक्तीविकास आहे. शिक्षण ही एक मुल्यात्मक संकल्पना आहे. सुशिक्षित व्यक्ती ही निश्चितच शिक्षणाने प्रगत अवस्थेला पोहोचली पाहिजे. व्यक्तीचा विकास किंवा प्रगती ही एकाच बाबतीत असून चालत नाही तर सर्वांगीण असावी लागते. विकासामध्ये शारीरिक, मानसिक व नैतिक अशा तीनही गोष्टी अभिप्रेत आहेत. शिक्षणाने तीन H संपन्न व्हावेत अशी गांधीजींची अपेक्षा आहे : (Head-Hand-Heart) माणसाला चांगले

जीवन जगण्यासाठी या तीनही गोष्टींची आवश्यकता आहे. बौध्दिक वाढ कितीही झाली पण शरीर निरोगी नसेल तर त्याचा फारसा उपयोग होणार नाही. शरीर सुदृढ आहे, कार्यक्षम आहे, कृती करण्याचे भरपूर सामर्थ्य आहे. परंतू बुध्दीचा पुरेसा विकास झाला नाही तर त्या कृतींना यांत्रिक स्वरूप येईल. शारीरिक आणि मानसिक विकास होऊनही जर त्याची नैतिक पातळी कमी दर्जाची असेल तर, त्या व्यक्तीला स्वतःचे जीवन सावरता येणार नाही, इतरांना त्या व्यक्तीचा उपयोग तर दुरच राहो.

शिक्षणाने शरीर, बुध्दी यांचा विकास होऊन चारित्र्य संपन्नता निर्माण झाली पाहिजे.

शिक्षणाने व्यक्ती 'माणूस' बनली पाहिजे :

ज्या ज्या शास्त्रांचा आपण अभ्यास करतो त्यांचा आपल्याला आपली इंद्रिये, वासना काबूत ठेवण्याच्या कामी उपयोग झाला पाहिजे. गांधीजींनी अक्षरज्ञानाचा मुळीच उपयोग नाही म्हणून सदा सर्वदा त्याची हेटाळणी केलेली नाही. त्याचा उदोउदे करण्याचे कारण नाही एवढेच त्यांचे म्हणणे, अक्षरज्ञानाला जीवनात एक स्थान आहे, आणि त्या स्थानाच्या मर्यादेत त्याला महत्त्व आहे. आपण जेव्हा इंद्रियांना ताब्यांत ठेवू, नीतीमत्तेचा पाया दृढ करू तेव्हाच अक्षरज्ञानाला जीवनात स्थान आहे. गांधीजी केवळ बौध्दिक ज्ञानाला महत्त्व देत नाहीत, तर ते कृतीत आले पाहिजे, आचरणात आणले पाहिजे. कोणत्या गोष्टी व विचार ग्रहण करावेत व कोणते ग्रहण करू नयेत याचा विवेक करता आला पाहिजे. विद्यार्थ्यांना योग्ययोग्यतेचा विचार करण्याचे शिक्षण दिले पाहिजे. आपण 'मानव' विचार करणारे व ज्ञान करून घेणारे आहोत आणि या कालात सत्य कोणते व असत्य कोणते, कटू भाषण कोणते व मधुर भाषण कोणते, शुध्द वस्तू कोणती व अशुध्द वस्तू कोणती यांतील

फरक समजला पाहिजे. हृदयाच्या - भावनांच्या शिक्षणासंबंधी असे सांगता येईल की, हे शिक्षण पाठ्यपुस्तकांच्या व्दारा देता येईल असे वाटत नाही. शिक्षकांच्या, गुरूजनांच्या संपर्कातूनच ते देता येईल. केवळ बौध्दिक अंगाचा विकास झाला तर आपण पुस्तकपंडित होऊ. केवळ कृती करीत राहिलो तर यंत्र आणि माणूस यात फरक राहणार नाही, म्हणून भावनिक विकास आवश्यक ठरतो. व्यक्तिविकास हा तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो ज्यावेळी आपल्याला माहिती असते, त्यानुसार कृती करतो आणि कृतीमागे भावनेचे बळ असते, आत्मबल असते.

सा विद्या या विमुक्तये :

शिक्षणाने व्यक्ती माणूस बनली पाहिजे. खऱ्या अर्थांने मानव म्हणून त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे. शिक्षणाने अज्ञानाच्या अंधःकारातून मुक्तता झाली पाहिजे, ज्ञानाचा प्रकाश लाभला पाहिजे. तसे इंग्रजांनी घालून दिलेल्या शिक्षणपध्दतीमुळे आपण गुलाम बनलो. आपल्याला आमिष दाखवून स्वतःच्या फायद्यासाठी भारतीयांना गुलाम बनविले. गांधीजी म्हणतात की, त्या शिक्षणपध्दतीचे काही गुण असले तरी एकंदर परिणाम अनिष्ट होत आहे. शिक्षण हे जास्तीत जास्त संपत्ती मिळविण्याचे, स्थान व अधिकार मिळविण्याचे साधन आहे असे लोक मानू लागले. धनाच्या व सत्तेच्या लोभामूळे गुलामगिरी प्रिय वाटू लागली आहे. गांधीजी म्हणतात आपल्याला 'या विद्या या विमुक्तये' या प्राचीन मंत्राचा विसर पडला आहे. जी मुक्त करते ती विद्या असे समजण्याऐवजी इंग्रजांना दिलेल्या विद्येमुळे आपण अधिकाधिक बंधनात सापडत आहोत. विद्या म्हणजे केवळ आध्यात्मिक ज्ञान आणि मुक्ती म्हणजे मोक्षप्राप्ती एवढाच त्या मंत्राचा मर्यादित अर्थ करून चालणार नाही. गांधीजींच्या मते विद्येचा अर्थ लोकोपयोगी पडणारे सर्व प्रकारचे ज्ञान आणि मुक्तीचा अर्थ जीवनांतील सर्व

प्रकारच्या गुलामगिरीतून सुटका करून घेणे. गुलामगिरी ही दुसऱ्यांच्या स्वाधीन झाल्यामुळे निर्माण होते. तसेच आपणाच निर्माण केलेल्या कृत्रिम गरजांचेही आपण गुलाम असतो. या प्रकारची मुक्ती ज्या योगे मिळेल तेच खरे शिक्षण.

शारीरिक श्रमाचे महत्त्व :

गांधीजींच्या मते शिक्षणाचे जर योग्य नियोजन केले तर त्यांत कौशल्य आणि माहिती यांना सारखेच महत्त्व राहील (एक दुसऱ्यापेक्षा अधिक महत्त्वाचे असणार नाही.) हे दोन्ही सममूल्य आहेत असा त्यांनी आग्रह धरला. बौध्दिक श्रमाइतकेच शारीरिक श्रमही महत्त्वाचे आहेत हे तत्त्व त्यांतून बाहेर आले. माणसाला अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टींची आवश्यकता असते. म्हणून त्याने झोपडी कशी बांधावी, सूत कसे कातावे, विणावे कसे, बांधकाम कसे करावे, गुरांची निगा कशी राखावी, शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी कोणती साधने वापरावीत इत्यादी गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. हे करण्यासाठी केवळ बुध्दी असून चालणार नाही तर शारीरिक श्रमही कळावे लागतील, यासाठी केवळ माहिती असून चालणार नाही तर प्रत्यक्ष साधनांचा वापर करता आला पाहिजे म्हणून गांधीजी म्हणतात की ठराविक वयोमानापर्यंन्त किमत कमी काही कौशल्ये आली पाहिजेत. माणसाच्या दोन व्याख्या सांगता येतील. माणूस हा बुध्दिशील प्राणी आहे, तसेच साधने वापरणारा, साधने निर्माण करणारा प्राणी आहे. साधने निर्माण करणे आणि वापरणे याचा कौशल्यांशी संबंध आहे.

शरीर, मन आणि आत्मा यांच्या विविध शक्तीमध्ये 'योग्य' तो एकसूत्रीपणा व मेळ न राखल्यामूळे जे दुष्परिणाम ओढवले आहेत ते अगदी स्पष्ट आहेत. आज खेड्यातील माणसे गुराढोरांच्या सान्निध्यात राहतात, सकाळपासून संध्याकाळपर्यंन्त राबत असतात, कंटाळवाणे जीवन जगत असतात. त्यांच्यात कधी बदल होत नाही.

जीवन म्हणजे एक दुःखद समस्या होऊन बसते. त्यातून ते आपला मार्ग कसाबसा काढीत असतात. या उलट आपल्या शहरांतील शाळा कॉलेजातून शिक्षणाच्या नावाखाली बुध्दीचा विलास चालतो. बौध्दिक शिक्षणाचा व शारीरिक श्रमाचा काहीच सबंध नाही असे तेथे मानले जाते. पण शरीर निरोगी ठेवायचे म्हटले त्याला काही तरी काम हवे, व्यायाम हवा. शाळा-कॉलेजातून बाहेर पडलेले विद्यार्थी (शरीरश्रमाच्या बाबतीत) अंगमेहनतीच्या कामात मजुरांची बरोबरी करू शकत नाहीत. थोडेसे श्रम करताच त्यांचे डोके दुखू लागते आणि उन्हात हिंडायची पाळी आली की, त्यांना चक्कर येऊ लागते. ही स्थिती करूणास्पद मानली न जाता उलट स्तुत्य गणली जाते.

कृतीव्दारा शिक्षणाचे महत्त्व :

गांधीजींच्या मते शिक्षण घेतले, पुढे काय ही समस्या कृतियुक्त शिक्षणाने उपस्थितच होत नाही. कृतीव्दारा शिक्षण घेतल्यामूळे श्रमाचे मूल्य समजते. श्रम हे जीवनात किती आवश्यक आहेत, महत्त्वाचे आहेत हे कळते. त्यामूळे कोणतेही श्रमाचे काम करण्यास लाज वाटेनाशी होते. ते काम शेतातील असो, रस्ते साफ करण्याचे असो, अगर इतर सार्वजनिक स्वच्छतेचे असो. ते काम करण्यात कमीपणा वाटत नाही. आपोआपच बौध्दिक श्रम करणारा वर्ग आणि शारीरिक श्रम करणारा वर्ग यातील तफावत नष्ट होते. शिक्षणाने अशा प्रकारचे सामाजिक विषम नष्ट होण्यास मदत झाली पाहिजे असे गांधीजींचे म्हणणे होते.

एकदा कोणतेही काम करणे कमीपणाचे नाही असे मानल्यानंतर आपोआपच आणखी एका समस्येचे उत्तर मिळून जाते, ते म्हणजे बेकारीनिवारण. मी अमुक इतके शिक्षण घेतलेले आहे आणि मला अमुकच हृद्याची जागा पाहिजे असा आग्रह न धरता जर आपण पाटोपाण्याचा कोणताही उद्योग करू लागलो तर कुणीही

बेकार राहणार नाही. गांधीजींच्या मते पोटाचा व्यवसाय फक्त व्यापारच असावा. कोष्टीकाम, शिंपीकाम, सुतारकाम यासारखे आवश्यक धंदे व मजुरी हेच उपजीविकेचे साधन असावेत. काही लोक खास पैसा कमावण्याच्या इराद्याने वैद्य, वकील, शिक्षक इत्यादी व्यवसायांचे शिक्षण घेतात व त्या व्यवसायात पाऊल टाकतात. गांधीजींच्या मते ही एक प्रकारची अधोगती आहे. कारण शिक्षणाने पोटापाण्याची सोय होत असली तरी शिक्षणाचे ध्येय तेवढयापुरते मर्यादित नाही. खरे शिक्षण हे दुतर्फी असते, ते माणसाला स्वतंत्र व सर्जनक्षम करते, खरोखर माणूस बनविते. अशा शिक्षणाची प्रक्रिया एकाच वेळी वस्तूचा शोध असते, वस्तूची निर्मिती असते. शिक्षणाचा उपयोग हा केवळ स्वतःच्या जीवनासाठी करणे हा संकुचित दृष्टिकोन टाकला पाहिजे.

विद्यार्थ्यांचे चारित्र्यसंवर्धन हे शाळेचे मुख्य ध्येय आहे. योग्य योजना न आखता वा पध्दत न स्वीकारता जर सर्व प्रकारच्या गोष्टी विद्यार्थ्यांना शिकविण्यात आल्या तर ते नास्तिक बनतात. इतर शिक्षण मिळूनही ते चारित्र्यशून्य बनतात म्हणून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक बुध्दी दृढ करणे हे शाळेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

गांधीजी म्हणतात की हृदयारे शिक्षण हेच खरे शिक्षण होय. हृदयात शुध्द प्रेम प्रकट झाले, तर बाकी सर्व आपोआप प्राप्त होईल. सेवेचे क्षेत्र अमर्याद आहे. सेवेच्या शक्तीचीही अमर्याद वाढ करता येईल.

शिक्षणाच्या ध्येयाच्या संदर्भात विचार करतांना चारित्र्याची घडण या गोष्टीवर गांधीजींनी भर दिला. त्यासाठी गांधीजी पुस्तकी ज्ञानाला दुय्यम स्थान देतात. चरित्र्य-घडण व पुस्तकी ज्ञानाचे बलिदान करण्यास तयार आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कृतीव्दारा शिक्षणाचे ध्येय काय राहील? या प्रश्नाला गांधीजीचे उत्तर नैतिक विकास, चारित्र्य घडण हे आहे.

धैर्यांचा विकास, सद्‌गुणांची वाढ, शक्तींची वाढ, ध्येयांच्या प्राप्तीसाठी सर्वस्व पणाला लावणे इत्यादी गोष्टी त्यांना पुस्तकी ज्ञानापेक्षा महत्त्वाच्या वाटतात. शाळा-कॉलेज म्हणजे चारित्र्य घडविणारे कारखाने होत. आईवडील मुलाला किंवा मुलीला चांगला पुरूष किंवा स्त्री बनण्यासाठी शाळेत पाठवितात.

शिक्षणाचे ध्येय ठरवितांना गांधीजींचा नैतिकतेवर कटाक्ष आहे, शाळेने विद्यार्थ्यांना चारित्र्यसंपन्न बनविले पाहिजे. शील घडविले पाहिजे. शिक्षणाने नैतिकतेची जाणीव निर्माण झाली पाहिजे आणि त्यानुसार कृतीची निवड केली पाहिजे. नैतिक कृतींच्या आचरणाने जीवन अधिकाधिक चारित्र्यसंपन्न बनविले पाहिजे. वेगळ्या शब्दात मानवत्वाचा विकास झाला पाहिजे. गांधीजींच्या मते हृदयाचे शिक्षण हेच खरे शिक्षण. नैतिकतेचा विचार, एका व्यक्तीच्या संदर्भात नसतो तर व्यक्ती आणि इतर यांच्या संबंधातून नीती ठरत असते. एका व्यक्तीची अशी काही नीती असत नाही, ती व्यक्ती जेव्हा इतरांच्या सान्निध्यात येते आणि तिचे जे वर्तन घडते, त्या वरून व्यक्तीची नीतीमत्ता आजमावली जाते. म्हणून नीतीच्या संदर्भांत शिक्षणाचा विचार करतो तेव्हा केवळ व्यक्तिविकास हे शिक्षणाचे ध्येय संकुचित ठरते. शिक्षणाचा समाजाच्या उन्नतीशी सबंध आहे. किंबहुना सामाजिक उन्नतीचे ते साधन आहे गांधीजींना वाटते.

गांधीजींनी शिक्षण आणि क्रांतिप्रवणता यांतील फरक पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे. त्यांनी वर्धा शिक्षण योजना आखली तेव्हा त्यातून गाजावाजा न करता सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्रांती घडून येईल अशी त्यांची श्रध्दा होती. समाज-जीवनाच्या गतिशास्त्रातील हा वादग्रस्त मुद्दा आहे. शिक्षणातील क्रांती ही सर्वांगीण क्रांतीचा भाग म्हणून आली, तरच आणि तितक्याच प्रमाणात यशस्वी होवू शकते. गांधीजींच्या

विचारासरणीची अगदी उलट बाजूसुध्दा तितक्यात जोरकसपणे मांडली जाते. ती पुढीलप्रमाणे सांगता येईल. समाज बदलला तर शिक्षण बदलते, शिक्षण बदलले म्हणून समाज बदलतो असे घडू शकत नाही. मग गांधीजींची श्रध्दा अनुचित होती कां? या प्रश्नाला आपल्याला होकारार्थी उत्तर देता येणार नाही. कारण आपण आहोत ती (शिक्षण) 'शुध्दी' चा संदर्भ त्यांच्याकडे नव्हता. ते प्रति शिक्षणपध्दतीबद्दल बोलत होते. प्रस्थापित समाजाचे अंग बनलेले शिक्षण ते नव्हते. एका समग्र सामाजिक आंदोलनाचा तो भाग होता. त्यांची योजना निष्प्रभ ठरली, तिला गतानुगतिक राज्यपध्दतीचा आश्रम मिळाला तेव्हा गांधीजींनी पर्यायी शिक्षण योजना सांगितली.

गांधीजींच्या मते शिक्षणाने जबाबदारीची जाणीव विकसित झाली पाहिजे. आज आपण जर विद्यार्थ्यांची अवस्था बघितली तर आपल्याला असे दिसून येते की, ती 'त्रिशंकू' सारखी आहे. जुन्या प्रवृत्तीशी प्रामाणिकता नाही व नव्याशी हातमिळवणी नाही. पुरोगामी व प्रतिगामी यांच्या दरम्यानची तरूणांच्या मनाची अवस्था आहे, तर यावर मात करणारी गोष्ट म्हणजे जबाबदारीची जाणीव. शिक्षणाने मूल्यांची निर्मिती करण्याची क्षमता निर्माण झाली पाहिजे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आपण मानले आहे. यातही दोन गोष्टी समाविष्ट आहेत. जुन्या (परंपरांमध्ये) मूल्यांतून जे काही चांगले आहे ते तर आपण घेतलेच पाहिजे. पण जर जुनी मूल्ये बाद ठरली असतील तर ती नाकारता आली पाहिजेत. त्या ठिकाणी नवी मूल्ये साकारता आली पाहिजेत. याचाच अर्थ जबाबदारीची जाणीव निर्माण झाली पाहिजे. समाजात आपले जे काही स्थान असेल, जी काही भूमिका असेल त्यांनुसार आपल्याला कर्तव्ये पार पाडता आली पाहिजे. आपल्या कृतींना वळण लावण्यासाठी आधी मूल्ये निश्चित केली पाहिजेत व त्या मूल्यांना अनुसरून आपल्या कृती झाल्या पाहिजेत.

अशा प्रकारच्या जबाबदाराची जाणीव शिक्षणाने निर्माण झाली पाहिजे, विकसित झाली पाहिजे.

चारित्र्यसंपन्न, स्वावलंबी व स्वतंत्र बुध्दीने विचार करणारा नागरिक निर्माण करणे हे गांधीजींच्या मूलोद्योगी शिक्षण योजनेचे ध्येय होते. त्या उद्दिष्टाला अनुसरून सामाजिकदृष्टया उत्पादक उद्योगाभोवती साऱ्या शिक्षणाची उभारणी झाली होती. व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंचा विकास साधणारे, अभ्यासविषयक व अभ्यासानुवर्ती उपक्रम या योजनेने सुरू झाले गेले. शारीरिक शिक्षण, संगीत, चित्रकला, राष्ट्रभाषेचे शिक्षण, संगित, चित्रकला, राष्ट्रभाषेचे शिक्षण, निसर्ग निरीक्षण, सहली व सामाजिक सण उत्सव यांना शालेय जगात स्थान मिळाले. व्यक्तिस्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता इत्यादी लोकशाही मूल्यांवर आधारित समाजरचना हे राष्ट्राचे उद्दिष्ट लक्षात घेऊन लोकशाहीनिष्ठ कार्यक्षम नागरिकांची निर्मिती हे शिक्षण व्यवस्थेचे उद्दिष्ट असले पाहिजे असे गांधीजींनी सांगितले.

गांधीजी शिक्षणाच्या बौध्दिक अंगापेक्षा सांस्कृतिक स्वरूपास अधिक महत्त्व देतात. ते म्हणतात, तुमच्या अंतर्यामी असलेली संस्कृती तुमच्या वाणीतून प्रतिबिंबित झाली पाहिजे. त्याचप्रमाणे तुम्ही पाहुण्यांशी कसे वागता, परस्परांशी कसे वागता, अध्यापक आणि वडिलधारी माणसे यांच्याशी कसे वागता, यांतून तुमची संस्कृती प्रकट झाली पाहिजे. गांधी ही एकच व्यक्ती अशी आहे की तिने दैनंदिन जीवनातील गोष्टी शिक्षणाने व्यवस्थितपणे पार पाडता याव्यात हे स्पष्ट केले. गांधीजी म्हणतात आपल्याला प्रथमतः सरावासाठी मदत मिळत नाही, महारोगासारख्या आजारांची माहिती नसते, त्यांवरील उपचार माहिती नसतात, पर्यायाने आपले त्याकडे दुर्लक्ष होते. सामजिक संबंधाची आपल्याला जाणीव नसते. आपल्याला जे काही ट्रेनिंग (प्रशिक्षण) मिळते. त्यांतून आपण

अधिकाधिक संकुचित होत जातो. योग्य शिक्षणपध्दतीत वरील गोष्टी तसेच स्वतःचे वेगळेपण टाळले पाहिजे. आज शिक्षणाचा परिणाम हा मनुष्याला जास्तीत जास्त आत्मकेंद्री आणि केवळ स्वतःबद्दलच विचार करायला लावणारा असा झाला आहे. परिणामी सुशिक्षित वर्ग नेहमी सामाजिक प्रश्नाबाबत उदासीन दिसतो. शिक्षण मिळूही संपूर्ण वैयक्तिक दृष्टिकोन सुटला नाही, याचे कारण तसे शिक्षणच मिळाले नाही. माझा या समाजाशी संबंध आहे, ही भावनाच मुळी निर्माण होत नाही. म्हणून गांधीजी आग्रहाने प्रतिपादन करतात की, शिक्षणाव्दारे समाजाभिमूख बनले पाहिजे. योग्य जीवनाचा विकास झाला पाहिजे. त्यांतून बौध्दिक व नैतिक विकास झाला पाहिजे तसेच सौन्दर्य दृष्टीही आली पाहिजे.

गांधीजींच्या मते लहानपणापासून बालकांच्या हृदयप्रवृत्तीला भावनांना योग्य वळण लावले पाहिजे. त्यांना शेती, सूतकाम इत्यादी उपयुक्त कामी जुंपले आणि या उद्योगांच्याव्दारा त्यांना अंगमेहनतीचे काम देऊन त्यांच्या शरीराला व्यायाम दिला, उद्योगाचे उपयोग व त्या कामी उपयोगात आणावयाच्या हत्यारांची रचना, त्यांचे ज्ञान त्यांना दिले, तर त्यांच्या बुध्दीचा स्वाभाविक विकास सहजगत्या होईल, इतकेच नव्हे तर तिची पारखही सतत होत राहील. हे करीत असतानाच आवश्यक असलेल्या गणितादी शस्त्रांचे ज्ञान त्यांना दिले व करमणुकीसाठी, श्रमपरिहारासाठी वाड्मयाचा उपयोग करण्यात आला, तर तिहींचा (शरीर, बुध्दी, हृदय) समतोल विकास साधेल आणि बालकाच्या जीवनाची कुठलीच बाजू अविकसित राहणार नाही. मनुष्य म्हणजे केवळ शरीर नव्हे, केवळ बुध्दी नव्हे वा केवळ आत्मा नव्हे. या तिहींच्या समान विकासानेच मानवाचे मानवत्व तयार होते, यांतच खरे अर्थशास्त्र आहे. गांधीजी म्हणतात, स्वातंत्र्य मिळाल्यावर देशाला या गोष्टींचा विचार करता येईल ही समजूत

चुकीची आहे. कोट्यावधी माणसांना अशा तऱ्हेच्या कामाला लावल्यानेच आपण स्वातंत्र्य जवळ आणू शकू.

शिक्षणाचे ध्येय, वैयक्तिक आहे की सामाजिक?

गांधीजींनी जी शिक्षणाची ध्येये सांगितली त्यांचे स्वरूप वैयक्तिक होते कां, सामाजिक? कां दोन्ही? असा एक प्रश्न विचारला जातो. मुसोलिनीने ठरविलेली शिक्षणाची ध्येये किंवा आजचे रशियातील शिक्षण यांचे स्वरूप पाहिजे तर एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते. ती अशी की, त्यात व्यक्तीचे व्यक्तिमत्व दडपून टाकले आहे. हुकूमशहाची आज्ञा किंवा राष्ट्राचे हित यासाठी व्यक्तीला साधन म्हणून वापरले आहे. यापेक्षा इंग्लंडमध्ये शिक्षणाच्या सामाजिक उद्दिष्टांचे स्वरूप जरा सौम्य असलेले दिसून येते. म्हणून 'समाजसेवेसाठी शिक्षण' 'नागरिकत्वाचे शिक्षण, अशाप्रकारचे शिक्षणाचे स्वरूप स्पष्ट केले जाते.

शिक्षणाचे वैयक्तिक उद्दिष्ट आणि सामाजिक उद्दिष्ट यापैकी गांधीजींना कोणते अभिप्रेत होते? गांधीजींच्या मते व्यक्तीला 'माणूस' म्हणून असणारी प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. त्याचबरोबर देशाचे सामर्थ्य वाढले पाहिजे असेही गांधीजी म्हणतात. गांधीजींच्या मते भौतिक किंवा आत्मिक कोणत्याही प्रगतीमध्ये व्यक्तिमत्व टिकून राहिले पाहिजे. स्वत्वाची जाणीव असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस स्वतःचे असे वैशिष्टय असते. स्वभाव, क्षमता इत्यादी संदर्भात कोणत्याही दोन व्यक्ती अगदी सारख्या नसतात. जात, वर्ण, वर्ग या गोष्टींचा विचार न करता व्यक्तीचा 'माणूस' म्हणून विचार केला पाहिजे असे गांधीजी म्हणतात. त्यांना विभिन्नत्वामध्ये ऐकत्व निर्माण करावयाचे आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा नाश न करता व्यक्तीचा 'माणूस' म्हणून विचार केला पाहिजे असे गांधीजी म्हणतात. त्यांना विभिन्नत्वामध्ये एकत्व

निर्माण करावयाचे आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा नाश न करता समाजाच्या कल्याणासाठी प्रयत्न केला पाहिजे.

गांधीजींना असा आत्मविश्वास वाटतो की, योग्य शिक्षण घेतलेल्या ज्यांच्या चारित्र्याची घडण झाली आहे अशा व्यक्तींचा समाज हा निश्चितच प्रगत समाज असेल. सुशिक्षित व्यक्तीस निश्चितच प्रगत समाज असेल. सुशिक्षित व्यक्तीस निश्चितपणे समाजहित साधेल अशी त्यांची निष्ठा आहे.

गांधीजींच्या मते समाजसेवा हा शिक्षणाचा अविभाज्य भाग आहे. जे शिक्षण विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, त्याग करण्याची वृत्ती निर्माण करणार नाही ते खरे शिक्षणच नव्हे. शिक्षण हे केवळ पैसा मिळविण्यासाठी नसते. गांधीजी म्हणतात की प्रत्येकाने नियमितपणे समाजासाठी काही ठराविक वेळ पाहिजे. पवित्र स्थळांची स्वच्छता वगैरेसारखी कामे स्वतः होऊन हाती घेतली पाहिजेत. गांधीजी म्हणतात हाच खरा शिक्षणाचा महत्त्वपूर्व भाग होय. गांधीजी म्हणतात की, मी भारताचा विनम्र सेवक आहे. माणुसकीची सेवा आणि भारताची सेवा यात कुठेही विसंगती असण्याचे कारण नाही.

शिक्षणाची वैयक्तिक उद्दिष्टये या संदर्भात गांधीजी एकांगी विचार करत नाहीत तर या दोन्ही सांगड घालतात. गांधीजींना एकंदर जे काही जीवनविषयक आणि शैक्षणिक तत्वज्ञान सांगितले त्यांत त्यांनी व्यक्तिहित व समाजहित यामध्ये यशस्वीपणे समतोल राखला आहे.

गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचे सार असे सांगता येईल की, सामाजिक परिसरातच व्यक्तिमत्वाचा विकास होतो. त्यांचा असा आग्रह आहे की, सामान्य जीवनातच व्यक्तीच्या प्रगतीला व्याप्ती मिळते. म्हणून गांधीजी म्हणतात, शाळांच्या स्वरूपात असा बदल केला पाहिजे की, ज्यामूळे व्यक्तीवर कसलेही दडपण न येता

सामाजिक सबंधातून परिसरातून समाजसेवेतून व्यक्तीला स्वतःचा विकास साधता येईल.

प्रकरण पाचवे
शिक्षणप्रक्रियेतील शिक्षकाचे स्थान

शिक्षण-प्रक्रियेत शिक्षकाचे स्थान काय या संदर्भात आपण विचार करतो तेव्हा असे दिसून येते की, शिक्षकाच्या भूमिकेबद्दल दोन मते दिसून येतात.

१. शिक्षक हा 'ज्ञान' प्राप्त करून देणारा असा कर्ता येथे असे गृहीत धरलेले दिसते की, विद्यार्थ्यांला ज्ञान प्राप्त करून द्यायचे म्हणजे शिक्षकास ते आधी प्राप्त व्हायला हवे. प्राचीन काळी असलेली गुरूची कल्पना ही येथे मिळतीजुळती आहे. येथे आधीच ज्ञानप्राप्ती (किंवा ज्यास सत्य म्हणजे काय हे उमगलेले आहे असा ज्ञानीपुरूष) झालेली आहे व ते ज्ञान विद्यार्थ्यांस देणारा अशी शिक्षकाची भूमिका आढळते.

२. शिक्षकाच्या संदर्भात मांडण्यात येणारा दुसरा दृष्टिकोन असा की, शिक्षक व विद्यार्थी या दोघांनीही संयुक्तपणे ज्ञानप्राप्तीचा प्रयत्न करणे. येथे शिक्षक हा सुध्दा थोड्या फार प्रमाणात विद्यार्थ्यासारखा अनभिज्ञ आहे असे मानून त्याची भूमिका ही एखाद्या मार्गदर्शकासारखी असते असे मानले आहे. या पार्श्वभूमिवर गांधीजींच्या शिक्षकाच्या भूमिकेचा विचार करू.

नई तालीम च्या आदर्शांच्या संदर्भात बोलतांना विनोबा भावे असे म्हणतात की, शिक्षकाचे सर्वस्व विद्यार्थ्यांना ज्ञान देणे व त्यांची काळजी वाहणे हे आहे. मी जी सेवा करीत आहे, त्यांतून मला काही मतलब साधावयाचा आहे असे गुरूला वाटता कामा नये. त्याचप्रमाणे आम्ही गुरूची सेवा करतो, त्याने आमचा काही स्वार्थ साधणार आहे असे विद्यार्थ्यांनाही वाटता कामा नये. त्याचा अर्थ असा की, विद्यार्थ्यांना गुरूसेवा व शिक्षकांना विद्यार्थीसेवा हेच

एकमात्र व अनन्य ध्येय वाटले पाहिजे आणि दोघे मिळून परमेश्वराची सेवा करीत आहो असा अनुभव आला पाहिजे.

शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या सामूहिक जीवनासाठी काही गोष्टी लाभप्रद आहेत. उदा. दोघांनी मिळून शेती करणे. यामूळे दोघांचे जीवन सामुदायिक बनते व फार फायदा होतो. अशा प्रकारे दोघे मिळून जे अध्ययन - अध्यापन करतात ते सुध्दा एका स्वतंत्र ध्येयासाठी त्याच्या व्दारा आम्ही समाजाची सेवा करतो अशी अनुभुती झाली पाहिजे.

अध्यापन आणि उद्योग यांत अशाप्रकारचा अनुभव येत असला तर आज पाठ्यपुस्तकांचा जो प्रश्न आहे तो उभा होणार नाही व आवश्यक असलेली पुस्तके आपोआप निर्माण होतील. शिक्षक आणि विद्यार्थी मिळून समाजसेवेचा उद्देश पुढे ठेवून अध्ययन - अध्यापन व उद्योग करीत असतील, तेथे त्यांचा अनुभव त्यांच्याच पुरता सीमित राहत नाही. त्यांचा संप्रदाय चालतो व त्यांच्या अध्ययन-अध्यापनाची परंपरा चालते. गुरू-शिष्यांच्या अशा चिंतन-मननातून अथवा सह चिंतनातून व सहआचरणातून जगाला अनुभवयुक्त ज्ञान प्राप्त होते. दुसऱ्या विद्यालयातील ज्ञान पोकड राहते, तसे न होता नई तालीममधील ज्ञान भरीव राहील. विनोबा भावे म्हणतात की, ज्ञान आणि कर्म ह्यांचा भेद ज्या ठिकाणी नाहिसा होतो, ती नई तालीम.

गांधीजी शिक्षण व समाजरचना यांतील संबंध स्पष्ट करतात. शाळा ही केवळ एक सामाजिक संस्था आहे एवढाच मर्यादित अर्थ गांधीजी घेत नाहीत तर शाळा समाजपरिवर्तन करू शकते असा त्यांना विश्वास आहे. या अर्थाने शिक्षकांना करायचे आहे, त्यादृष्टीने त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना अध्यापन केले पाहिजे.

गांधीजी शिक्षणाची ध्येये स्पष्ट करतात तेव्हा त्यांच्या हृदयाचा-भावनांचा शिक्षणावर भर असलेला दिसून येतो. गांधीजी

म्हणतात, हे शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकाव्दारा देता येईल असे मला वाटत नाही. शिक्षकांच्या गुरूजनांच्या जिवंत संपर्कातूनच देता येईल आणि आज प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षक कोण आहेत? हे शिक्षक श्रध्दावान व चारित्र्यशील आहेत काय? त्यांच्या ताब्यात जी बालके आपण देतो, त्यांच्या जीवनातील या शाश्वत नैतिक अंशची त्यांनी कदर करावी, अशी अपेक्षा तरी असते काय? त्या शिक्षकांना पुरेसे जीवन-वेतन दिले जाते काय? प्राथमिक शाळेतील शिक्षकांची जी निवड केली जाते, ती त्यांच्या देशप्रेमामुळे नव्हे, ही गोष्ट आपल्याला ठाऊक आहे. ज्यांना दुसरी नोकरी-चाकरी नाही, तेच लोक या व्यवसायांत शिरतात.

'शिकविणे' हा व्यवसाय नसून सेवा :

गांधीजी व्यवसायाचे दोन प्रकारात वर्गीकरण करतातः १. केवळ पैशासाठी करण्यात येणारा व्यवसाय आणि २. भावनेने (म्हणजे सेवा भावनेने) केलेला व्यवसाय. पहिल्या प्रकारात दुकानदार, मजूर-लोहार, चांभार, न्हावी इत्यादी व्यवसाय येतात. गांधीजींच्या मते पैसा मिळविणे ह्या हेतूने कुणीही शिक्षकाचा व्यवसाय करू नये, तर सेवाभावानेच हे काम केले जावे.

आज 'शिक्षक' हा व्यवसाय बनला आहे :

आज आपण असे पाहतो की, विद्यापीठे आणि समाज हे शैक्षणिक संस्थांमागे धावताना दिसतात. ज्यांना काम करायचे आहे ते पुन्हा या स्पर्धेत भाग घेतात, अस्तित्वासाठी संघर्ष करताना दिसतात. फक्त विद्यार्थ्यांना जे ट्रेनिंग घेत आहेत. त्यांनाच फक्त स्पर्धेत उतरावे लागते असे नाही तर जे ट्रेनिंग देणे म्हणजेच स्वतःला टिकवून ठेवणे, धरणे. अधिक पैसा म्हणजे सुरक्षित जीवन आणि स्वतःला टिकवून ठेवणे, धरणे. अधिक पैसा म्हणजे सुरक्षित जीवन आणि स्वतःला टिकवणे होय. म्हणून मग शिकविणाऱ्या

संघटनेला काही गोष्टी करणे आवश्यक ठरते. शिकवण्या घेणे, गाईड्स लिहिणे, खाजगीरीत्या शिकविणे इत्यादी. जेव्हा या गोष्टींना मान्यता मिळते तेव्हां त्यांना सामाजिक संस्थांचे स्वरूप प्राप्त होते. पण या गोष्टीचा शिक्षणाच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो. ज्या शिक्षकांना शिकवण्या करून ज्यादा पैसा मिळवावयाचा असतो ते शाळेत काळजी पूर्वक शिकवत नाहीत. यावरून गांधीजी सेवाभावाने शिक्षकाने काम करावे असे म्हणतात त्याचे महत्त्व स्पष्ट होते.

विद्यार्थ्यांपुढे आदर्श :

समाजात विशिष्ट प्रकारची श्रेणी असते. ज्यांचे ध्येय कमी प्रतीचे त्यांच्यापुढे उच्च ध्येय असणाऱ्या लोकांचा आदर्श असतो. तसेच जे तुलनेने कमी नैतिक असतात त्यांच्यापुढे अधिक नीतीमान व्यक्तींचा आदर्श असतो. साहजिकच आपल्यापेक्षा वरच्या लोकांचे अनुकरण केले जाते. आपण कळत नकळत शिक्षकांचे अनुकरण करत असतो. विद्यार्थ्यांपुढे शिक्षकाचा आदर्श असतो. म्हणून शिक्षकाने चारित्र्यसंपन्न असले पाहिजे. आपल्या वागणुकीने विद्यार्थ्यांना नैतिकतेचा आदर्श घालून दिला पाहिजे. शिक्षकाची प्रत्येक कृती-उक्ती या गोष्टीचा विचार करून झाली पाहिजे. राजाप्रमाणे प्रजा तसे शिक्षकाप्रमाणे विद्यार्थी हा जुनाच न्याय आहे.

आज 'शिक्षकशुध्दी' ची आवश्यकता आहे :

गांधीजींच्या विचारांचे महत्त्व समजून घेतांना आजच्या परिस्थितीचा थोडक्यात आढावा घेणे उपयुक्त ठरेल. आजच्या शिक्षण प्रक्रियेतील अनेक समस्यांपैकी शिक्षकशुध्दी ही एक महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. शिक्षक हा शिक्षणातील मूलभूत आद्य घटक आहे. शिक्षणाचा प्रसार खेड्यापाड्यांतून झपाटयाने होत आहे. तालुका, कॉलेजेस निघत आहेत. खेडोपाडी मध्यमवर्गीय तरूण देखील शिकू लागला आहे. आम्ही देत आहोत ते शिक्षण कोणत्या प्रकारचे मन घडवीत आहे हा खरा प्रश्न आहे. या समाजातील

विविध दास्ये तोडण्यासाठी, अन्याया विरूध्द झुंज देण्याची वृत्ती, हे शिक्षण तयार करीत आहे की, एक स्वार्थी, लाचार, संधीसाधु अशा तऱ्हेचा शिकलेला वर्ग तयार करत आहे. शिक्षकच चांगला वाईट घडविणार आहे, म्हणून शिक्षकशुध्दी व्हायला हवी. गांधीजींचा शिक्षकांच्या चारित्र्यावर भर आहे तो एवढयासाठीच, शिक्षकशुध्दीची आत्यंतिक आवश्यकता आहे ही गोष्ट गांधीजींच्या प्रथम लक्षात आली.

शिक्षकांचे कर्तव्य :

कोणत्याही राष्ट्राचे प्रमुख आधारस्तंभ हे शिक्षकच असतात, की ज्यांचे हात अनेक पिढया घडवितात, पर्यायाने राष्ट्राचे भवितव्य घडवितात. आज आपणास दिसणारा विद्यार्थी हा कमालीचा स्वाथी लाचार, संधिसाधू, कमालीचा अन्याय सहन करणारा, शांत असा आहे. याचे कारण आपल्याला आमच्या शिक्षकांचे स्वरूप व प्रवृत्ती यामध्ये सापडते. विविध दास्ये आणि ती तोडणे, अन्याय आणि त्याविरूध्द झुंज, शिक्षण आणि त्याचा आशय व कर्तव्ये इत्यादी सर्व शब्द आणि त्यांचा संबंध सध्याच्या शिक्षकांच्या (डिक्शनरीतून) शब्दकोषातून बाद झालेले आहेत. हे सर्व शब्द आणि त्यांचा संबंध उच्चारातच शिक्षकही माहित नसल्याचा अभिनय करतात. ह्या देशात आम्ही निर्भीडपणे अन्याया विरूध्द आवाज उठवू शकत नाही किंवा स्वतंत्र मत प्रदर्शन करू शकत नाही कारण तसे आमचे शिक्षकच नाहीत.

हे पाहून आदर्श, श्रध्दा यांना तडा जाऊन त्या घडाघड कोसळतात आणि सामान्य माणूस, विद्यार्थी संग्रमावस्थेत भरकटत फिरतात. म्हणूनच तरूण पिढी अश्रध्द आहे, अस्वस्थ आहे, निराशावादी आहे. ह्या देशात आम्हाला नागरिकशास्त्र शिकविणारा शिक्षक आणि राज्यशास्त्र शिकविणारा प्राध्यापक मतदानाचा हक्क बजावला की नाही हे विचारत नाही. तो बजावल्याने किंवा न

बजावल्याने काय समाजबदल घडणार आहे हे सांगणे तर दूरच राहिले. गांधीजींच्या मते स्वातंत्र्याची जाणीव ही शिक्षकाने निर्माण केली पाहिजे.

आज शिक्षणाचा प्रसार वाढत आहे, शाळा कॉलेजेस वाढत आहेत, त्याबरोबर शिक्षकही वाढत आहेत, परंतु गुरूभावना मात्र कमी कमी होत चालली आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनात आज शिक्षकाला स्थानच नाही. गांधीजींच्या मते, शिक्षकाने आपल्या चारित्र्याने विद्यार्थ्यांना आदर्श घालून दिला पाहिजे. त्यांचे जीवन नैतिकतेच्या संदर्भात दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरले पाहिजे.

आजची परिस्थिती पाहिल्यास असे दिसून येते की, पोटार्थी शिक्षक आणि परिक्षार्थी विद्यार्थी ह्या परिस्थितीच्या मुळाशी शिक्षक हाच जबाबदार घटक आहे. आजचे शिक्षक केवळ नोकर, 'सरकारी नोकर' बनून गेले आहेत.

तात्पर्य शिक्षकांनी बुध्दिस्वातंत्र्य कायम ठेवून त्याचा उपयोग केला पाहिजे. सर्वत्र 'पाटया टाकण्याचे' जे गलिच्छ सरकारीकरण झाले आहे ते शिक्षकांनीच स्वच्छ करून समाजपरिवर्तन केले पाहिजे. गांधीजींना या गोष्टीचे महत्त्व पटले होते. आणि त्यांनी ते स्पष्टपणे मांडले होते. एकंदर शिक्षणप्रक्रियेत शिक्षकाचे स्थान त्यांनी स्पष्ट केले. शिक्षणाने समाजपरिवर्तनाचे साधन मानतात, ज्यात शिक्षक या घटकाचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे.

गांधीजींचा अक्षरज्ञानाला विरोध नाही. अक्षरज्ञान कोणत्याही स्थितीत वाईटच असे त्यांना म्हणावयाचे नाही. त्यांचे म्हणणे एवढेच की, अक्षरज्ञानाचे फाजील स्तोम माजवून त्याची मूर्तीपूजा करू नये. इंद्रियांना आपण वश केले, नीतीचा पाया दृढ केला आणि नंतर शिकण्याची इच्छा झाली तर मग अक्षरज्ञानाचाही उपयोग करता येईल. हे खरे शिक्षकांनी केवळ क्रमिक पुस्तके न

शिकविता (क्राफ्ट) हस्तव्यवसाय शिकवावा, त्याचे प्रशिक्षण द्यावे. ट्रेनिंग घेतलेले शिक्षक शिकविताना जी काही पध्दत व मार्ग वापरतील ते निश्चितच वेगळे असतील गांधीजी जी शिक्षणपध्दती स्पष्ट करीत आहेत त्यात शिक्षक एक विषय इतरांपासून वेगळा काढून त्या विषयाचे विवेचन करणार नाहीत तर सर्व विषय एकाच ज्ञानाच्या विभिन्न शाखा आहेत असे समजून शिकवतील. सर्व विषय परस्परांशी कसे संबंधित आहेत हे सुध्दा शिक्षक स्पष्ट करतील. हा हेतू साध्य करण्यासाठी काही प्रकल्प (Project) व काही योजना (Scheme) आखण्यात येतील, ज्या आपल्या जीवनाशी संबंधित असतील. कृतीव्दारा शिक्षण यशस्वी होण्यासाठी शिक्षकांना त्या गोष्टीची आवड पाहिजे, शाळेशी समाजाचे नाते जोडता आले पाहिजे.

शिक्षक - शिक्षणाची आवश्यकता :

शिक्षकाला केवळ त्या विषयाचे माहिती ज्ञान असून चालत नाही, तर ते त्याला विद्यार्थ्यांपुढे परिणामकारपणे मांडता आले पाहिजे. गणितांतील काही सिध्दान्त आपल्याला चटकून समजतात. काही मात्र पायऱ्यापायऱ्यांनी समजून घ्यावे लागतात. शिक्षक ह्या पायऱ्या आपल्या विद्यार्थ्यांना समजून देण्यासाठी सांगत असतो. शिक्षक काही पायऱ्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी घेतो, बुध्दिमान विद्यार्थ्यांसाठी त्याची आवश्यकता नसते. शिक्षकाला त्याच्याकडे असलेली माहिती, ज्ञान विद्यार्थ्यांपुढे मांडत असतांना अनेक गोष्टींची दक्षता घ्यावी लागते. गांधीजींच्या मते त्यासाठी प्रशिक्षणाची (Training) आवश्यकता आहे. ते म्हणतातः सर्वंच पातळीवर प्रशिक्षण असावे. आज आपल्याला असे दिसते की, ज्या माणसाने ते प्रशिक्षण घेतले नाही त्या क्षेत्रातील काम तो करायला घेतो, त्याच्या कामामुळे काय होईल हे सुध्दा तो समजू शकत नाही. क्लार्क फाईलिंगचे ट्रेनिंग घेत नाही. टाईपिस्टना पत्रे कशी टाईप

करावीत हे माहित नसते, इत्यादी. शिक्षण क्रियेतील सदोषता कमी व्हावी यासाठी शिक्षकाचे ट्रेनिंग महत्त्वाचे ठरते. त्यासंबंधी गांधीजी सविस्तरपणे आराखडा सांगतात, अनेक महत्त्वपूर्ण सूचना देतात.

शिक्षणयोजनेच्या यशाच्या संदर्भात विचार करताना आपल्यास असे दिसून येते की, शिक्षकाचे योग्य प्रशिक्षण ही महत्त्वपूर्ण अट आहे. शिक्षकाच्या गुणवत्तेचा नेहमीच शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होताना दिसतो. जेव्हा संपूर्ण शिक्षणपध्दती बदलून नई शिक्षणपध्दती अंमलात आणतो त्यावेळी शिक्षक या महत्त्वाच्या घटकाच्या संदर्भात योग्य ते बदल करणे आवश्यक ठरते.

शिक्षकांच्या प्रशिक्षणाची रुपरेषा :

गांधीजी शिक्षकांना द्यावयाच्या प्रशिक्षणाची रूपरेखा स्पष्टपणे मांडताना दिसतात. त्यासाठी आवश्यक असणारा अभ्यासक्रम सांगतात.

१. शिक्षकांना शिक्षणाची काही मूलभूत तत्त्वे सांगितली जावीत.

अ. उत्पादन कार्यांव्दारे शिक्षण ही मूलभूत कल्पना स्पष्ट करण्यात यावी.

ब. शाळा व समाज यांचे संबंध.

क. बाल मानसशास्त्राची साधारण रूपरेषा आणि तंत्रकौशल्याच्या संदर्भातील मानशास्त्र.

ड. परस्परसंबंधित अभ्यासाची योजना व विकास या संदर्भातील अभ्यास पध्दती सांगण्यात याव्यात.

ई. नवीन शिक्षणाची उद्दिष्टे जी देशाच्या सध्याच्या परिस्थितीशी अनुरूप असतील ती स्पष्ट करण्यात यावीत.

२.

अ. कापसाची लागवड, कापूस गोळा करणे, सूतकताई व विणई ईत्यादींचे ट्रेनिंग शिक्षकांना देण्यात यावे.

ब. सूत-कताईच्या साधनांबद्दल तांत्रिक ज्ञान देण्यात यावे.
क. ग्रामोद्योगांचे अर्थशास्त्र हे निवडलेल्या हस्तव्यवसायाच्या संदर्भांत स्पष्ट करून सांगणे.
ड. प्राथमिक स्वरूपाचे सुतारकाम जे निवडलेल्या हस्त व्यवसायासाठी आवश्यक असेल ते सुध्दा प्रशिक्षणात शिकविले पाहिजे.
३. पुढीलप्रमाणे एखादा हस्तव्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात यावे.
अ. कातणे व विणणे.
ब. पालेभाज्या व फुले यांची लागवड करणे.
क. शेती
ड. सुतारकाम
ई. खेळणी बनविणे.
फ. कातडी काम व कागद काम.

या व्यतिरिक्त विशिष्ट ठिकाणी जो हस्तव्यवसाय करणे सोईचे होईल. तो हस्तव्यवसाय ही या यादीत समाविष्ट करण्यात यावा.

४. शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र यांची सर्वसाधारण रूपरेषा शिक्षक असणाऱ्या व्यक्तीला माहीत पाहिजे. विशिष्ट खेडेगावांतील जीवन व समस्या यांच्याशी त्याचा प्रत्यक्ष संबंध असला पाहिजे व त्याच्या ज्ञानाचा त्या संदर्भांत उपयोग करता आला पाहिजे.

५. मूलभूत अभ्यासक्रमाचा पुढील विकास हा सामाजिक परिस्थितीनुसार करण्यात यावा. त्यानुसार शिक्षकांच्या ट्रेनिंगमध्ये विषय समाविष्ट करण्यात यावेत.

अ. वसाहतील संस्था (Residential Inatitution) :

गांधीजी म्हणतात की, अशा प्रकारचे प्रशिक्षण देणाऱ्या शाळा ह्या त्या वसाहतीतील संस्था असाव्यात, जिथे शिक्षक व विद्यार्थी यांचे घनिष्ट सबंध निर्माण होतील. ते परस्परांच्या

सहकार्याने प्रभावी, सर्वकष सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा विकास साधतील. त्यामध्ये शिक्षकाला वैयक्तिक आवड अभिव्यक्त करता येईल. हा प्रशिक्षणाचा अधिक सुव्यवस्थित करता येईल. हस्तव्यवसायाला जोडून इतर विषय शिकविल्यामूळे आपोआपच शिक्षणाचे स्वरूप सामाजिक होईल.

ब. शिक्षक व सामाजिक जीवन :

आरोग्यशास्त्र, प्रथमोपचार, बालवर्तन आणि वर्गातील शिक्षणाची सवय तसेच सामाजिक परिसराशी, सामाजिक जीवनाशी संपर्क इत्यादी गोष्टीचा विचार गांधीजींनी शिक्षकांच्या ट्रेनिंगच्या संदर्भात केला आहे. त्यांच्या मते या शिक्षणपध्दतीमूळे येणाऱ्या पिढीला मूल्यांची योग्य जाणीव होईल, निर्माण करावी. शिक्षकाने आपल्या शिकविण्यातून शाळेतील विषयाचा समाजजीवनाशी मेळ घातला पाहिजे. शिक्षणातून माणूस बनला पाहिजे हे गांधीजीचे प्रमुख तत्त्व आहे. म्हणून विद्यार्थ्यांच्या ठिकाणी कर्तव्याची जाणीव निर्माण करणे हे शिक्षकाचे काम आहे. आज आपण असे पाहतो की, सामाजिक प्रश्नांबद्दल सुशिक्षित वर्ग एक तर उदासीन असतो किंवा त्याची जबाबदारी इतरांवर टाकण्याची प्रवृत्ती असते. ही प्रवृत्ती नाहिशी करून समाजजीवनाबद्दल आस्थेने विचारना करण्याची प्रवृत्ती शिक्षकाने निर्माण केली पाहिजे.

शिक्षकाची कर्तव्ये स्पष्ट करता गांधीजी दोन महत्त्वपूर्ण गोष्टीशी असणारा संबंध स्पष्ट करतातः

१. समाज जीवन,

२. आर्थिक परिस्थिती

शिक्षकाने विद्यार्थ्यांना समाजजीवनाबद्दल सामाजिक प्रश्नाबद्दल जागरूक बनविले पाहिजे. तसेच विशिष्ट ठिकाणच्या सामाजिक परिस्थितीचा दुसरे महत्त्वाचे काम म्हणजे शिक्षण आणि अर्थव्यवस्था यांची योग्य सांगड घातली पाहिजे. गांधीजी म्हणतात

की, शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यांची अशी तयारी करून घेतली पाहिजे की, शिक्षण झाले, पुढे काय हा प्रश्नच निर्माण व्हायला नको. शिक्षणाने कोणता तरी व्यवसाय करण्याची क्षमता निर्माण व्हावी. पोटापाण्याचा प्रश्न सुटावा. शिक्षणाची ही किमान अट म्हणून गांधीजी सांगतात.

गांधीजींच्या मते शिक्षकांनी त्या स्वरूपाचे ट्रेनिंग घ्यावे आणि मग विद्यार्थ्यांना तो हस्तव्यवसाय शिकवावा. या संदर्भात ते काही महत्त्वपूर्ण सूचना देतात. समजा, एखाद्या विद्यार्थ्याला सुतारकाम शिकायचे आहे तर तो ते एखाद्या चांगल्या सुतारकडून शिकू शकतो. एखाद्या सुताराकडून सुतारकाम शिकावे, त्याला ट्रेनिंग घेतलेला शिक्षक कशाला हवा? याला गांधीजींचे असे उत्तर आहे की, सुताराकडून आपला जर सुतारकाम शिकलो तर आपल्या कृती जास्त यांत्रिक स्वरूपाच्या होतील. सुतार फक्त सुतारकाम शिकवील. त्याला हस्तव्यवसायाचा - अभ्यासातील विषयाशी संबंध (इतिहास, भुगोल, विज्ञान यांच्याशी) जोडता येणार नाही. पण जर प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकाने सुतारकाम शिकविले तर त्याला शास्त्रशुध्द स्वरूप येईल. हस्तव्यवसायाच्या माध्यमातून तो इतर अभ्यासविषय स्पष्ट करून सांगेल. तसेच अभ्यास विषयातील परस्पर संबंधही समजून येईल.

गांधीजी जेव्हा शिक्षण प्रक्रियेतील शिक्षक या महत्त्वपूर्ण घटकाबद्दल बोलतात तेव्हां ते शिक्षकाच्या अनुषंगाने अभ्यासक्रम काय असावा हे सांगतात, तसेच अध्यापन पध्दतीचेही विवेचन करतात.

सर्व धर्माचा साकल्याने विचार केल्यानंतर आपल्याला असे दिसून येते की, सर्व धर्मांची सत्ये एकच आहेत. ही सत्ये शब्दांच्या किंवा पुस्तकांच्या साहाय्याने शिकविता येणार नाहीत. मुले या गोष्टी शिक्षकाच्या दैनंदिन जीवनातून शिकू शकतात. शिक्षक जर

सत्याच्या, न्यायाच्या (विचारानुसार) तत्त्वानुसार जगत असेल तर (मुलांना) विद्यार्थ्यांना सत्य व न्यायाचे शिक्षण मिळते ते सर्व धर्मांचा आधार असते.

गांधीजींना अहिंसक रक्तहीन क्रांती करायची आहे. या क्रांतीचे नेतृत्व त्यांनी शिक्षकांच्या हातात दिले आहे, कारण अशा स्वरूपाची क्रांती शिक्षकच घडवून आणतील असा त्यांना विश्वास वाटतो. शिक्षकाच्या मनांत जर तसा भाव उत्पन्न झाला तर त्यांच्या व्दारे अशी अहिंसक क्रांती होऊ शकेल.

विणकामाच्या हस्तव्यवसायातून अंकगणित शिकविता येईल. लांबी मोजणे, सुताच्या धाग्यांची मोजणी करणे, विणण्यासाठी ते धागे तयार करणे, कापडाचे विशिष्ट प्रकारचे पोत तयार करण्याच्या दृष्टीने ते धागे वळविणे इत्यादीमधुन संपूर्ण मूलभूत अंकगणितक शिकविता येईल.

(कपाशीच्या) कापसाच्या वाढीपासून ते कारखान्यातून कापड बाहेर पडेपर्यंन्त कितीतरी प्रक्रिया असतात. कापूस गोळा करणे, स्वच्छ करणे, सूत कातणे, विणणे, या सर्वांची काही विशिष्ट तंत्रे असतात आणि त्यांच्याशी इतिहास व गणित हे विषय संबंधित असतात.

प्रमुख कल्पना अशी की, संपुर्ण शिक्षण - शरीर, मन व आत्मा यांचे शिक्षण मुलांना हस्तव्यवसायाव्दारे देण्यात यावे. हस्तव्यवसायांच्या (ज्या अनेक) प्रक्रियेतून. इतिहास, भुगोल, अंकगणित हे सर्व विषय शिक्षकाने हस्तव्यवसायाला जोडून शिकवावेत. (You have to draw out all that is in the child) विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा विकास व्हावा.

अध्यापनाची पध्दत अशी असावी की, ज्यात सहकार्यांच्या तत्त्वाला प्राधान्य असावे, योजनाबध्दता, बिनचूकपणा, (तंतोतंतपणा), ऊत्स्फूर्तपणे काम (Initiative) आणि वैयक्तिक

जबाबदारी या शिक्षणातील महत्त्वाच्या घटकांची विद्यार्थ्यांना जाणीव व्हावी.

गांधीजी म्हणतात, प्रत्येक हस्तव्यवसाय हा यांत्रिक पध्दतीने न शिकविता वैज्ञानिक पध्दतीने शिकविण्यात यावा. त्यामूळे मुलांना पुढे चालून का? कुठे? कोणती प्रक्रिया (पध्दत) वापरावी हे समजेल.

शिक्षक व शिक्षणतज्ञ ही नवीन शिक्षणपध्दती कशी राबवितात याबद्दल आम्ही उत्सुक आहोत. शिक्षकांनी नागरिकत्वाचा आदर्श विद्यार्थ्यांपुढे ठेवला पाहिजे. आधुनिक भारतात दिवसेंदिवस लोकशाहीत्वाचा विकास- सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात होणे आवश्यक आहे. म्हणून विद्यार्थ्यांच्या ठिकाणी नागरिकत्वाची जाणीव निर्माण करणे हे शिक्षकाचे कर्तव्य ठरते.

वर्धा शिक्षण योजनेच्या साध्याबद्दल आपण साशंक बनतो यामागील अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे ती योजना यशस्वी होण्यासाठी ज्या प्रकारच्या शिक्षकांची आवश्यकता आहे, तशा प्रकारचे शिक्षक आज उपलब्ध आहेत असे दिसत नाही. एखादी शैक्षणिक योजना कितीही चांगली असली तरी शिक्षकवर्गांमध्ये तो कशी राबवतात यावरून त्याची इष्टता ठरणार असते. भारतात शिक्षकाचा व्यवसाय चुकीच्या मार्गाने जाताना दिसतो. अतिशय बुध्दिमान व्यक्तीला आकर्षित करून घेण्याच्या बाबतीत आजचे शिक्षक अपयशी ठरत आहेत. शिक्षक हा एकूण शैक्षणिक प्रक्रियेतील अतिशय महत्वाचा घटक आहे. म्हणून ह्या घटकाच्या प्रामाणिकपणावर शिक्षकाचे यश अवलंबून आहे. गांधीजींना सुध्दा या गोष्टीची कल्पना होती की अपेक्षेनुसार शिक्षक नसतील तर ही योजना प्रगती करू शकणार नाही आणि त्यामूळे शाळेचे रूपांतर कारखान्यात झाले आहे असे म्हणण्यास

टिकाकारांना संधी मिळेल. म्हणून ते सविस्तरपणे शिक्षकांच्या प्रशिक्षणाबद्दल स्वतःचे विचार मांडतात.

प्रकरण सहावे
शिक्षणाचे माध्यम

गांधीजी म्हणतात, ‘लाखो माणसांना इंग्रजी शिकविणे म्हणजे त्यांस गुलाम बनविणे होय.’ मेकॉलेसाहेबांनी ज्या शिक्षण पध्दतीचा पाया घातला, ती वास्तविक गुलामगिरीचाच पाया होता. त्यांचा आपणास गुलाम बनविण्याचाच हेतू होता असे नसेल तरी त्यांच्या कार्यांचा परिणाम तसा झाला आहे. आपण स्वराज्याच्या गोष्टी परभाषेत बोलत आहोत. ही कोण दोन स्थिती- आपण परस्परांस पत्रे लिहावयाची ती मोडक्या तोडक्या इंग्रजीत- आमच्यातील एम.ए. सुध्दा अशुध्द इंग्रजी लिहितात. उत्तमोत्तम विचार प्रदर्शित चालते. आमची उत्तम वर्तमानपत्रे इंग्रजी भाषेत निघतात. हीच स्थिती जर विशेष कालपर्यन्त चालू राहिली तर, आपले वंशज आपला तिरस्कार करतील. गांधीजी म्हणतात की, इंग्रजी शिक्षण घेऊन आपण राष्ट्राला गुलाम बनविले आहे. ही काय थोडी जुलमाची गोष्ट आहे की, माझ्याच देशात मला न्याय मिळवायचा असेल तर मला इंग्रजीत व्यवहार केला पाहिजे? मी बॅरिस्टर झालो म्हणजे मी स्वभाषेत बोलता कामा नये? मला दुभाष्याची जरूर पडावी? हिंदुस्थानाला गुलाम बनविणारे हे आपणच इंग्रजी शिकलेले लोक.

इंग्रजीचा उपयोग :

आपण या रोगाने इतके पिडलो गेलो आहोत की, मुळीच इंग्रजी न शिकताही चालेल अशी वेळ आता राहिली नाही. यासाठी ज्यांनी ते शिक्षण घेतले आहे त्यांनी त्याचा सदुपयोग करावा. इंग्रजांबरोबर व्यवहार करताना आपली भाषा न जाणणाऱ्या इतर हिंदी लोकांशी बोलण्याचा प्रसंग येईन तेव्हा (हिंदी येत नसेल तर) आणि इंग्रज लोक स्वतःच आपल्या सुधारणेला कसे कंटाळून गेले

आहेत हे समजून द्यावे म्हणूनच, तेवढ्यापुरता त्याचा उपयोग करावा.

गांधीजी जेव्हा शिक्षणासंबंधी आपले विचार मांडतात, त्यावेळी शिक्षणाचे माध्यम म्हणुन मातृभाषेचा पुरस्कार करतांना दिसतात. जे इंग्रजी शिकले आहेत, त्यांनी राष्ट्रातील मुलांना प्रथम नीतीशिक्षण द्यावे, मग स्वभाषेचे, इतर एखाद्या प्रांतिक भाषेचे व हिंदी भाषेचेही शिक्षण द्यावे. पण ते शिकण्याचा उद्देश हा असावा की आपणास अखेरीस त्या भाषेची जरूर पडणार नाही असे करावयाचे आहे. इंग्रजी शिकून पैसे मिळवू या इच्छेने ते शिकता कामा नये.

विविध भाषांचे परस्परसंबंध :

गांधीजी म्हणतात की, स्वभाषेतून मातृभाषेतूनच शिक्षण घेतले पाहिजे. पुष्कळसे शास्त्रीय विषय एकदम शिकण्याचा भ्रम टाकून दिला पाहिजे. प्रत्येक हिंदी मनुष्याला स्वभाषा, हिंदूना संस्कृत, मुसलमानांस अरबो, पारशांना आणि पारशी लोकांनी संस्कृत शिकले पाहिजे. कित्येक मुसलमानांनी आणि पारशी लोकांनी संस्कृत शिकले पाहिजे. पुष्कळ उत्तर व पश्चिम हिंदुस्थानातील लोकांनी तामिळ शिकले पाहिजे. सर्व हिंदुस्थानची सामान्य भाषा हिंदी झाली पाहिजे. तसेच ती उर्दु किंवा देवनागरी वाटेल त्या लिपीत लिहिण्याची मोकळीक असावी. हिंदू मुसलमानात निकट संबंध रहावा यासाठी पुष्कळ हिंदू लोकांनी उर्दु लिपी शिकली पाहिजे. अशा रितीने हिंदू मुसलमानांच्या संघटित व्यवहाराने इंग्रजी भाषेचे आपल्यावर असणारे प्रभुत्व नष्ट करता येईल.

स्वभाषेचा वापर :

गांधीजींचा इंग्रजी भाषा शिकण्याला विरोध नाही, तर इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम म्हणून स्वीकारण्यास ते तयार नाहीत. मातृभाषा माध्यम असावी असे म्हणतांना आपल्यापुढे अशी अडचण निर्माण

होते की, सर्वंच स्वभाषा काही इतक्या विकसित झालेल्या नाहीत. त्यामुळे गुंतागुंतीचा असा आधुनिक विचार तिच्यात मांडता येणार नाही. मांडला तरी सर्वांना आकलन होणार नाही. पण याची दुसरी बाजू अशी सांगता येईल की, भाषा वापल्यामुळे विकास पावते. नवीन ज्ञान आणि विचार पचविल्यानंतर अधिक समर्थ, विकसित स्वरूपात विशिष्ट भाषा आधुनिक ज्ञानाला सामोरी जाते.

गांधीजींचे अनुभव :

गांधीजींच्या मते परकीय भाषेच्या माध्यमाव्दारे भारतात शिक्षण दिले जाते. यामध्ये देशाची बौध्दिक हानी होते. यासाठी ते स्वतःच्या अनुभवावरून एकंदरीत परिणामांचा साकल्याने विचार करून कारणे सांगतात. या ठिकाणी ते त्यांचे अनुभव सांगतात. अनुभवाच्या आधारे परकीय भाषेचा माध्यम म्हणुन स्वीकार केल्यामूळे होणारे दुष्परिणाम स्पष्ट करून सांगतात.

गांधीजी म्हणतात, वयाच्या १२ व्या वर्षापर्यन्त मी सर्व शिक्षण माझ्या मातृभाषेतून गुजराथीतून घेतले. इतिहास, भूगोल आणि अंकगणित या विषयांचा समावेश त्या शिक्षणात होता. नंतर मी हायस्कूलमध्ये प्रवेश केला. तेथेही पहिली तीन वर्षे मातृभाषाच माध्यम होते. पण शिक्षकाचे काम होते विद्यार्थ्यांना कसेही करून इंग्रजी शिकविण्याचे, त्यामूळे आमचा अर्ध्यापेक्षा अधिक वेळ स्पेलिंग व उच्चार आत्मसात करण्यात जातो. जी भाषा लिहिल्याप्रमाणे उच्चारली जात नाही, तिचा अभ्यास म्हणजे खरोखरच कष्टदायक गोष्ट होय. एकंदरीत पहिली तीन वर्षं बरी गेली. चौथ्या वर्षापासून दुदंशेला सुरवात झाली. त्यावेळी भूमिती, बीजगणित, रसायनशास्त्र, खगोलशास्त्र, इतिहास आणि भूगोल सर्वंच इंग्रजीतून शिकावे लागे. इंग्रजीचा जुलूम इतका की, संस्कृत व पर्शियन सुध्दा इंग्रजीतून शिकावे लागे. मातृभाषेतून शिकता येत नसे. वर्गांत जर कृणी गुजराथी बोलत असेल तर त्याचे शिक्षकाला

वाईट वाटत नसे- त्याला नीट उच्चारही करता येत नसेल, पूर्णपणे समजत नसेल तरीही चालत असे. शिक्षकाने तरी या गोष्टींची काळजी कां करावी? त्यांचे तरी इंग्रजी शुध्द कोठे होते? या शिवाय आणखी दुर्दशा ती कोणती? इंग्रजी ही विद्यार्थ्यांसाठी जेवढी परकीय भाषा होती तेवढीच शिक्षकांना परकीय होती.

गांधीजी वरीलप्रमाणे ते अनुभव सांगतात, त्यावरून त्यांच्या वेळी चालू असलेल्या शिक्षणपध्दतीची कल्पना येते. केवळ माध्यम एक परकीय असल्यामुळे विद्यार्थी व शिक्षक दोघांच्याही शक्तीचा, वेळेचा अपव्यय होत असे. परकीय भाषेतून शिक्षण घेतल्याने दोन प्रकारच्या अडचणी आपण एकाच वेळी विद्यार्थ्यासमोर ठेवत असतो. पहिली म्हणजे परकीय भाषेची अडचण व दुसरी म्हणजे नवीन अडचण म्हणुन गांधीजी म्हणतात की, शिक्षणाचे माध्यम परकीय भाषा न ठेवता मातृभाषा ठेवावे.

इंग्रजी माध्यमाचे दुष्परिणाम :

अ. गांधीजी म्हणतात, इंग्रजी माध्यमाचा परिणाम असा होत असे की, विद्यार्थी न समजता पाठांतर करण्याकडे प्रवृत्त होत असत. भूमिती म्हणजे अक्षरशः डोकेदुखी वाटत असे. युवलीडच्या १३ व्या प्रमेयापर्यंन्त आले तरी भूमिती म्हणजे काय हे त्यांना कळाले नाही. गांधीजी कबूल करतात की, मातृभाषेवर त्यांचे प्रेम असूनही बीजगणित, भूमिती आदि विषयातील पारिभाषिक संज्ञाना गुजराथी काय संज्ञा आहेत हे त्यांना आजही ठाऊक नाही. त्यांचे असे स्पष्ट मत आहे की, जे विषय इंग्रजीतून शिकण्यासाठी त्यांना चार वर्षे लागली तेच ज गुजराथीतून-मातृभाषेतून शिकले असते तर एका वर्षांत शिकता आले असते. गांधीजींच्या मते मातृभाषेतून निरनिराळे विषय सुगम पध्दतीने शिकविता येतात आणि कितीतरी अधिक पटीने ज्ञान संपादन करता येते. मातृभाषेच्या माध्यमातून मिळणारे इतर विषयांचे ज्ञान सहज व स्पष्ट असते.

ब. सामान्यजनांसाठी निरूपयोगी :

गांधीजी म्हणतात की, मी जर मातृभाषेच्या माध्यमातून (गुजराथीतून) शिकलो असतो तर त्या ज्ञानाचा मला माझ्या घरात उपयोग झाला असता. परंतु इंग्रजी शिक्षणाने इंग्रजी न शिकलेले माझे कुटुंबीय व मी यांच्यात एक प्रकारची दरी निर्माण झाली आहे. मी काय करतो हे माझे वडील समजू शकत नाहीत. माझी कितीही इच्छा असली तरी माझ्या शिक्षणाबद्दल त्यांच्या मनात आस्था निर्माण करू शकत नाही. परिणामी मी स्वतःच्याच घरी (जलद गतीने) वेगाने परका बनत चाललो आहे.

या ठिकाणी एक महत्त्वाचा मुद्दा गांधीजी स्पष्ट करतांना दिसतात आणि तो म्हणजे आपण जे काही शिकू त्याचा समाजासाठी उपयोग झाला पाहिजे. केवळ जी व्यक्ती ज्ञान मिळविते त्या व्यक्तीपुरतेच ते मर्यादित राहिले, तर ते ज्ञान एका अर्थाने निरर्थकच होय. व्यक्तीपुरतेच ते मर्यादित राहिले, तर ते ज्ञान एका अर्थाने निरर्थकच होय. ज्ञानाच्या प्रक्रियेत संप्रेषण (Communication) महत्त्वाचे आहे. गांधीजी म्हणतात, हायस्कुलातील पहिल्या तीन वर्षात माझ्या सामान्य ज्ञानात फारच थोडी भर पडली. आणि हे जू काही अल्प ज्ञान झाले तेही सर्वसामान्य जनांपर्यन्त पोहोचविता आले नाही, सामान्य भाषेतून ज्ञान घेतल्यामूळे शिक्षणाचा (Communication) हा हेतूच बाजूला राहतो. गांधीजींनी जो काही इंग्रजी वाड्मयाचा अभ्यास केला, त्यात उत्कृष्ट प्रतीचे गद्य, पद्य होते, यात शंकाच नाही, परंतु सामान्य माणसांच्या उपयोगी पडण्यासाठी किंवा त्यांच्या निकट सान्निध्यात येण्यासही त्याचा काहीच उपयोग झाला नाही.

मातृभाषा माध्यम असण्याचे फायदे :

इंग्रजी वाड्मयाचा अभ्यास करण्यामध्ये ती सात वर्षे खर्च केली गेली, तीच जर गुजराथीवर प्रभुत्व मिळविण्यासाठी खर्च केली

असती, गणित, विज्ञान, संस्कृत इत्यादी विषय गुजराथीतून शिकलो असतो तर अशा तऱ्हेने संपादन केलेल्या ज्ञानांत गांधीजी त्यांच्या शेजाऱ्या पाजाऱ्यांना सहभागी करून घेऊ शकले असते. त्या परिस्थितीत ते कदाचित गुजराथीत भर चालू शकले असते. गांधीजी त्यांच्या अनुभवांचे विवेचन करताना गुजराथीवर प्रभुत्व मिळविण्यासाठी खर्च केली असती. गणित, विज्ञान, संस्कृत इत्यादी विषय गुजराथीतून शिकलो असतो तर अशा तऱ्हेने संपादन केलेल्या ज्ञानांत गांधीजी त्यांच्या शेजाऱ्या पाजाऱ्यांना सहभागी करून घेऊ शकले असते. त्या परिस्थितीत ते कदाचित गुजराथीत भर चालू शकले असते. गांधीजी त्यांच्या अनुभवांचे विवेचन करताना गुजराथीचा संदर्भ घेत असले तरी त्यांना मातृभाषा स्वभाषा शिक्षणाने माध्यम असावे असेच सांगावयाचे आहे.

स्वभाषेचा विकास :

गांधीजींच्या मते परकीय सामुग्रीच्या जोरावर आपली कधीच उन्नती होत नसते. परदेशातील हवामान, निसर्गसौन्दर्य देखावे याचे आपल्यास जेवढे महत्त्व वाटते तेवढेच त्यांच्या साहित्याबद्दल वाटले पाहिजे. आपल्याला आपल्या वाङ्मयाची भरभराट करावयाची आहे. तुलनेने जरी ते इंग्रजांपेक्षा कमी दर्जांचे असले तरीही पुढच्या पिढीसाठी जो वारसा तयार करावयाचा आहे तो स्वभाषेचा, स्वभाषेतील वाङ्मयाचा असला पाहिजे. राष्ट्राकडे स्वतःच्या वाङ्मयाचा खजिना असावा. त्यासाठी अन्य भाषेतील बहुमोल साहित्याचा साठा आपल्या भाषेत आणावा.

उत्कृष्ट वाङ्मयाचे भाषांतर :

गांधीजी जेव्हा शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी असे म्हणतात, तेव्हा त्यांना इतर भाषेतील वाङ्मयाबद्दल व्देष वाटत असतो, असे नाही. मातृभाषाच सार्थ अभिमान असावा पण परकीय भाषेच्या माध्यमातून शिक्षण घेताना जो वेळेचा, शक्तीचा अपव्यय

होतो, तो टाळण्यासाठी मातृभाषाच माध्यम असावी. तरच ते ज्ञान झपाटयाने पसरेल, सामान्य जनांपर्यंन्त जाऊन पोहोचेल. इतर भाषेतील चांगले साहित्य आपल्याला अनुवादाच्या साहाय्याने वाचता येईल. अभ्यासता येईल. रविंद्रनाथांच्या अनुपम सौन्दर्याकृतींचा आस्वाद घेण्यासाठी बंगाली शिकणे आवश्यक आहे असे नाही. (योग्य अनुवाद वाचूनही तो आनंद मिळविता येईल.) टॉलस्टॉयच्या कथा समजण्यासाठी गुजराथी मुलामुलींना रशियन शिकण्याची आवश्यकता नाही. योग्य अनुवाद वाचूनही त्या वाड्मयाचा आस्वाद घेता येतो. इंग्रजी साहित्य भांडार कितीही उत्कृष्ट असले तरी त्यासाठी इंग्रजीच शिकायला पाहिजे असे नाही हेच गांधीजी स्पष्टपणे सांगतात.

जगातील भिन्नभिन्न भाषांतील उत्कृष्ट साहित्याचा अभ्यास करावयाचा व त्यांचा देशी भाषेत अनुवाद करावयाचा हेच ज्यांचे काम आहे, अशा विद्यार्थ्यांचा एक वेगळाच वर्ग तयार केला तर एक प्रकारची फार चांगली काटकसर होईल.

गांधीजी म्हणतात, माझ्या घराच्याभोवती चारी बाजूंनी तटबंदी उभारली जावो, त्याच्या खिडक्या बुजवून टाकण्यात याव्यात अशी माझी मुळीच इच्छा नाही. सर्व देशीच्या संस्कृतीचे वारे आपल्या घराभोवती मुक्तपणे विहरत रहावेत, परंतु कोणत्याही वाऱ्याबरोबर वहात जाऊ नये, खोटा अभिमान मिळविण्यासाठी किंवा अनिश्चित सामाजिक लाभासाठी इंग्रजी शिक्षणाचा अनावश्यक भार कुणीही डोक्यावर घेऊ नये. साहित्याची आवड असणाऱ्या लोकांनी इंग्रजीचा आणि अन्य विश्वभाषांचा त्यांना हवा असेल तेवढा अभ्यास करावा. परंतु अखेर जगदीशचंद्र बोस, प्रफुल्लचंद्र रॉय किंवा रविंद्रनाथ यांच्या प्रमाणे आपल्या विध्दत्तेचा लाभ भारताला व जगाला द्यावा. गांधीजींना आपल्या मातृभाषेत

विसरणारा तिची आपले उत्कृष्ट विचार मायबोलीत प्रगट करता येणार नाहीत असे म्हणणारा एकही भारतीय नको आहे.

आमच्या देशातील स्त्री पुरूष इंग्रजीच्या अध्ययनाला आज जेवढा वेळ देतात, त्यापेक्षा त्यांनी तो कमी द्यावा असे गांधीजी म्हणतात, तेव्हा त्यापासून मिळणाऱ्या आनंदापासून एखाद्याला वंचित करणे हा त्यांचा हेतू मुळी नसतोच. त्यांच्या मते आपण स्वाभाविक पध्दतींचा अवलंब केला तर तोच आनंद आपल्याला कमी श्रमात मिळू शकेल. या जगात अप्रतिम सौन्दर्य असलेली अनेक रत्ने आहेत, पण ती सारी काही इंग्रजी वातावरणातून निर्माण झालेली नाहीत. इतक्या सुंदर ललितकृती निर्माण केल्याचा गर्व इतर भाषांनाही पाहता येईल. त्या साऱ्या कृती सर्वसामान्य जनतेला उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. जेव्हा आमचे विद्वान त्याचा आपापल्या भाषेत अनुवाद करतील तेव्हाच हे शक्य होणार आहे.

गांधीजी म्हणतात, की मी दैनंदिन जीवनातील पुराव्यावरून असे सांगू शकतो की, लाखो लोक सतत चुकीच्या मार्गाने जात आहेत, शिक्षणामुळे त्यांचे अभारतीयकरण होत आहे. माझ्या सहवासात असे काही पदवीधर आले की त्यांना स्वतःचे विचार मातृभाषेत व्यवस्थितपणे मांडता येत नाहीत. ते त्यांच्याच घरात परके (अनोळखी) बनले आहेत. त्यांच्या मातृभाषेतील शब्दसंग्रह इतका अपुरा आहे की ते इंग्रजी शब्दांची व वाक्यांची मदत न घेता त्यांचे बोलणेच पूर्ण करू शकत नाही ते इंग्रजी पुस्तकांशिवाय राहू शकत नाहीत. मित्रांना वा नातेवाईकास पत्र लिहावयाचे झाले तरी इंग्रजीतूनच लिहितात. मी माझ्या मित्रांवरून हे स्पष्ट करू शकतो की ही वाईट गोष्ट किती खोलपर्यंन्त रूजली आहे. आम्हाला स्वत्व परत मिळविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील.

झाकीर हुसेन कमिटीनेही मातृभाषेवर भर दिला. उपयुक्ततेच्या मूल्यांच्या संदर्भात तसेच वाड्मय निर्मितीच्या संदर्भातही मातृभाषेला प्राधान्य दिले. एकंदर शिक्षणप्रक्रियेत. मातृभाषेला अशा प्रकारचे स्थान उद्दिष्टे साध्य व्हावीत.

१. संभाषणात स्वाभाविकपणा, मोकळेपणा व आत्मविश्वास यावा उद्दिष्टांबद्दल, एकंदर सामाजिक परिस्थितीबद्दल, विद्यार्थ्यांच्या भोवताली असणाऱ्या परिसराबद्दल बोलतो तेव्हा वरील गुण दिसून यावेत.

२. दैनंदिन जीवनातील एखाद्या विषयावर सुसंगतपणे, मुद्देसूद व सुसंबध्दपणे बोलता यावे.

३. सामाजिक प्रश्नांच्या संदर्भातील लिखाण शांतपणे, बौध्दिकपणे वाचन करण्याची क्षमता निर्माण व्हावी. कमितकमी वर्तमानपत्रे, मासिके तरी अशा पध्दतीने वाचता येतील इतपत विकास व्हावा.

४. गद्य किंवा पद्य आपण जेव्हा मोठ्याने वाचत असू त्यावेळी ते स्पष्ट प्रभावी असावे. त्या वाचनापासून आनंद मिळावा.

५. मातृभाषेच्या अभ्यासाने पुढील क्षमता निर्माण व्हावी, आवश्यक त्या विषयाच्या संदर्भात यादी तयार करणे, अनुक्रम लावणे, शब्द संग्रहाचा व संदर्भ ग्रथांचा वापर करणे. माहितीसाठी आणि साहित्यापासून मिळणाऱ्या आनंदासाठी ग्रंथालयाचा उपयोग करून घेता आला पाहिजे.

६. शुध्द, स्वच्छ व योग्य गतीने लिहिता आले पाहिजे.

७. दैनंदिन जीवनात घडणाऱ्या गोष्टीचे वर्णन साध्या व स्पष्ट शैलीतून लिहिता आले पाहिजे. उदा. सहकारी योजनेच्या संदर्भात एखाद्या खेड्यात झालेल्या मीटिंगचा अहवाल तयार करता आला पाहिजे.

८. वैयक्तिक पत्रे आणि व्यापाराच्या संदर्भातील आवश्यक ती साध्या स्वरूपाची कागदपत्रे लिहिता आली पाहिजे.

९. प्रसिध्द लेखकांच्या साहित्याचा अभ्यास करून त्याबद्दल आपली आवड व्यक्त करता आली पाहिजे. स्वतःचे मत मांडता आले पाहिजे.

मातृभाषेऐवजी परकीय माध्यम स्वीकारले तर भारतीय जीवनाशी जिचा संबंध नाही अशा परकीय संस्कृतीची जीवनाशी ओळख होते. त्यांतून सुशिक्षितांचा जो एक वेगळाच वर्ग निर्माण होतो. दिवसेंदिवस सुशिक्षित व अशिक्षित यांच्यातील अंतर वाढत जाते. म्हणून गांधीजींना असे वाटते की ब्रिटिश पध्दतीनुसार, इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणे म्हणजे वेळेचा, पैशाचा, शक्तीचा अपव्यय होतो. त्या शिक्षणातून काहीही निष्पन्न होत नाही. गांधीजी म्हणतात की आपण जे काही शिक्षण घेऊ त्यांचे स्वरूप असे असले पाहिजे की, आपले ज्ञान समाजाच्या खालच्या थरापर्यन्त झिरपत (फिल्ट्रेशन) गेले पाहिजे.

प्रकरण सातवे
वर्धा-शिक्षण योजना

वर्धाशिक्षण योजनेच्या संदर्भात पहिला प्रश्न असा विचारला जातो की, ही केवळ प्रासंगिक (सध्याच्या वेळेला अनुकूल) अशी तात्पुरती योजना आहे का? 'अनेक' प्रमुख शिक्षणतज्ञांचे असे म्हणणे आहे की, आज ना उद्या या हस्तव्यवसायांचे मोठ्या औद्योगिकरणात रूपांतर होणार. या योजनेनुसार शिक्षण घेतलेला समाज खरोखरच न्याय, सत्य व अहिंसा यांवर आधारलेला असणार आहे कां ? औद्योगिकरणाच्या प्रक्रियेचा व्याप पेलवण्याइतके शिक्षणाचे पुनरूज्जीवन होईल का?

गांधीजी या प्रश्नाला असे उत्तर देतात की, लाखो गरजू लोकांचे प्रश्न विचारात घेऊन ही योजना आखली आहे. खेड्यांचा अवशेषसुध्दा शिल्लक राहणार नाही. इतके औद्योगीकरण भारतात होणार नाही. भारताचा अधिकांश हा खेड्याचाच राहणार आहे.

गांधीजींच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते ती अशी की, गांधीजींचा सामाजिक व्यवस्थेवर भर आहे. ज्या समाजात प्रत्येकाला आपले ध्येय इतर व्यक्तींच्या मार्गांत न येता गाठता येईल. इतरांना मदत व सहकार्य करीत करीत सत्याचा शोध घेता येईल, अशा समाजाचा आदर्श गांधीजींपुढे आहे. समाजाची सुव्यवस्था ही व्यक्तीच्या सर्वोच्च ध्येयासाठी तसेच समाजाच्या जास्तीत जास्त हितासाठी उपयुक्त ठरेल अशी असली पाहिजे, तसेच ती सत्य व अहिंसेवर आधारित असली पाहिजे. अशा समाजात गरीब व श्रीमंत अशी वर्गवारी असावयास नको. जन्म, संपत्ती व व्यवसाय इत्यादींवर आधारित वर्गवारीला गांधीजींचा विरोध होता.

आचार्य कृपालानी म्हणतात की, शिक्षणामध्ये कृती सराव या गोष्टी असल्याच पाहिजेत. पण हे एकंदरीत ती योजना यशस्वी करण्याच्या दृष्टीने असावे. आजच्या मुलांना भविष्यात नैतिक व सर्व शोषणापासून मुक्त असा समाज मिळावा यासाठी प्रयत्नरत असले पाहिजे.

'मारवाडी हायस्कूल' या संस्थेला 'नवभारत विद्यालय' असे नामाभिधान देण्याच्या प्रसंगी एक समारंभ आयोजित करण्यात आला. त्यावेळी भारतातील काही शिक्षणतज्ञ व गांधीजी यांच्यात 'हरिजन' मधील लेखांच्या अनुषांगाने शिक्षणाविषयक चर्चा (झाली) घडवून आणली. १९३७ च्या २२ व २३ ऑक्टोबरच्या अध्यक्षीय भाषणातून गांधीजींनी त्यांच्या वर्धा शिक्षण योजनेचे स्वरूप स्पष्ट केले. त्यांत त्यांनी नव्या शिक्षणपध्दतीची वैशिष्टये (त्यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानानुसार) मांडली. त्यांवर इतर शिक्षणतज्ञांशी चर्चा झाली. डॉ. झाकीर हुसेन, के. टी. शाह, आचार्य विनोबा भावे, काका कालेलकर, श्री. महादेव देसाई आणि अनेक शिक्षणमंत्री यांनी चर्चेत भाग घेतला होता.

या संमेलनानंतर डॉ. झाकीर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीने शिक्षणयोजनेचा सविस्तर आराखडा तयार केला. ज्यात गांधीजींनी सांगितलेली वैशिष्टये समाविष्ट करण्यात आली. त्यानुसार सर्व शैक्षणिक घटकांचा विचार करून, २ डिसेंबर, १९३७ रोजी एक अहवाल गांधीजींना सादर करण्यात आला. हा अहवाल 'वर्धा' शिक्षण योजना' किंवा 'मूलभूत राष्ट्रीय शिक्षण' (Basic National Education) म्हणून ओळखला जातो.

वर्धा शिक्षण योजनेची वैशिष्टये :

१. मोफत व सक्तीचे शिक्षण :

गांधीजींच्या मते ७ ते १४ वर्षे वयाच्या सर्व मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षाण देण्यांत यावे. या योजनेत प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समाविष्ट करण्यात आलेले आहे. कारण असेच शिक्षण येथील खेड्यातून राहणाऱ्या जनतेला उपयुक्त ठरणार आहे. केवळ अशाप्रकारच्या शिक्षणानेच आपण ग्रामीण लोकांमध्ये सुधारणा घडवून आणू शकू असा त्यांचा विश्वास होता. गांधीजींच्या मते देशामध्ये लोकशाही यशस्वी करण्यासाठी किमान शिक्षण मिळालेच पाहिजे. ते म्हणतात की, उच्च शिक्षणासंबंधीचा विचार सावकाश केला तरी चालेल, परंतु प्राथमिक शिक्षण हे एक मिनिटसुध्दा लांगणीवर टाकून चालणार नाही.

२. हस्तव्यवसाय हे शिक्षणाचे केंद्र :

काही हस्तव्यवसायाच्या, उत्पादक व्यवसायाच्या माध्यमातून शिक्षण देण्यात यावे. हस्तव्यवसाय हा शिक्षणाचा गाभा राहील. इतर गोष्टी याला केंद्र कल्पून करण्यात येतील.

आपण जे काही हस्तव्यवसाय निवडणार आहोत तो पध्दतशीरपणे, वैज्ञानिकरीतीने शिकविण्यात यावेत. ज्यामूळे त्या शिक्षणाचा व्यवहारात उपयोग होईल. हे केवळ बौध्दिक शिक्षणाचे किंवा आर्थिक स्वावलंबनाचे साधन नाही. तर हस्तव्यवसाय हे एकाच वेळी साध्य व साधन आहे.

३. स्वावलंबन :

गांधीजी म्हणतात की, भारतातील ग्रामीण जनतेचा विचार केला तर असे स्पष्टपणे दिसून येते की, शिक्षण हे सक्तीचे असले पाहिजे आणि स्वावलंबी असले पाहिजे. गांधीजींच्या मते १४ वर्षाची व्यक्ती (मुलगा किंवा मुलगी) सात वर्षांच्या अभ्यासक्रमानंतर मिळवता घटक बनली पाहिजे. गांधीजींच्या योजनेतून एकाच वेळी

शिक्षण घेणे व बेकारी निवारण या दोन्ही गोष्टी साध्य होतात. झाकीर हुसेन कमिटीने स्वालंबनाच्या तत्त्वाला प्राधान्य दिले.

४. शिक्षणाचे माध्यम :

गांधीजींच्या विचाराच्या प्रकरणात डॉ. झाकीर हुसेन कमिटीने माध्यमाची त्रासदायक समस्या सोडवली. या समस्येचा वास्तववादी भूमिकेतून विचार केला. मूलभूत शिक्षण हे मातृभाषेतून देण्यात यावे. कमिटीने एकंदर परिस्थितीच्या निरीक्षणातून पुढील निष्कर्ष काढला. मातृभाषेचा योग्य अभ्यास हा एकंदर शिक्षणाचा पाया आहे. परिणामकारकपणे बोलण्याची क्षमता आणि शुध्द वाचण्याची क्षमता याशिवाय कुणालाही संकल्पनांचे, विचाराचे स्पष्टपणे ज्ञान होणार नाही.

५. अहिंसा तत्त्व :

गांधीजींची शिक्षणयोजना अहिंसा तत्त्वावर आधारित आहे. अहिंसा तत्त्वाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांला योग्य नागरिक बनविते.

६. आदर्श नागरिक :

वर्धा शिक्षण योजनेनुसार आदर्श नागरिकत्व ही शिक्षणव्दारे प्राप्त करण्याची महत्त्वपूर्ण बाब आहे. कारण आधुनिक भारताच्या नागरिकव्दारे देशाच्या लोकशाहीचा सामाजिक, अर्थिक व सांस्कृतिक जीवनाचा विकास साधावयाचा आहे.

नव्या पिढीमध्ये स्वतःच्या समस्या समजून घेण्याची क्षमता निर्माण व्हावी. हक्काची तसेच कर्तव्याची जाणीव व्हावी. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, बुध्दिमान नागरिकाने समाजकार्यांत सक्रीय भाग घ्यावा, सुसंस्कृत समाजाच्या संघटनेसाठी उपयुक्त सेवा करावी.

७. आदर्श सहकारी समाज :

वर्धा शिक्षण योजना आपल्याला आदर्श सहकारी समाजाचे स्वरूप सांगते. त्या समाजात समाजसेवेच्या प्रेरणेचा इतर सर्व

कृतीवर प्रभाव पडतो. वळण लागण्याचे लवचिक स्वरूपांचे जे वयोमान असते, त्यावेळी समाजसेवेची प्रेरणा या शिक्षणाव्दारे मिळते. शाळेत असतांना सुध्दा सहकार्यांच्या भावतेतून कृती केल्या जातात.

वरील तत्त्वांच्या आधारे डॉ. झाकीर हुसेन कमिटीने सात वर्षांच्या अभ्यासक्रमाचा व एकंदर योजनेचा मुख्य आराखडा तयार केला.

अभ्यासक्रमांतील विषय :

१. मूलभूत हस्तव्यवसाय :

गांधीजींच्या शिक्षणयोजनेत हस्तव्यवसायाला प्रथम स्थान देण्यात आलेले आहे. कारागीर तयार करणे, एवढेच फक्त वर्धा शिक्षण योजनेचे उद्दिष्ट नाही तर सर्व प्रकारच्या पिळवणुकीपासून मुक्त होण्याचा मार्ग त्यांतून सापडतो.

कमिटीने सोयीचे असे काही हस्तव्यवसाय सुचविले आहेत. उदा. १. शेती, २. सूत कांतणे, व विणणे, ३. लाकडी काम कार्डबोर्डस् तयार करणे इत्यादी. इतर हस्तव्यवसायाला जोडून किंवा हस्तव्यवसायाच्या व्दारे शिकविण्यात यावा.

एकंदर अध्यापन हे जीवनातील परिस्थितीशी जुळवून करण्यात यावे. हस्तव्यवसाय किंवा सामाजिक परिस्थिती यांच्याशी संबंध जोडून जर शाळेत शिकविण्यास आले तर विद्यार्थी अधिक कृतिशील होतात.

गांधीजींचे वेगळे वैशिष्टय असे की, त्यांनी शाळेतील इतर विषयांप्रमाणे हस्तव्यवसाय हा एक विषय असे सांगितले नाही तर हस्तव्यवसायाव्दारे इतर विषय शिकविण्यात यावेत असे सांगितले. गांधीजींच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा हा क्रांतिकारी घटक होय.

२. मातृभाषा : मातृभाषेच्या शिक्षणाबद्दल व उद्दिष्टांबद्दल सविस्तर विचार आपण 'प्रकरण सहा' मध्ये केलाच आहे.

३. गणित : गणिताचे शिक्षण देण्यामागे कमिटीचा असा हेतू होता की, सर्वसामान्य संख्याशास्त्रीय समस्या वेगाने सोडवता याव्यात (दैनंदिन जीवनात जेव्हा हिशेब वगैरे करण्याचे वेळ येते तेव्हा तो चटकन करता यावा.) विद्यार्थ्यांना बुक किपिंग व व्यापाराची सवय व्हावी अशीही अपेक्षा होती.

४. सामाजिक शास्त्रे : सामाजिक शास्त्रामध्ये इतिहास, भुगोल, नागरिकशास्त्र इत्यादींचा समावेश करण्यात आला. विद्यार्थ्यांला सामाजिक परिस्थितीशी जुळवुन घेता यावे असे उद्दिष्ट होते. ऐतिहासिक घटनांचे तसेच भौगोलिक परिसराचे ज्ञान व्हावे.

नागरिकशास्त्र शिकविण्याचे उद्दिष्ट (आजच्या) समस्यांबद्दल जाणीव व्हावी आणि विद्यार्थ्यांना योग्य प्रकारच्या सामाजिक व बौध्दिक सवयी लागाव्यात.

कमिटीने सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासाची पुढील उद्दिष्टे सांगितली :

अ. भारताच्या व एकूण मानवाच्या प्रगतीबद्दल आस्था निर्माण व्हावी.

ब. सामाजिक व भौगोलिक परिस्थितीची योग्य समज तसेच त्यात सुधारणा करण्याची जाणीव निर्माण व्हावी.

क. मातृभूमीबद्दल प्रेम, इतिहासाचा अभिमान, उज्ज्वल भवितव्याची आशा निर्माण व्हावी. प्रेम, सत्य, न्याय या तत्त्वांवर आधारित असा देश म्हणजे एक कुटुंब या भावनेचा विकास व्हावा.

ड. नागरिकांच्या हक्कांची व कर्तव्याची जाणीव व्हावी.

ई. सामाजिक व वैयक्तिक सद्‌गुणाचा विकास व्हावा, ज्यामूळे शेजाऱ्यांशी विश्वसनीय संबंध राहतील.

फ. जागतिक धर्मांच्या विकासाची भावना निर्माण व्हावी.

५. सामान्य विज्ञान : कमिटीने विज्ञानाच्या अभ्यासात पुढील गोष्टींचा समावेश केला. सृष्टीज्ञान, प्राणीशास्त्र, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र, रसायनशास्त्र इत्यादी अभ्यासाची पुढील वैशिष्टये सांगितली :

अ. निसर्गाकडे पाहण्याची बौध्दिक व सौन्दर्यदृष्टी लाभावी.

ब. योग्य निरीक्षण करून प्रयोगाच्या साहाय्याने अनुभवाचा पडताळा घेण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची तयारी व्हावी.

क. महत्त्वाची वैज्ञानिक तत्त्वे माहित व्हावीत. उदा. सभोवतालची नैसर्गिक परिस्थिती माहीत व्हावी, तसेच मानवाच्या सेवेसाठी विज्ञानाचा उपयोग व्हावा.

ड. श्रेष्ठ वैज्ञानिकांनी सत्याच्या शोधासाठी केलेले बलिदान, त्यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटना-इत्यादींची माहिती विद्यार्थ्यांच्या मनाचा विकास होण्यासाठी उपयुक्त ठरते.

६. चित्रकला : पहिल्या चार वर्षांत चित्रकलेचा संबंध वाचन व हस्तव्यवसायाशी संबंधित आकृत्या वगैरेशी आहे. नंतरच्या तीन वर्षांत मात्र सजावट, डिझाईन तयार करणे आणि इतर तांत्रिक दृष्टीने चित्रकला शिकविण्यात यावी.

चित्रकलेच्या अभ्यासाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे सांगता येतील :

अ. डोळ्यांना निरीक्षणाची सवय व्हावी आणि रंग आकार याबद्दल सौन्दर्यदृष्टी निर्माण व्हावी.

ब. आकारसंबंधीच्या स्मरणशक्तीचा विकास व्हावा.

क. निसर्गातील आणि कलेतील सौन्दर्यांचे ज्ञान व्हावे व आस्वाद घेता यावा.

ड. डिझाईन आणि सजावट रसिकतेने करण्याची क्षमता निर्माण व्हावी.

वरील उद्दिष्टे चित्रकलेचा शिक्षणात समावेश केल्याने साध्य होतात. वनस्पतींची प्राण्यांची व माणसांची चित्रे यांचा विज्ञानाशी व हस्तव्यवसायाशी संबंध येतो.

७. संगीत : कमिटीने संगीत या विषयाचा नियमित अभ्यासक्रम तयार केला केला नाही, कारण प्रत्येक विद्यार्थ्याला संगीताचे दृष्टीने ज्ञान देणे शक्य नाही. म्हणून सामुदायिक गायनाचा एक कोर्स सर्व वर्गासाठी ठेवण्यात आला, ज्यामूळे भारतीय राग व ताल यांची प्राथमिक स्वरूपातील माहिती होईल. या कोर्ससाठी गाणी काळजीपूर्वक निवडण्यात यावीत. राष्ट्रीयगीते, समूहगीते, भजने, विशिष्ट समारंभाची गीते आणि काही साधी दुतगतीने म्हणावयाचे गीते शिकविण्यात यावीत. सामुदायिक गायनाचा हस्तव्यवसायाशी संबंध जोडण्यात यावा.

८. हिंदुस्थानी : अनिवार्य विषय म्हणून कमिटीने हिंदूस्थानीस अभ्यासक्रमात समावेश दिला. या भाषेमुळे हिंदू व मुस्लीम या दोन भिन्न संस्कृतींचा संबंध येईल अशा व्यापक दृष्टिकोनातून अभ्यासक्रम ठरविण्यात आला.

गांधीजींच्या शिक्षणयोजनेतून त्यांना सामाजिक पुनर्निमिती साधावयाची आहे. त्यामूळे राजकीय गोष्टीशीही त्याचा जवळचा संबंध आहे. हिंदू मुस्लीम यांच्यातील विरोध कमी व्हावा हे राजकीय उद्दिष्ट साधण्यासाठी ते शिक्षणात हिंदुस्थानीचा समावेश करतात.

गांधीजींनी जे मूलभूत शिक्षण सांगितले ते म्हणजे त्यांना जी काही समाजाची पुनर्निर्मिती करायची होती तिचा एक महत्त्वपूर्ण घटक त्यांना देशाची नैतिक व बौध्दिक दृष्टिकोनातून घडण करावयाची होती. ती शिक्षणाव्दारे करता येईल असा त्यांना विश्वास होता आणि त्यानुसार त्यांनी वर्धा शिक्षण योजना सांगितली.

वर्धा शिक्षण योजना मोठ्या शहरात अजून लागू करण्यात आलेली नसली, आणि गांधीजींनी केवळ खेडयातील लोकांना

सोयीस्कर अशी योजना सांगितली असली तरी त्यामूळे त्यांच्या योजनेचे महत्त्व कमी होत नाही. त्यांनी खरोखरच क्रांतिकारी शिक्षणयोजना सांगितली, जी भारतीतील परिस्थितीला अनुकूल आहे. तसेच या योजनेमुळे भारतीयांपुढे असणाऱ्या विषमता, दारिद्रय, बेकारी इत्यादी समस्यांचे निराकरण होईल. ज्यावेळी खरोखरच नवीन अशा शिक्षणयोजनेची आवश्यकता स्पष्ट झाली, त्याचवेळी गांधीजींनी वर्धा शिक्षण योजना सांगितली.

गांधीजींच्या एकंदर शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे सार म्हणजे वर्धा शिक्षण योजना गांधीजी म्हणतात की सात वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करून बाहेर पडणारा १४ वर्षांचा विद्यार्थी हा कमावता घटक बनावा. गरिबांच्या जीवनाचे आपण जर बारकाईने निरीक्षण केले तर आपल्याला असे दिसून येते की, आजही गरीब शेतकऱ्यांची मुले आपल्या आईवडिलांना कामामध्ये हातभार लावतात. आपण जर मदत केली नाही तर आपले आईवडील काय खाणार आणि आपल्याला काय खायला घालणार, असा विचार ते करतात. गांधीजी म्हणतात की, अशा प्रकारची जाणीव म्हणजेच शिक्षण. राज्याने सात वर्षांचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांकडून पूर्ण करून घ्यावा आणि कमावता घटक म्हणून त्यांच्या आईवडिलांकडे सुपूर्त करावा. विद्यार्थ्यांना कोणता तरी हुद्दा (स्थान) मिळवून देणे व त्या अनुषंगाने शरीर, मन, आत्मा यांचा विकास साधणे, हस्तक्षराला वळण लावणे, सौन्दर्यदृष्टीचा विकास साधणे, अशा कितीतरी गोष्टी या योजनेव्दारे साध्य होतील. विद्यार्थी सात वर्षे ज्या हस्तव्यवसायाचा अभ्यास करेल त्याचे प्रभुत्व असेल.

गांधीजींनी जो सात वर्षांचा अभ्यासक्रम तयार केला त्यात प्राथमिक व माध्यमिक दोन्ही भाग समाविष्ट आहेत, या योजनेव्दारे बाहेर पडणारा विद्यार्थी मॅट्रिकच्या बरोबरीचा असेल. फक्त त्याला

इंग्रजी येणार नाही. परंतु त्याव्यतिरिक्त कितीतरी अनेक गोष्टींचे ज्ञान त्याला असेल.

गांधीजींच्या मते या शारिरिक शिक्षण हा सुध्दा शिक्षणातील महत्त्वपुर्ण घटक आहे. दक्षिण आफ्रिकेत त्यांनी जो शिक्षणविषयक प्रयोग केला त्या संदर्भात गांधीजी म्हणतात की, शेतावर काम करण्यासाठी नोकरांची आवश्यकता नव्हती तर सर्व कामे विद्यार्थीच करीत. स्वयंपाकपासून सर्व काम तेच करीत. तिथे अनेक फळांची झाडे होती. पुरेसे बागकाम होते. जे स्वयंपाक घरातील कामात गुतंलेले नसत ते बागकाम करीत. जमीन खोदणे, स्वच्छ करणे, सारखी करणे, यात लहान मुलांचा सुध्दा महत्त्वपूर्ण सहभाग असे. ह्या कामातून त्यांना पुरेसा व्यायाम मिळत असे. या कामातून त्यांना आनंद मिळत असे, त्यामूळे वेगळ्या खेळांची किंवा व्यायामांची आवश्यकता राहत नसे.

गांधीजींच्या मते हृदयाच्या शिक्षणाने, भावनांचे व प्रवृत्तींचे शुध्दीकरण होते. चित्रकला, सगित, हस्तव्यवसाय इत्यादींच्या अभ्यासाने प्रेम, सहानुभूती, सौन्दर्यदृष्टी या गोष्टी जागृत होतात.

प्रकरण आठवे
गांधीजींच्या शिक्षणविषयक विचारांचे टिकात्मक परीक्षण

आर्थिक घटक अधिक प्रभावी ठरण्याची शक्यता :

गांधीजींच्या एकूण शिक्षण विचारात स्वावलंबनाच्या तत्त्वाला अतिशय प्राधान्य असलेले दिसून येते. विद्यार्थी स्वावलंबी झाला पाहिजे, त्यांचा उदरनिर्वाह त्याला करता आला पाहिजे, तसेच शिक्षकाच्या पगाराचा खर्चंही उत्पादक व्यवसायातून निघाला पाहिजे असे ते म्हणतात. एकंदरीत या प्रक्रियेत आर्थिक घटक प्रभावी ठरतो.

या संदर्भात अशी टीका केली जाते की, आर्थिक (बाजूवर) घटकावर अधिक भर दिल्यामूळे सांस्कृतिक व शैक्षणिक उद्दिष्टांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे. अधिक अधिक उत्पन्न करून जास्तीत जास्त पैसा कसा मिळविता येईल याकडे विद्यार्थ्यांचा व पर्यायाने शिक्षकांचा कल राहील. सामान्य माणसे स्वार्थी व पैशाचे लोभी असतात, या गोष्टीकडे गांधीजींचे दुर्लक्ष झालेले दिसते. शैक्षणिक व आर्थिक या दोन्ही उद्दिष्टांमध्ये आपोआप समतोल राहील असे ते गृहीत धरतात.

शिक्षकसुध्दा पैशांकडे लक्ष ठेवून असल्यामूळे विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासाकडे लक्ष न पुरविता त्यांच्याकडून अधिकाअधिक श्रम व उत्पादन यांकडेच लक्ष देतील. शिक्षकांनी आर्थिक उद्दिष्टांकडे दुर्लक्ष होते. आर्थिकतेकडे अधिक लक्ष पुरविल्यामूळे शरीर, मन, आत्मा यांच्या विकासाला दुय्यम स्थान मिळते.

गांधीजींनी जरी हस्तव्यवसायाला प्राधान्य दिलेले असले, त्यामूळे येणारे स्वालंबन महत्त्वाचे मानलेले असले, तरी त्यांचा 'शिक्षणातून माणूस बनला पाहिजे' असा कटाक्ष आहे. त्यामूळे वरील स्वरूपाची टीका योग्य ठरत नाही. हृदयाचे शिक्षण, नैतिक

विकास महत्त्वाचा मानतात. आपल्या जीवनाव्दारे, चारित्र्याव्दारे शिक्षकांनी आदर्श घालून द्यावा असे म्हणतात. त्यामुळे आर्थिक घटक प्रभावी बनेल ही भीती निराधार ठरते.

वैयक्तिक व सामाजिक विकासात समतोल राहीलच असे नाहीः

गांधीजींच्या मते त्यांनी सांगितलेल्या शैक्षणिक पध्दतीने व्यक्तीचा सर्वांगीण विकास होईल. पर्यायाने समाज विकसित होईल. समाजाची प्रगती होईल. तत्त्वतः वैयक्तिक व सामाजिक उद्दिष्टांमध्ये जरी मेळ घातलेला असला तरी प्रत्यक्ष व्यवहारात तो मेळ टिकून राहीलच असे नाही.

सुशिक्षित व्यक्ती सामाजिक हिताचा विचार करतेच असे नाही. किंवा व्यक्ती-व्यक्तीचा विकास झाला म्हणून एकूण समाजाचा विकास झाला असे म्हणता येतेच असे नाही. किंबहूना सुशिक्षित व्यक्ती ही सामाजिक प्रश्नांबद्दल अधिक उदासिन असलेली दिसून येते. व्यवहारात हे दोन्ही एकत्रितपणे साध्य होतील असे म्हणता येत नाही.

गांधीजी म्हणतात, की शिक्षणाव्दारे जी विकसित व्यक्ती बाहेर पडेल, ती निश्चितच समाजाच्या प्रगतीचा विचार करेल. व्यक्ती-हित व समाजहित यांची योग्य सांगड सुशिक्षित व्यक्ती घालू शकेल असा गांधीजींना विश्वास वाटतो.

मातृभाषा माध्यम असण्यातील अडचणी किंवा सदोषता :

गांधीजी शिक्षणाच्या माध्यमाच्या संदर्भात विचार मांडतात तेव्हा त्यांचा मातृभाषेबद्दल आग्रह दिसून येतो. परंतु प्रादेशिक भाषांचा माध्यम म्हणून स्विकार होण्यास असणारा विरोध अनेकदा प्रामाणिक असतो, असे आपल्याला दिसून येते.

अ. सर्वच प्रादेशिक भाषा शिक्षणाच्या माध्यम होण्याइतपत विकसित असतीलच असे नाही. अतिशय गुंतागुंतीचा असा आधुनिक विचार तिच्यात मांडता येणार नाही. अतिशय गुंतागुंतीचा

असा आधुनिक विचार तिच्यात मांडता येणार नाही. हट्टाने मांडलाच तर तो कुणाला समजणार नाही. विज्ञानात ज्ञानाचे विशेषीकरण अतोनात वाढले आहे. ह्या कोटीचे सर्वज्ञान तात्काळ मराठीत (किंवा कोणत्याही प्रादेशिक भाषेत, मातृभाषेत) आणता येणे शक्य नाही.

या परिस्थितीत आपल्याला असे म्हणता येईल की, विशेषकांनी घडविलेल्या नवीन संकल्पना, लावलेले शोध हळूहळू त्या ज्ञानशाखेच्या मुलभूत मानलेल्या संकल्पना समूहात समाविष्ट होतात, इतर संकल्पनांशी त्याचा संबंध जुळून येतो, आणि त्या विषयाच्या अभ्यासकाला त्या समजून घ्याव्या लागतात. केवळ ह्या पायावर त्याला कोणतीही कोणतीही प्रगती करणे शक्य असते. एवढ्या पातळीपर्यंत, म्हणजे त्या ज्ञानशाखेचे मध्यवर्ती ज्ञान आणि त्याला तोलून धरणारा संकल्पनासमूह यांचे विवेचन करण्यासाठी मातृभाषेचा वापर शक्य आहे व आवश्यक आहे. आणि हे सारे त्या विषयात विध्यार्थ्याची गती चांगली व्हावी, त्याची समज पक्की व्हावी म्हणून करायचे आहे. पण ह्याचाच अर्थ असा होतो की, विज्ञानाच्या व्यवहारात मातृभाषेऐवजी अन्य प्रगत भाषेचा आधार घेणे स्वाभाविक आहे. ही भाषा आपल्या दृष्टीने इंग्रजीच राहणार, ह्याचे एक कारण आपली ऐतिहासिक पार्श्वभूमी ! दुसरे असे की, कोणत्याही विज्ञान शाखेचा संबंध आधुनिक कालात आंतरराष्ट्रीय असतो. वैज्ञानिक व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजी आज रूढ आहे.

ब. प्रादेशिक भाषा, मातृभाषा माध्यम म्हणून स्वीकारण्यातील दुसरी अडचण अशी की, मातृभाषेत पुरेशी ग्रंथसामग्री असणार नाही. अभ्यासक्रमातील कित्येक विषयावर लिहिण्यात आलेली मामुली पाठ्यपुस्तके सोडली, तर वेगवेगळ्या विषयांचे चोख विवेचन करणारी पुस्तके मराठीत किंवा कोणत्याही प्रादेशिक भाषेत अगदी

थोडी असतात. अशा स्थितीत ज्ञान कमावण्यासाठी एखाद्या संपन्न भाषेचा आश्रय घेणे अपरिहार्य आहे.

गांधीजी म्हणतात, की परकीय भाषेतील उत्तमोत्तम पुस्तकांची भाषांतरे करावित. परंतु भाषांतराचे हे काम अवाढव्य आहे, ते खूप काळ चालत राहणार. समाधानकारकपणे होणारही नाही. पण ते पुरे हाईपर्यांत आणखी प्रमाणग्रंथ इंग्रजीत प्रसिद्ध झालेले असणार हा व्यर्थ खटाटोप करण्यापूर्वी आहे ती परिस्थितीच चालू ठेवावी असे अनेकांना वाटते.

अखेरीस आधुनिक ज्ञान, संस्कृती यांच्याशी आपला संबंध इंग्रजींच्या व्दारेच जोडण्यात आला आहे. ह्या संस्कृतीतील तत्त्वे आपण आत्मसात केलीच पाहीजेत, नाही तर आपण आधुनिक जगात तग धरु शकणार नाही.

क. मातृभाषा (प्रादेशिक भाषा) शिक्षणाचे माध्यम म्हणून स्वीकारण्यामधील तिसरी अडचण अशी की, त्यामुळे भारत सांस्कृतीकदृष्ट्या विघटीत होईल. महाराष्ट्रात मराठी, गुजराथमध्ये गुजराथी, आंध्रमध्ये तेलगू अशा प्रकारे शिक्षणाचे माध्यम वेगवेगळे राहीले तर सांस्कृतीकदृष्ट्या एकात्मता राहणार नाही आणि भारत विघटीत होईल, ही परिस्थिती काहीही करून टाळली पाहिजे. भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांना साधणारी भाषा उच्च ज्ञानाचे माध्यम बनू शकणारी भाषाच असली पाहिजे यात शंका नाही. आज इंग्रजी हे कार्य करते व हिंदी तिची जागा सर्वतोपरी घेऊ शकत नाही हे उघड आहे. हिंदी भाषा आवश्यक तितकी विकसित होईपर्यन्त तरी इंग्रजी भाषाच माध्यम असणे अपरिहार्य आहे. इंग्रजी भाषेची समृध्दी त्यातील समृध्द ज्ञानयांचा विचार केला तर, त्या भाषेची अधिकधिक आवश्यकता पटायला लागते.

या संदर्भात गांधीजींच्या विचारांच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, गांधीजींनी मातृभाषेचा जो आग्रह धरला तो प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत वर्धा शिक्षण योजनेच्या संदर्भात ! या योजनेनुसार सात वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एखाद्याला इंग्रजीचा विशेष अभ्यास करायचा असेल तर त्याला गांधीजींचा विरोध नाही. इंग्रजी माध्यमामुळे शिक्षणाच्या सुरवातीलाच विद्यार्थ्यांच्या शक्तीचा जो अपव्यय होतो, त्रास होतो तो गांधीजींना नको आहे. म्हणून ते सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात मातृभाषा माध्यम असावी असा आग्रह धरतात.

शिक्षणयुध्दीसाठी समाजपरिर्वतन आवश्यकः

गांधीजींच्या मते त्यांनी सांगीतलेल्या शिक्षण योजनेनुसार शिक्षण घेतलेली व्यक्ती ही सर्वांगीण विकसित असेल आणि समाजाच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी प्रयत्नशील (सतत कार्यरत) राहील. गांधीजी असे म्हणतात की, शिक्षणाने समाजपरिवर्तन शक्य आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे.

दैनंदिन जीवनात, एकूण व्यवहारात आपल्याला याऊलट परिस्थिती दिसून येते. जेव्हा समाजपरिवर्तन होते, त्यावेळी शिक्षणात बदल झालेला दिसून येतो. समाजाकडे पाहण्याचा दृष्टीकोन जर बदलला तरच शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो. म्हणून शिक्षणाने-शिक्षणशुध्दीने समाजपरिवर्तन हे गांधीजी जेवढ्या सविस्तरपणे सांगतात, तेवढ्याच प्रभावीपणे त्याच्या उलट बाजू मांडली जाते. समाजात सुधारणा झाली तरच शिक्षणात सुधारणा होतील असे मत मांडले जाते. म्हणून विरोधी पक्षाकडून केवळ-शिक्षणात बदल झाल्याने भागेल का ? या प्रश्नाला नकारार्थी उत्तर मिळते.

केवळ शिक्षणातील बदल पुरेसा नाही :

वरील संदर्भात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा सांगता येईल की, विद्यार्थी शाळेत असतो त्यापेक्षा कितीतरी अधिक वेळ शाळेबाहेरच्या वातावरणात असतो. दिवसातील फक्त ४-५ तास तो शाळेत असतो, त्यानंतरच्या सर्व वेळात तो शाळेबाहेरील परिसरात असतो. त्यामूळे गांधीजींच्या शिक्षणपद्धतीनुसार जरी शिक्षण दिले तरी त्याला अनुकूल असे शाळेबाहेरचे वातावरण जर नसेल तर त्या शिक्षणाचा उपयोग होणार नाही.

विद्यार्थी ज्या परिसरात राहतो तो परिसर, त्याच्या कुटूंबातील वातावरण, शाळेव्यतिरिक्त इतर सामाजिक संस्था इत्यादिंचा विद्यार्थ्यांवर परिणाम होत असतो. म्हणून केवळ शाळेतील संस्कार पुरेसे ठरत नाहीत, कुटूंबाचेही सहकार्य त्यात आवश्यक ठरते.

नैतिक विकास केवळ शिक्षणातून शक्य आहे का ?

गांधीजींचा विद्यार्थ्यांच्या हृदयाच्या शिक्षणावर, नैतिक विकासावर भर आहे. यावर अशी टिका केली जाते की, केवळ शिक्षणातून म्हणजे शाळेव्दारे नैतीक विकास शक्य आहे का ? व्यवहारात आपण असे पाहतो की, नीतिशास्त्र शिकून कुणी नीतिमान होत नाही. नैतिक कृतीसाठी व्यक्तीच्या आतुनंच तशी प्रेरणा असावी लागते.

गांधीजी म्हणतात की, शिक्षकाचे जीवन चारित्र्यसंपन्न असावे. शिक्षकांचे विद्यार्थ्यांपुढे आदर्श घालुन द्यावा. मुळात शिक्षक चारित्र्यसंपन्न कसे असतील हा प्रश्न आहे. समजा, एखादी व्यक्ती नैतिकदृष्ट्या फार चांगली आहे, पण म्हणून त्या व्यक्तीला इतरांना चांगले बनविता येईलच असे नाही.

चारित्र्यसंपन्न आदर्श असे शिक्षक आहेत असे गृहीत धरले तरी, त्यांचा आदर्श समोर ठेवून त्यानुसार वर्तन करणारे विद्यार्थी

हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच असणार. आदर्श बघून काही सर्वच्या सर्व विध्यार्थी आदर्श होणार नाहीत.

खर्चिक पद्धती :

गांधीजी नई तालीम स्वावलंबी असली पाहिजे असे म्हणतात. विध्यार्थी हस्तव्यवसायातून जे काही उत्पादन करतील त्यातून त्यांचा उदरनिर्वाह तर झाला पाहिजेच. तसेच शिक्षकांना पगारही निघाला पाहिजे परंतू प्रत्यक्ष व्यवहारात ती पद्धती खर्चिक होताना दिसते. अनेक हस्तव्यवसायासाठी निरनिराळी सामुग्री, साधने पुरवावी लागतात. त्यामूळे बराच खर्च होतो.

सुरवातीला जे काही उत्पादन होते ते फारसे चांगले नसते. योग्य प्रतीचा माल तयार झाल्यामुळे विक्री होत नाही. त्यामुळे संस्थाचालक शिक्षक यांच्यावरील खर्चाचा भार दिवसेंदिवस वाढत जातो.

स्वस्त शिक्षण सुरू केलेल्या योजनेचे परिणाम जेव्हा अगदी उलट स्वरुपाचे होतात, अंमलबजावणी होत नाही, त्यावेळी योजना स्थगित होते.

गांधीजींच्या शिक्षणपध्दतीनुसार शाळा उघडायच्या म्हणजे त्यात (तोट्यात येतील) नुकसान होईल असा विचार केला जातो, त्यामुळे अधिक प्रतिसाद मिळत नाही.

मुल्य परिवर्तनाची तयारी नसते :

मुल्य परिवर्तनाच्या भुमिकेतून गांधीजींनी नवीन शिक्षणयोजना सांगीतली. परंतु त्यासाठी अनुकूल अशा शिक्षकांअभावी उद्दिष्टांप्रत जाता येत नाही. मूल्यपरिवर्तनासाठी लागणारी शक्ती आजच्या शिक्षकात दिसून येत नाही.

बेसिक शाळेतील शिक्षक स्वतःच्या मुलांना शिक्षणासाठी गयेला किंवा पाटण्याला पाठवितात. स्वतः शिक्षक असून, उत्तम

पद्धतीची जोड असूनही लोक आपल्या मुलांना या शाळेत का ठेवीत नाहीत, कारण उघड आहे त्यावर त्याचा विश्वास नसतो.

विनोबा भावे यांनी बेसिक शाळेतील शिक्षकांना असा प्रश्न विचारला की, शाळेत तुम्ही तीन तास उद्योग करविता, उद्योग करुन जी मजुरी मिळते तितकीच तीन तासांच्या शिकविण्याबद्दल तुम्हाला दिली तर तुमचे चालेल का ? या प्रश्नाला नकारार्थी उत्तर मिळते. याचा अर्थ असा की, उद्योगावर ते स्वावलंबी होऊ शकत नाहीत. कताई, विणाई इत्यादी उद्योगांची पातळी आम्हाला उंचवायची आहे. तर त्यासाठी आमचे जीवन खाली आणले पाहिजे. परंतु तसे करायची आमची तयारी नसते. म्हणजे काय ? तर नई तालीमच्या कोणत्याच मूल्यपरिवर्तनाला आमची शाळा व लोक तयार नसतात.

नवीन शिक्षणपध्दती केव्हा सुरु करायची असा प्रश्न पडतो :

गांधीजींनी सांगीतलेली नवीन शिक्षणपद्धती कार्यवाहीत आणताना काही व्यावहारीक अडचणी येतात. ही पद्धत केव्हा सुरु करायची ? असा प्रश्न पडतो. मुलांच्या कोणत्या वयापासून सुरवात करायची ? साधारणपणे पूर्वीच्या शिक्षणपद्धतीत वयाच्या ५ व्या किंवा ६ व्या वर्षी शिक्षणाला सुरवात होते. परंतु लहान मुलांना हस्तव्यवसाय कसा शिकविणार ? ते काम अतिशय कठीण होईल. कच्च्या मालाचा अपव्यय होईल. वयाच्या १० वर्षाच्या मुलांपासून सुरुवात करावी, म्हणजे हस्तव्यवसायाची साधने नीट वापरता येतील, असे गांधीजी म्हणतात. पण प्राथमिक शिक्षण इतक्या उशिरा सुरु करुन चालणार नाही.

तसेच नव्याने शाळेत जाणाऱ्यांना ह्या पद्धतीचा अवलंब करता येईल, पण ज्यांचे ५-६ वर्षे शिक्षण पूर्वीच्या पद्धतीने झाले आहे. त्यांचे काय ? जुन्या पद्धतीने काही वर्षे शिक्षण घेतल्यानंतर मध्येच नवी पद्धत आणता येणार नाही. फार तर नंतर ट्रेनिंग देता येईल.

जुन्या पद्धतीने मॅट्रीक झालेला विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी नवी पद्धत यशस्वीपणे वापरु शकेल का, अशीही शंका उपस्थित केली जाते.

सर्व विषय हस्तव्यवसायाच्या माध्यमातून शिकविता येतील का?

वर्धा शिक्षण योजनेवर करण्यात येणारी महत्त्वाची टीका अशी की, सर्व विषय हस्तव्यवसायाव्दारे शिकविता येतील का ? बऱ्याच विषयांचा व हस्तव्यवसायाचा परस्परसंबंध असला तरी प्रत्येक विषय हस्तव्यवसायाव्दारे शिकविणे शक्यही नाही व आवश्यकही नाही.

गांधीजी म्हणतात की सर्व विषय- इतिहास, भूगोल, अंकगणित, विज्ञान, भाषा, संगीत हस्तव्यवसायांव्दारे शिकवावेत. विषयांसंबधी प्राथमिक स्वरुपाची माहिती आपण फार तर हस्तव्यवसायाव्दारे सांगू शकू. परंतु संपूर्ण विषय त्या पद्धतीने शिकविता येणे अशक्य आहे.

व्यावहारिक अडचणी :

अ. गांधीजींचे शिक्षण विषयक विचार अतिशय आदर्शवादी भूमिकेतून येतात. त्यांची योजना पूर्णपणे वास्तवात येणे शक्य नाही अशी टीका केली जाते. शिाक्षणाची उद्दिष्टे, शिक्षक, अध्यापनपद्धती या सर्वच बाबतीत आदर्श सांगताना दिसतात. समाजात जेव्हा आपण एखादी नवीन योजना आखत असतो तेव्हा वास्तवाचा विचार अधिक प्रमाणात करावा अशी गांधीजींवर टीका केली जाते.

ब. उद्दिष्टांच्या बाबतीत गांधीजी वास्तवतेला सोडून बोलतात, असे म्हटले जाते. कारण व्यक्तीचा विकास झाला की, पर्यायाने समाजाचाही विकास होईल असे म्हणतात. परंतु नेहमिच असे घडत नाही.

क. चांगल्या प्रतिच्या शिक्षकांना आपले वेतनमानही (चांगल्या प्रतिचे) योग्य असावे असे वाटणे स्वभाविक आहे. जापर्यंत शिक्षक

दैनदिन काळजीपासून मुक्त असणार नाही. तोपर्यंत योग्य प्रकारे काम करु शकणार नाही. कमीतकमी वेतनमानात समाधान मानणारा शिक्षक दैनंदिन जीवनात पाहावयास मिळत नाही.

ड. वर्धा शिक्षण योजना म्हणजे प्लेटोच्या आयडिया सारखे काहीतरी फॅड (छांदिष्टपणा) आहे अशीही टीका केली जाते, कारण गांधीजींनी या योजनेचे जे काही आदर्श रूप सांगितले ते जसेच्या तसे प्रत्यक्षात येणे शक्य नाही. ही योजना जेथे कुठे राबविली जाईल, त्या शाळा म्हणजे अपूर्ण प्रतिमा होत.

विज्ञानयुगाशी विसंगत :

वर्धा-शिक्षण योजना ही सुधारणोच्या दृष्टीने मागे जाणारी आहे, अशीही टीका केली जाते. मध्ययुगीत हस्तव्यवसायांचा- सुत कातणे, विणणे इत्यादींचा पुरस्कार गांधीजी-सद्याच्या विज्ञानयुगात - हायड्रोजन बॉम्बच्या युगात करताना दिसतात. विज्ञान जेव्हा झपाट्याने प्रगती करीत आहे. त्यावेळी जुन्या पद्धतीकडे वळण्यात काय अर्थ आहे ? अशी शंका विचारली जाते.

संदर्भ ग्रंथ

१. हिंद स्वराज्य - म. गांधी

२. शिक्षण विचार - म. गांधी - संपादक – ग. वि. अकोलकर

३. शिक्षणविचार : विनोबा भावे

4. The Education Philosophy of Mahatma Gandhi – M. S. Patel

5. Basic Education – M. K. Gandhi

6. Educational Reconstruction

7. All men are brothers – M. K. Gandhi

लेख सूची

१. शिक्षण व समाजपरिवर्तन : प्रा. गं. बा. सरदार

२. शिक्षण, सर्वांगीण व्यक्तीमत्त्व आणि क्रांतीप्रवणता – प्रभा तुळबुळे

३. नवी महाविद्यालये कुणाची ? कुणासाठी ? - श्री. सदाशिव आठवले

४. हे प्रेताचे कारखाने थांबवा - श्री. सुधीर बेडेकर

५. एक टिपण - श्री. प्रकाश कामटीकर

६. शिक्षणशुद्धीआधी शिक्षणशुद्धी - श्री. अनिल किणीकर

७. माध्यमांचा यक्षप्रश्न

८. शाळा शीक आणि मोठा हो - श्री. शरद देशपांडे

९. आपल्या शिक्षणाची उद्दिष्टे - श्री. रा. भी. जोशी

१०. शालेय शिक्षण - श्री. ग. नी. अकोलकर

११. भारतीय प्रबोधन - संपादक : श्री. दि. के. बेडेकर व श्री. मा. शं. भणगे

१२. Aims of Education – R. S. Patters, The Philosophy of Education

13. Education – Dr. S. S. Barlingay